CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, १४ एप्रिल २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १५६ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**आजचे सामने**

लखनौ सुपर जायण्ट्स वि. चेन्नई सुपर किंग्ज

वेळ : रात्री ७.३० वाजता

ठिकाण : लखनौ

## विचारपुष्प



सामाजिक विषमतेचा एक आविष्कार अस्पृश्यता हा आहे. आपल्या समाजातील अत्यंत दुर्दैवी व दुःखदायक असा हा प्रकार आहे. अस्पृश्यता ही चूक आहे. 'It must go lock, stock and barrel!' ती सर्वतोपरी गेली पाहिजे. ती संपूर्णपणे नाहीशी झाली पाहिजे. अमेरिकेत गुलामगिरी घालविणाऱ्या अब्राहम लिंकनने म्हटले आहे, 'If Slavery is not wrong, nothing is wrong.' आपणही असेच म्हटले पाहिजे आणि आम्ही म्हणतोही की, 'If untouchability is not wrong, nothing is wrong.'

**- बाळासाहेब देवरस,**
रा. स्व. संघाचे तृतीय सरसंघचालक

# घरे जाळली, पाण्यात मिसळले विष

## मुर्शिदाबादेतून पळ काढलेल्या हिंदूंची व्यथा

**कोलकाता, १३ एप्रिल**

पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबादेत सध्या तणावपूर्ण शांतता आहे. मात्र, दोन दिवसांपूर्वी येथे झालेल्या भयावह हिंसाचारामुळे जवळपास ५०० हिंदूंनी येथून पळ काढत मालदा येथे आश्रय घेतला आहे. मुर्शिदाबादेतून पळ काढणाऱ्यांची संख्या वाढतच असल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यांनी मालदा येथील एका शाळेत आश्रय घेतला आहे. आमची घरे जाळली, पाण्यात विष मिसळण्यात आले, असे या लोकांनी सांगितले. दरम्यान, मुर्शिदाबाद हिंसाचारप्रकरणी आणखी १२ आरोपींना अटक केली आहे. त्यामुळे आरोपींचा एकूण आकडा १५० झाला आहे.

मालदा ग्रामीणमधील पारलालपूर हायस्कूलमध्ये ५०० पेक्षा जास्त लोकांनी आश्रय घेतला आहे. त्यात महिला आणि मुलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असल्याचे सूत्रांनी सांगितले. लोकांनी मुर्शिदाबाद येथील घरदार सोडून पळ काढला आणि नौकेचा वापर करीत ते मालदा येथे पोहोचले, अशी माहिती गावकऱ्यांनी दिली. मालदा येथे आश्रय घेतलेल्यांत नवजात मुलांपासून ते वृद्ध महिलांचा समावेश आहे.



मुर्शिदाबाद जिल्ह्यातील हिंसाग्रस्त भागात निमलष्करी दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत.

**जीव वाचवीत पळून आलो**

सध्या त्यांच्या जेवणाची व्यवस्था स्थानिक लोक करीत आहेत. मात्र, मुर्शिदाबाद येथून पळ काढणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत असल्याचे सांगितले जात आहे. मुर्शिदाबादच्या धुलियान येथून लोकांनी मोठ्या प्रमाणात पळ काढला. ते नौकांच्या मदतीने मालदापर्यंत पोहोचले. आमच्या पाण्यांच्या टाक्यांमध्ये विष मिसळण्यात आले. लुटल्यानंतर घरे जाळण्यात आली. आम्ही कसाबसा जीव वाचवून पळ काढून आलो, असे लोकांनी सांगितले. *(वृत्तसंस्था)*

# मुंबईवरील हल्ल्यात दाऊद इब्राहिमचा हात?

## एनआयए काढणार तहव्वूर राणाकडून सत्य

**नवी दिल्ली, १३ एप्रिल**

मुंबईवर २००८ मध्ये झालेल्या दहशतवादी हल्ला प्रकरणात राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयए तहव्वूर राणाची कसून चौकशी करीत आहे. या हल्ल्याच्या कटात त्याची भूमिका तपासण्यासोबतच, हल्ल्याच्या कटात कोण-कोण होते, याचा मागही काढत आहे. राणाची दुसऱ्या दिवशीही चौकशी झाली. कुख्यात पळपुटा गुंड दाऊद इब्राहिमचा संबंध मुंबई स्फोटात होता का आणि तहव्वूर राणासोबत त्याचा संबंध होता का, याचा तपास एनआयए करीत आहे.

या कटात सहभागी असलेल्या इतर लोकांची माहिती समोर यावी यासाठी एनआयए तहव्वूर राणा आणि डेव्हिड कोलमन हेडलीत झालेल्या कॉल्सचे रेकॉर्डिंगची तपासणी करीत आहे. केवळ इतके नव्हे, तर दहशतवादी हल्ल्यांशी संबंधित कॉल रेकॉर्डची पुष्टी करण्यासाठी राणाच्या आवाजाचा नमुना घेण्याच्या तयारीत एनआयए असल्याची माहिती सूत्रांनी दिली. एनआयएला दुबईतील एका व्यक्तीची माहिती मिळाली असून, डेव्हिड कोलमन हेडलीच्या सांगण्यानुसार राणाने त्याची भेट घेतली होती. त्या व्यक्तीला भारतावर दहशतवादी हल्ला होणार असल्याची माहिती होती. ती व्यक्ती म्हणजेदाऊद इब्राहिम होता अथवा त्याच्या टोळीतील इतर कुणी गुंड होता, त्याची माहिती एनआयए घेत आहे. पाकिस्तानची कुटील गुप्तचर संस्था आयएसआय आणि लष्कर-ए-तोयबासोबत राणाचा थेट संपर्क किंवा अप्रत्यक्ष संबंध होता का, याचा तपासही केला जात आहे. मुंबई हल्ल्याचा कट जवळपास २००५ पासून रचला जात होता, अशी शंका तपासयंत्रणेला आहे. तपासात मदत मिळावी, यासाठी राणाच्या आवाजाचे नमुने घेण्यात आले. त्याची पडताळणी राणाने केलेल्या कॉल्ससोबत केली जाईल.




### राणा उच्च सुरक्षा असलेल्या कोठडीत

अमेरिकेतून प्रत्यार्पण झाल्यानंतर राणाला भारतात आणल्यानंतर न्यायालयाने त्याला १८ दिवसांची पोलिस कोठडी ठोठावली आहे. त्याला एनआयएच्या मुख्यालयातील उच्च सुरक्षा असलेल्या कोठडीत ठेवण्यात आले. केवळ मुंबईच नव्हे, तर देशातील इतर शहरांवरील संभाव्य हल्ल्यांच्या कटाबाबतही राणाची चौकशी केली जात आहे.

## विनम्र अभिवादन



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आज जयंती.

### पुन्हा अवकाळीची शक्यता

**पुणे** : महाराष्ट्रात तापमानात दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे. त्यात भारतीय हवामान विभागाने राज्यातील विदर्भ, मराठवाडा तसेच मध्यम हाराष्ट्रातील काही जिल्ह्यांना अवकाळी पावसाचा इशारा दिला आहे.

# शेतकऱ्यांना देणार १२ तास वीज

**मुख्यमंत्र्यांची माहिती, आर्वी येथे ७२० कोटी रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन, लोकार्पण**

**आर्वी, १३ एप्रिल**

शेतीसाठी १२ तास वीज उपलब्ध करून द्यावी, अशी शेतकऱ्यांची मागणी होती. सरकारने त्यादृष्टीने अंलबजावणी सुरू केली आहे. डिसेंबर २०२६पर्यंत उर्वरित ८० टक्के शेतकऱ्यांना वर्षभर १२ तास वीज उपलब्ध करून दिली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी येथे दिली. राज्य सरकारने २०२५ ते २०३० या कालावधीत वीज देयक दरवर्षी कमी करण्याचे नियोजन केले असून, त्या दिशेने पाऊले उचलली जात आहे. ३०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या मध्यमवर्गीयांना सौरऊर्जेच्या अंतर्गत आणि मोफत वीज देण्यात येईल, असे फडणवीस यांनी सांगितले.




येथील नवीन प्रशासकीय इमारतीच्या लोकार्पणासह ७२० कोटींच्या विकास कामांचे ई- लोकार्पण व भूमि पूजन कार्यक्रमात ते बोलत होते. आर्वीत सिंचन योजनेचे यापूर्वीच लोकार्पण करायचे होते. ते आज झाले. नळगंगा वैनगंगा प्रकल्पाच्या माध्यमातून ५५० किमीची एक नदी आपण तयार करतो आहोत. या माध्यमातून विदर्भातील वर्धा, नागपूर, भंडाऱ्यासह वाशीम पर्यंत १० जिल्ह्यांना लाभ मिळणार आहे, असे फडणवीस म्हणाले. यावेळी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, खा. अमर काळे, आ. दादाराव केचे, आ. सुमित वानखेडे, आ. समीर कुणावार, आ. राजेश बकाने, माजी खासदार रामदास तडस, भाजपाचे जिल्हाध्यक्ष सुनील गफाट, ज्येष्ठ नेते सुधीर दिवे, सरिता गाखरे, प्रशांत सव्वालाखे, नंदू थोरात, जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांची उपस्थिती होती.

## युसूफ पठाण यांची 'अच्छी चाय'

**नवी दिल्ली, १३ एप्रिल**

मुर्शिदाबाद येथे झालेल्या हिंसाचारानंतर तृणमूल काँग्रेसचे खासदार युसूफ पठाण यांनी समाज माध्यमावर केलेल्या पोस्टवर भाजपाने टीका केली. युसूफ पठाणे समाज माध्यमावर स्वतःचे चहा पित असतानाचे एक छायाचित्र टाकले आणि 'अच्छी चाय' असा शब्द त्याच्या ओळीत वापरला. त्यांच्या या बेजजबाबदारपणावर भाजपाने टीका केली. हे छायाचित्र त्यांच्या लोकसभा मतदारसंघात झालेल्या हिंसाचारानंतर टाकल्यामुळे वाद उद्भला आहे. युसूफ पठाण बहरामपूरचे खासदार आहेत. चांगला चहा, शांत वातावरण. या क्षणाचा मी आनंद घेत आहे, असे त्यांनी इन्स्टाग्रामवरील पोस्टमध्ये म्हटले. वक्फ सुधारित कायद्याच्या विरोधात झालेल्या हिंसक निदर्शनांनंतर दुसऱ्या दिवशी त्यांची ही पोस्ट समोर आली.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक राष्ट्रपुरुष

***भारतात सामाजिक स्वातंत्र्य निर्माण करण्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा सिंहाचा वाटा आहे. बाबासाहेबांनी या देशाला आधुनिक कालखंडामध्ये पुढे घेऊन जाण्याचे मोठे कार्य त्यांच्या विचार व कृतीतून केले आहे. या देशातील अस्पृश्य गणल्या जाणाऱ्या एका मोठ्या समाज घटकाला स्वाभिमानाने उभा करून त्यांना राष्ट्रीय प्रवाह आणण्याचे महत्कार्य बाबासाहेबांनी केले आहे. अनेक - अनेक गोष्टी बाबासाहेबानी केल्या, परंतु एका विशिष्ट दृष्टीकोनातून बाबासाहेबांकडे पाहण्याची सवय समाजाला लागल्यामुळे दुर्दैवाने बाबासाहेबांच्या विचार व कार्याची उंची अनेकजण मान्य करत नाहीत, परंतु बाबासाहेब हे राष्ट्रपुरुष आहेत हे आपणाला मान्यच करावे लागेल.***



### बाबासाहेब प्रेरणास्त्रोत-

बाबासाहेब ज्या समाजात जन्मले - वाढले व उपेक्षित असण्याच्या वेदना सहन केल्या, त्या समाजाला जर सन्मान मिळवून द्यायचा असेल व या समाजाचं स्वत्व जागृत करायचं असेल तर त्यांनी शिक्षण घेतलं पाहिजे हे बाबासाहेबांनी जाणलं होतं. त्यामुळेच बाबासाहेबांनी स्वतः अत्यंत परिश्रम घेऊन उच्च शिक्षण पूर्ण केलं. ते एम.ए., पीएच.डी., एम.एस्सी., डी. एस्सी., बॅरिस्टर ऑफ लॉ., एलएल.डी. अशा अनेक पदव्या त्यांनी मिळवल्या होत्या. समाजशास्त्र, इतिहास, कायदा, अर्थशास्त्र अशा विषयांमध्ये त्यांनी अभ्यास केला होता. त्यामुळेच आपल्या समाजाला शिक्षण घ्या असं सांगण्याचा त्यांना अधिकार प्राप्त झाला होता. बाबासाहेबांकडे पाहूनच अनेक लोक शिक्षणासाठी तयार झाले. जी गोष्ट शिक्षणाची तीच गोष्ट संघर्षाची. बाबासाहेबांनी भेदाभेद, अस्पृश्यता, जातीयता याविरुद्ध जो संघर्ष केला, त्या संघर्षामधूनच प्रेरणा घेऊन याविरुद्ध लढण्यासाठी अस्पृश्य गणल्या जाणाऱ्या समाजातील शेवटचा घटकही उभा राहिला, म्हणजेच बाबासाहेब एक प्रेरणास्त्रोत होते.

### देशाच्या स्वातंत्र्याबरोबरच सामाजिक स्वातंत्र्य महत्वाचे

बाबासाहेबांनी कोणत्याही स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला नाही, त्यामुळे ते कधीही तुरुंगात गेले नाहीत. सन १९४२ चे आंदोलन चालू असताना ते व्हाईसरॉयच्या कौन्सिलमध्ये गेले आणि मजूर मंत्री झाले, चले जाव चळवळीस त्यांनी विरोध केला आणि अस्पृश्य बांधवांनी त्यापासून दूर राहावे असा त्यांनी सल्ला दिला असे बाबासाहेबांवर आरोप केले जातात. साहजिकच या सर्व गोष्टी सत्य आहेत. बाबासाहेब त्या काळात असे का वागले? याचा मात्र आरोप करणारे विचार करत नाहीत. भारतामध्ये इंग्रजांच्या गुलामगिरीविरुद्ध आंदोलन सुरू होते परंतु असे आंदोलन करणारे सवर्ण म्हणविणारे लोक मात्र एका मोठ्या समाज घटकाला आपल्या गुलामीत ठेवून होते. याचाच अर्थ स्वतःवरची गुलामगिरी संपविण्यासाठी प्रयत्न करणारे लोक स्वतः मात्र इतरांवर गुलामगिरी लादत होते अशी परिस्थिती असल्यामुळेच बाबासाहेबांनी देशाच्या स्वातंत्र्यांपेक्षा सामाजिक स्वातंत्र्याला अधिक महत्त्व दिले. बाबासाहेबांनी समाजातील तळाला असणाऱ्या व पिचलेल्या समाज घटकाला जागे करण्याचे व स्वतःच्या हक्कासाठी सक्षम करण्याचे कार्य केले. अस्पृश्य गणल्या जाणाऱ्या समाज बांधवांना ताठ मानेने जगण्यासाठी प्रेरणा देण्याचे काम केले, त्यामुळेच देशाच्या स्वातंत्र्याच्या आंदोलनात बाबासाहेबांनी जरी भाग घेतला नसला तरी याच भारत भूमितील एका मोठ्या समाज घटकाला एका वेगळ्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांनी दिलेला मानवतेचा लढा हा महत्त्वाचा होता.

### खऱ्या अर्थाने अहिंसक असणारे बाबासाहेब-

बाबासाहेबांनी सामाजिक स्वातंत्र्य लढा मोठ्या निर्धाराने लढला. सवर्ण समजल्या जाणाऱ्या समाजाने अडचणी निर्माण केल्या, अडथळे आणले, प्रसंगी संघर्षही निर्माण झाला. परंतु बाबासाहेबांनी कधीही रक्तरंजित संघर्ष होऊ दिला नाही. कारण बाबासाहेब ज्या विचार व परंपरेला मानत होते, त्या भगवान गौतम बुद्धांचा आदर्श त्यांच्यासमोर होता. त्यामुळेच बाबासाहेबांनी या देशात घडवून आणलेली ही अहिंसक सामाजिक क्रांती होती. स्वातंत्र्य, समता व बंधुता या गोष्टी निर्माण करण्यासाठी जगभरामध्ये अनेक लढे उभारले गेले व यातील बहुतांश लढे हे रक्तरंजित ठरले. फ्रान्समध्ये राज्यक्रांती झाली, या राज्यक्रांतीमध्ये ४० हजार लोक मारले गेले. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता मिळवण्यासाठी एवढी प्रचंड किंमत त्यांना द्यावी लागली. अमेरिकेमध्ये अशीच गुलामगिरी संपवण्यासाठी दक्षिण विरुद्ध उत्तर असे गृहयुद्ध झाले. या युद्धामध्ये सहा लाख वीस हजार अमेरिकन सैनिक मारले गेले तर तेवढेच जखमी झाले असावेत. गुलामाला सामाजिक स्वातंत्र्य देण्यासाठी अमेरिकन समाजाला अशी अफाट किंमत मोजावी लागली. रशियात देखील साम्यवादी क्रांती झाली. ही क्रांती गरिबांना स्वातंत्र्य, न्याय आणि आर्थिक समता मिळवून देण्यासाठी झाली. लेनिनच्या काळात जवळपास ६० लाख लोक ठार झाले तर स्टॅलिनच्या काळात जवळजवळ तीन ते साडेतीन कोटी लोक ठार झाले. रशियात समतेचे राज्य आणण्यासाठी आणि शेतमजूर, शेतीवर गुलाम म्हणून राबणाऱ्या लोकांना मुक्त करण्यासाठी एवढ्या प्रचंड संख्येने लोकांना आपले प्राण गमवावे लागले. परंतु भारतामधील अशा प्रकारची अस्पृश्यता - जातीयता नष्ट करण्यासाठी बाबासाहेबांनी जी क्रांती घडवून आणली, ती पूर्णता अहिंसक अशीच होती. अनेक प्रसंगांमध्ये सवर्ण समजल्या जाणाऱ्या समाजाने हल्ले करून देखील अस्पृश्य गणल्या जाणाऱ्या व बाबासाहेबांनी नेतृत्व केलेल्या समाज घटकांनी कधीही हिंसेचा वापर केला नाही म्हणूनच अशा प्रकारची भारतात सामाजिक क्रांती अहिंसेच्या मार्गाने घडवून आणणारे बाबासाहेब हे थोर महापुरुष आहेत.

### धम्म मानणारे विवेकशील बाबासाहेब

बाबासाहेब हे धर्म मानत नव्हते, धर्माला अफुची गोळी समजायचे असे अलीकडच्या काळात रुजविले जाते. परंतु बाबासाहेब हे धर्म मानत होते, कदाचित त्यांची धर्माची कल्पना वेगळी असली पाहिजे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. आपल्या देशात बहुसंख्यांकाने हिंदू धर्मीय राहतात हे बाबासाहेब जाणून होते, आपण ज्या समाजाचे नेतृत्व करतो तो समाजही याच धर्माचा घटक आहे. परंतु त्याच धर्मातील आपल्याच लोकांनी या घटकाला अस्पृश्य म्हणून दूर ठेवले आहे ही वास्तविकता लक्षात घेऊन बाबासाहेबांनी अनेक-अनेक वेळा धर्मातील कर्मठांना साद घातली व माणूस म्हणून सर्वांना समान वागणूक देण्याचे आवाहन केले, प्रसंगी संघर्षही केला. परंतु पुन्हा - पुन्हा यामध्ये अपयश येत असल्याचे व कर्मटांकडून कोणताही प्रतिसाद लाभत नसल्याचे लक्षात घेऊन सन १९३५ मध्ये बाबासाहेबानी मी हिंदू धर्मात जरी जन्मलो असलो तरी हिंदू धर्मात मरणार नाही अशी प्रतिज्ञा करून एक प्रकारे धर्म बदलणार असल्याचे जाहिर केले. सन १९३५ मध्ये त्यांनी हे सुतोवाच केले व प्रत्यक्षात सन १९५६ मध्ये धर्म परिवर्तन केले, तेवढ्या मोठ्या कालखंडात देखील बाबासाहेब व त्यांच्या बरोबरच्या समाजाला दुर्दैवाने आपण सन्मानाने सामावून घेऊ शकलो नाही. बाबासाहेब जर धर्मच मानत नसते तर त्यांनी धर्मामध्ये सन्मानाची वागणूक मिळवण्यासाठीचा हा संघर्ष केला नसता. हिंदू धर्मामध्ये सन्मान मिळत नाही म्हणून बाबासाहेबांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला, याचाच अर्थ कोणत्यातरी धम्माचाच त्यांनी आधार घेतला. धर्माची माणसाला भाकरी इतकी आवश्यकता आहे, कारण धर्म माणसाला आशावादी बनवतो. असे दीक्षाभूमीच्या भाषणात बाबासाहेब म्हणाले. याचाच अर्थ बाबासाहेब धर्म मानत नव्हते असे नाही तर त्यांची धर्माकडे पाहण्याची दृष्टी वेगळी होती. बाबासाहेबांनी आपल्या भारत भूमीतील धर्म व संस्कृतीचा अत्यंत चिकित्सतेने अभ्यास केलेला होता, त्यामुळेच त्यांनी धर्म परिवर्तन करण्याचा निर्णय घेतल्यानंतर देखील या भारतातील सांस्कृतिक ऐक्य कायम टिकविण्यासाठी याच भूमीतील - याच संस्कारातील परंतु एका वेगळ्या उपासना पद्धतीचा अवलंब करणाऱ्या बौद्ध धम्माचा स्वीकार केला हे देखील बाबासाहेबांचे आपल्या देशावरील उपकारच आहेत. बौद्ध धम्म हा याच संस्कृतीचा एक घटक असल्याचे बाबासाहेबांनी अनेकदा मान्य केले आहे व हिंदू कोड बिलाच्या अनुषंगाने घटना समितीमध्ये मत मांडतानाही त्यांनी हीच भावना अधोरेखित केली आहे. याचाच अर्थ बाबासाहेबांना हिंदू धर्म संस्कृती व भारतातील परंपरा यांचा निश्चितच आदर होता.

### राष्ट्रपुरुष बाबासाहेब

बाबासाहेबांनी भारतातील एका मोठ्या समाज घटकाला एक प्रकारे पुनर्जन्म देऊन राष्ट्रीय प्रवाहात आणले याचा परिणाम म्हणून भारताची सांस्कृतिक ऐक्यता निर्माण झाली, या अर्थाने बाबासाहेब राष्ट्रपुरुष ठरतात. घटना समितीतील त्यांनी केलेले काम, मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी घेतलेले कष्ट, फाळणीच्या प्रसंगी त्यांनी व्यक्त केलेली मते व भारताच्या जडणघडणीमध्ये बाबासाहेबांचे योगदान लक्षात घेता ते खऱ्या अर्थाने राष्ट्रपुरुष आहेत हे लक्षात येते. घटना समिती अथवा मसुदा समितीमध्ये काम करताना त्यांनी केवळ अनुसूचित जातीतील समाज घटकांना न्याय देण्यासाठी संविधान निर्माण केले नाही. संविधानाची निर्मिती करत असताना अठरा - अठरा तास जी प्रचंड मेहनत त्यांनी घेतली ती या देशातील संस्कृती व परंपरा यांचा अंगीकार करणाऱ्या संपूर्ण देशवासीयांच्या मनाचा विचार करून संविधान कसे निर्माण करता येईल यासाठी. बाबासाहेबांनी शिक्षणाचे महत्त्व समाजाला करून दिले व या समाजाच्या उन्नतीसाठी आयुष्यभर कष्ट घेतले. हे करत असताना या समाजाच्या मनात या भारत भूमीबद्दलचा - देशभक्तीचा भाव बाबासाहेबांनी निर्माण केला याचाच अर्थ बाबासाहेबांनी येथील चुकीच्या रूढी - परंपरा विरुद्ध बंडखोरी केली, परंतु देशातील संस्कृती, परंपरा, येथील लोक व देश यांच्याविरुद्ध कधीही बंडखोरी केली नाही म्हणूनच बाबासाहेब हे खऱ्या अर्थाने राष्ट्रपुरुष आहेत, अशा बाबासाहेबांच्या विचारांचे पाईक बनून आधुनिक भारत घडविण्यासाठी येथील धर्म, संस्कृती, परंपरा, उपासना पद्धती व येथील समाज या सर्वांचा आदर करून पुढे चालत राहिले पाहिजे. हीच बाबासाहेबांना खऱ्या अर्थाने आदरांजली ठरेल.

**- डॉ. सचिन लादे, पंढरपूर**
मो. क्र.- ७५८८२१६५२६

---

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची कराडच्या भवानी सायम शाखेला भेट

***१९९८ साल असेल संघाची सुरुवात कराडमध्ये कशी झाली याची मला उत्सुकता होती. यासाठी मी, जुने ज्येष्ठ कार्यकर्ते ना. वा. जोशी सर आणि लाटे मास्तर यांना भेटलो. त्यांना म्हणले विशेष आठवणी सांगा. दोघांपैकी एकाने डॉक्टर आंबेडकर कराडला शाखेत येऊन गेल्याची आठवण सांगितली. त्याच दरम्यान मा. सुखदेव उर्फ नाना नवले कराडला आले असताना त्यांनी पण याचा उल्लेख केला.***

आमचे ना. वा. जोशी सर उत्साही. ते म्हणाले केदार याचे तपशील पाहिजे असतील तर आपण पुण्याला दत्तोपंत टंकसाळे आणि रघुनाथराव देशपांडे यांना भेटले पाहिजे. ते अगदी सुरवाती पासून संघ स्वयंसेवक आहेत. त्याप्रमाणे त्यांना भेटण्या विषयी पत्र लिहिले. दोघांचेही आपुलकीचे पत्र आले.

श्री. दत्तात्रय राजाराम तथा दत्तोपंत टंकसाळे, ३०.१०.१९९९ दिनांक च्या पत्रात लिहितात मी कराडचा शहर कार्यवाह आणि लष्कर प्रमुख (शारीरिक शिक्षण प्रमुख) होतो. लष्करी संचलनाचा दिवस होता. बाबासाहेबांना सातारहून कराडला येताना अपघात झाला होता, त्यामुळे त्यांना यायला उशीर झाला. आम्ही आतुरतेने वाट बघत होतो. त्यामुळे सायंकाळी ६.०० ची शाखा ६.३० ला वाट बघून लावली. बाबासाहेब भवानी सायं शाखेवर सायंकाळी ६.४५ च्या सुमारास आले. त्यांच्या डोक्याच्या जखमेवर पट्टी बांधली होती. मी त्यांची विचारपूस केली आणि त्यांना ध्वज वंदना साठी नेले.

त्याच पत्रात ते पुढे उल्लेख करतात, बाबासाहेब आम्हा सर्व स्वयंसेवकांकडे बघून म्हणाले मी जोपर्यंत जिवंत आहे तोपर्यंत येणार म्हणजे येणार. डॉ हेडगेवार माझे मित्र आहेत. आणि हे चांगले कार्य आहे. मी आणि माझा समाज केंव्हाही आपल्या पाठीशी ठाम उभे राहू. टंकसाळे यांचे बरोबर त्या प्रसंगाचे साक्षीदार म्हणून रघुनाथ दत्तात्रय देशपांडे, नारायण वासुदेव जोशी, बिपिनचंद्र नरहर पेंढारकर, द.वा. तथा आबासाहेब धोपाटे, नाना धोपाटे इ स्वयंसेवक उपस्थित होते.

### डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना शाखेत बोलावणारी टीम

१. तालुका संघचालक: मा. श्री. आबासाहेब धोपाटे वकील (१९३८-४०)

२. शहर कार्यवाह आणि लष्कर प्रमुख: श्री. दत्तात्रय राजाराम तथा दत्तोपंत टंकसाळे

३. शहर संघचालक: श्री. गोविंद तथा दादासाहेब केळकर वकील

४. शहर सह कार्यवाह: श्री. हरिभाऊ कुलकर्णी सर

५. बौद्धिक प्रमुख: श्री. गोविंदराव लाटे मास्तर

दत्तोपंतांनी आम्हाला (केदार गाडगीळ आणि ना. वा. जोशी सर) चंपाषष्ठीच्या खंडोबा नवरात्राला जेवायला बोलवले. ती तारीख होती १४ डिसेंबर १९९९. त्याप्रमाणे आम्ही दोघेजण भेटायला गेलो



त्यावेळी विलक्षण घटना घडली ती म्हणजे डॉक्टर हेडगेवार यांचा सोन्यामारुती सत्याग्रहा दिवशी काढलेला मूळ फोटो मला दत्तोपंत यांनी माझ्या ताब्यात दिला.

पंतांकडे जेवण झाल्यावर आम्ही रघुनाथराव देशपांडे यांना भेटलो. त्या दोन्ही भेटींचे ऑडिओ रेकॉर्डिंग केले आहे. तो डॉक्टर हेडगेवार यांचा मूळ फोटो घेण्यासाठी मिलिंदजी ओक आणि डॉक्टर श्रीरंग गोडबोले पुण्याहून मुद्दाम माझ्या घरी भेटायला आले होते. डॉक्टर गोडबोले यांनी सांगितले. डॉक्टर आंबेडकर आले असताना प्रत्यक्ष घटना बघितलेले एखादे स्वयंसेवक जिवंत असतील तर चौकशी करून त्यांची ही मुलाखत घे. त्यावेळी मला मदतीला आले कै. चंद्रकांत वासुदेव तथा बंडोपंत चव्हाण त्यांनी नाना धोपाटे यांचे नाव सुचवले. त्यामुळे तशी मुलाखत घ्यायची संधी मला ४ जून २०१७ रोजी मिळाली. त्याचे व्हिडिओ रेकॉर्डिंग पुण्याचे स्वयंसेवक श्री. मंदार कुलकर्णी यांनी केले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी कराड येथील रा.स्व.संघाच्या शाखेला भेट दिल्याची बातमी दि. ९ जानेवारी १९४० च्या 'केसरी'च्या अंकात छापुन आली होती. यावेळी बाबासाहेब म्हणाले काही बाबतीत मतभेद असले तरी या संघाकडे आपलेपणाने पाहतो. केसरी वृत्तपत्र बातमी ही हुडकली आहे डॉक्टर श्रीरंग गोडबोले यांनी. मला ती त्यांनी २६ फेब्रुवारी २०२३ रोजी पहाटे ४.१९ ला पाठवली होती. ती बातमी केसरीच्या अंकात ९ जानेवारी १९४० मध्ये छापुन आली असली तरी भेटीची तारीख ही तारीख २ जानेवारी १९४० आहे तर चांगदेव भवानराव खैरमोडे डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र खंड नऊ चरित्रानुसार आणि टाईम्स ऑफ इंडियाच्या बातमीनुसार बुधवार ३ जानेवारी १९४० ही तारीख दिली आहे म्हणून बुधवार ३ जानेवारी १९४० ही तारीख नक्की केली आहे. माननीय दादा इदाते यांनी पण याविषयी संशोधन केले होते पण त्यांची डायरी हरवल्याने ते याबद्दल जास्त काही सांगू शकले नाहीत. पण डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी कराडला भेट दिल्याचे पुष्टी मात्र त्यांनी केली.

---

# संविधान विचारजागर

समत्व संविधानी भान। ममत्व संविधानी प्राण। कृत्रिम भेदभावा नसे स्थान। भारतीय संविधान असे।।राज्यघटनेचा आशय थोर । मानवतेचा जयजयकार फार । खंडन मंडनाचा उद्घोष फार। अंतर्भूत असे ।।नको वर्णभेद, जातीभेद। नको वर्ग भेद ,लिंग भेद । माणूस वर्तुळातील मध्यबिंदू जाण ।व्यापक प्रेम भाव असे ।।जन्मजात उच्च नीचता । नसे संयुक्तिक तत्वतः । मी देशाचा, देश माझा । वसे देश प्रेमाचा गाजा वाजा।।संधीची समानता । सर्वात आहे एकता । प्रसार करूया बंधुता । या भारत भूमीत ।।नागरिक शास्त्र शिकूया । बहुतां विश्वास देऊया । संविधान साक्षर होऊ या । अखंड भारतात।।सीमेवर लढतो जवान। शेतात राबतो किसान । विज्ञान विवेकाची करू पखरण । या भरत भूमीत ।।आता भारतात राजकीय लोकशाही । निर्माण करणे आहे सामाजिक लोकशाही। हे व्रत घेऊया अंतरी ।देशाभिमानाकारणे।।स्वातंत्र्याची पूजा बांधूया। समन्वयाची दृष्टी ठेवूया। विषमतेचा धिक्कार करूया। आदर्श भारत घडवाया ।।घटना समितीत सदस्यअनेक । परी बाबासाहेब सिद्ध देख। घटनाशिल्प मूर्त एक। साकार जाहले ।।ब्रिटिश संसदीय राज्यपद्धती। अमेरिकन अध्यक्षीय पद्धती । बौद्धिक एकात्म विचार पद्धती । सुंदर समन्वय संविधानी असे।।न्यायाचा स्वीकार। अन्यायाचा तिरस्कार । देश प्रेमाचा पुरस्कार । संविधानी असे ।।जसा काळ बदलतो । तसा राज्यघटनेत सुधार होतो। नियमांनुसार कायदा येतो। स्वरूप नवीन घेऊनी।।घटनेत संवादाला स्थान। विसंवादा नसे थारा जाण। आधी मी भारतीय जाण। संविधानाविषयी ।।करूया संविधानाचा विचार जागर। उघडू या शासन ,प्रशासनाचे आगर। खोलू या मानवतेचे महाद्वार । हक्क कर्तव्यांचे।।स्वातंत्र्य ,समता, बंधुता। शाश्वत जीवन मूल्ये तत्वतः। समाजवादी सिद्धांत आता। उद्देशिका गौरव त्वरिता।। धर्मनिरपेक्षतेचा प्रभाव। विकारांचा अभाव विचारांचा स्वभाव । या खंडतुल्य देशात ।।सत्यमेव जयते । हे उपनिषदातील मंत्र जपते । भारतीय संस्कृती रक्षिते । या संविधानात ।।वेदकाळी ऋषीमुखी । प्रगटले शब्द भारत माता । किरण बंडोपाध्यायांचे नाटक आता अवतीर्ण जाहले बंगालात ।।मी आणि माझे पण । विसरूनी जाऊ सकळ जन । जाऊ या देशाला शरण । कृतार्थ होऊनिया ।।

**- माधव कुलकर्णी,**
लिंबीचिंचोली (ता. दक्षिण सोलापूर) मो. क्र. - ९६२३७९१४७९

---

# बाबासाहेब आंबेडकरांसारखे महापुरुष सर्वांनाच समान लेखतात

**भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, स्वतंत्र भारताचे पहिले कायदे मंत्री, बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची आज १३४ वी जयंती.**

------------------------------

जगातील सर्वच विशेषणे लावली तरीही ती अपुरीच पडतील असे महान व्यक्तिमत्व म्हणजे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर. ज्यांचे कर्तृत्व, नेतृत्व आणि वक्तृत्व यांची उंची कोणालाही गाठता अली नाही आणि येणारच नाही. हिमालयाच्या एव्हरेस्ट शिखरापेक्षा हि उंच, महासागरापेक्षा हि खोल आणि आकाश पेक्षा हि विशाल म्हणजेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर.

जय भीम या एका वाक्यात ज्यांची महती साठवलेली आहे त्यांची तुलना कोणाबरोबर हि होऊच शकत नाही. अस्पृश्याचे उद्धार करते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच असं म्हणलं होत किमी जर का अस्पृश्यांचा उद्धार केला नाही तर स्वतःवर गोळी झाडून घेइन असा त्यांनी दृढ निश्चय केला होता परंतु अस्पृश्यांचाच काय साऱ्या भारताचाच उद्धार त्यांनी केला त्यांनी असं म्हटलं आहे. मी हिंदू धर्मात जन्मलो असलो तरी ते माझ्या हातात नव्हते, पण मी हिंदू म्हणून मरणार नाही हे १९३५ साली येवले येथे जाहीर सभेमध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेली भीमप्रतिज्ञा. १४ ऑक्टोबर १९५६ साली नागपूर येथे ५ ते ६ लाख अनुयायीसह बोद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि नवा इतिहास घडविला. समता, स्वातंत्र, बंधुत्व व न्याय या बुद्ध तत्व ज्ञानाच्या आधारावर भारतीय संविधान लिहिले आणि ते भारत देशाला बहाल केले.

काठमांडू येथे झालेल्या जागतिक बोद्धधम्म परिषदेत बोद्धचार्यांनी बोधिसत्व ही पदवी बहाल केली. त्यांच अनेकांशी आयुष्यभर वैचारिक संघर्ष झाला पण कोणाशीही कधी हि शत्रुत्व कधीच निर्माण केले नाही. इतकच नव्हे तर त्यांनी आपल्या विरोधकांना क्षमाच केली. क्षमा करणे केव्हाही चांगलेच पण विसरणे त्याहून चांगले. म्हणूनच बहुजन हिताय बहुजन सुखाय साठी मनात कोणताही दुजाभाव ठेवला नाही. ते स्वतः साठी वैयक्तिक आयुष्य जगले नाहीत. तथागत गौतम बुद्धांनी तर स्वतःच राज वैभव सोडून जगाच्या कल्याणसाठी गृह त्याग केला. राष्ट्र पिता महात्मा जोतिबा फुले यांनी वडिलांचा विरोध पत्करून बहुजनांसाठी गृह त्याग केला. महापुरुषांना स्वतःच वैयक्तिक आयुष्य नसत. त्या प्रमाणेच डॉक्टर बाबासाहेबांनी हि आपल्या कुटुंबकडे दुर्लक्ष केले आणि बहुजनांचा उद्धार केला. येथे उदहारण देऊन सांगायचं म्हणजे वृक्ष आपल्या फांद्यांपसरून इतरांना सावली देण्याचं काम करतात. सूर्यनारायण प्रकाश सर्वांना देतो. नदी पाणी सर्वांना देते. ते कधी ही सज्जन दुर्जन असा भेद पाहत नाहीत. लिंगभेद करत नाहीत. जातीयता पळत नाहीत. त्याच प्रमाणे बाबासाहेब आंबेडकरांसारखे महापुरुष सर्वांनाच समान लेखतात. संत तुकाराम महाराज यांच्या उक्ती प्रमाणे आधी केले मग सांगितले ते स्वतः शिक्षणासाठी अमेरिकेला गेले, कोलंबिया विद्यापीठात उच्च विद्याभूषित झाले. आणि मग सर्वांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे ते जो प्राशान करील तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही शिक्षणा बरोबरच संघटित होण्यास सांगितले. संघटित झालात तरच संघर्ष करू शकाल या देशाच्या इतिहासात माझे नाव विद्वांस म्हणून मला नोंदवायचे नाही. हिंदू कोड बिल लिहून त्यांनी महिलांना माणुसकीचे हक्क दिले. परंतु ते बिल पारित होऊ शकले नाही त्यामुळे त्यांनी आपल्या कायदे मंत्री पदाचा राजनामा दिला. माझ्या बांधवानो साधा नगराध्यक्ष किंवा नगरसेवक आपल्या पदाचा राजीनामा लवकर देत नाही. परंतु महिलांच्या हक्क साठी तयार केलेले बिल पारित न झाल्याने महिलांची कणव असलेल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांच्या माणुसकीच्या हक्काचा कायदा पारित न झाल्याने मंत्रिपदाचा राजीनामा दिला. मजूर मंत्री असताना पुरुष आणि महिला यांना सामान कामासाठी सामान वेतन व सामान कामाचे तास केले महिलांना बाळंत पणाची राजा मंजूर केली सर्वांना शिक्षणाची संधी मिळावी म्हणून त्यांनी मागास वर्गीयांकरता मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालय काढले व औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय स्थापन केले काँग्रेस मनुवादी आणि ब्रिटिश राज्यकर्ते यांच्या विरुद्ध एकटाच नेता लढला सर्व आघाड्या सांभाळणारे एकमेव नेते होते त्यांनी प्रगतीचा रथ चळवळी पर्यंत आणून ठेवला परंतु आम्ही मात्र राजकीय चळवळीत भरकटत आहोत हि आमची शोकांतिका आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी आणलेला प्रगतीचा रथ पुढे नेण्याऐवजी मागे ओढण्याचा प्रयत्न होत आहे आपल्याला पुढे नेता येत नसेल तर मागे तर अणू नका तिथेच ठेवा ज्ञानाचे अथांग सागर असलेले डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या त्यागाचा कितपत कार्य करत आहोत याच आत्म चिंतन करायला हवं केवळ विश्वभूषित विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेतल्याने एकमेकांना जय भीम म्हणल्याने विधी पुरतेच बोद्ध म्हणल्याने आम्ही आंबेडकर अनुयायी होतो का हा प्रश्न स्वतःच स्वतःला विचारा त्यांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञाचे पालन केले पाहिजे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी काळ्याकुठं अज्ञान रुपी अंधारात चाचपडत बसलेल्या समाजाला प्रकाशाकडे आणण्याचे महान कार्य केले. त्यांनी केलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे मार्ग क्रमण करणे हेच खऱ्या अर्थाने बाबांना अभिवादन आणि कोटी कोटी प्रणाम.

**- पुष्पा गायकवाड**
मो. क्रं. -९८६००७८२६९

---

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आधुनिक भारताचे शिल्पकार

**१४** एप्रिल २०२५ रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे १३४ वी जयंती साजरी होत आहे यानिमित्त त्यांनी देशाच्या जडणघडणीचे महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे त्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न या लेखातून करण्यात आला आहे. हा दिवस आपणाना सर्वांसाठी प्रेरणा देणारा आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्राखंड पंडित होते वेगवेगळ्या विषयावरील त्यांचा व्यासंग अद्भुत असा होता राजकारण, समाजकारण, अर्थकारण, कामगार या क्षेत्रात त्यांनी केलेली कामगिरी उल्लेखनीय अशी आहे त्याचबरोबर त्यांनी भारतीय शेतकरी आणि शेती विषयी मूलभूत चिंतन केले त्यांचे हे विचार आजही तितकेच प्रासंगिक असून त्यातून त्यांचे दृष्टे पण दिसून येते. यानिमित्ताने देशाच्या जडणघडणीमध्ये त्यांनी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचे घराणे रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यातील अंबवडे येथील आहे. त्यांचे वडील रामजी सुभेदार हे लष्करात होते १४ एप्रिल १८९१ रोजी मध्य प्रदेशातील महू येथे लष्करी तळावर रामजी सुभेदारांचे फलटण असताना डॉ. आंबेडकरांचा जन्म झाला. बाबासाहेबांचे प्राथमिक शिक्षण सातारा येथे झाले व तदनंतर मुंबईतील एल्फिन्स्टंट हायस्कूल येथे पुढील शिक्षण झाले त्या काळात मॅट्रिकचे परीक्षा कठीण समजली जाई. भीमराव आंबेडकर मॅट्रिक पास झालेले अस्पृश्यातील पहिले विद्यार्थी होय.

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर हे आधुनिक भारताचे निर्माते होत, विसाव्या शतकातील महानायक, हजारो वर्षांपासून दलित, उपेक्षित, वंचित व परिघाबाहेर असणाऱ्या समाजाची उसठसती वेदना मांडणारा, बहिष्कृत भारताचा मूकनायक, जाती आणि वर्ण व्यवस्थेने गुलाम बनविलेल्या माणसांचा पहिला बोलका स्वर, शतकानुशतके अज्ञान, दारिद्र्य, गुलामी आणि शोषणाच्या चक्रव्यूहात पुरते अडकलेल्या माणसांचा मुक्तिदाता, बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्वाला अनेक पैलू होते, ज्ञानाबद्दल प्रचंड लालसा बसणारा हा आधुनिक विज्ञानेश्वरच, ज्ञानच माणसाला मुक्त करू शकते आणि सर्व अविद्येचे तेच मुख्य कारण आहे, ही त्यांची समाजशास्त्रीय मीमांसा, कष्ट करणारा पंडित, विचार आणि विवेकाचा मिलाफ असलेले व्यक्तिमत्व. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे दलितांचे मुक्तीदाते आणि भारतीय संविधानाचे निर्माते म्हणून पाहिले जाते. तथापि, त्या पलिकडेही बासाहेबांच्या व्यक्तीमत्वाचे अनेक पैलू आहेत, ज्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. याखेरीज एक द्रष्टे विचारवंत, समाजशास्त्रज्ञ, समाजचिंतक, अत्युत्कृष्ट पत्रकार, महान लेखक, थोर वक्ता अशा अनेक भूमिकांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर या देशाचा विचार करताना आढळतात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतीविषयी केलेले चिंतन आणि दूरदृष्टी आजही अवलंबने अत्यंत गरजेचे आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे जगद्विख्यात अर्थतज्ज्ञ होते. त्यांनी शेतीच्या प्रश्नाविषयी मुलभूत अभ्यास केलेला होता. शेतीचा नेमका प्रश्न काय आणि त्यावर काय उपाययोजना केल्या पाहिजेत, याविषयी त्यांनी केलेली मांडणी आजही दीपस्तंभासारखी मार्गदर्शक आहे. कृषी विज्ञान व तंत्रज्ञानाची सांगड घालून डॉ. आंबेडकर यांना अपेक्षित असणारा कृषी विकास साधता येईल. डॉ. आंबेडकर हे कायदे तज्ञ होते राजकीय विचारवंत होते जागतिक राजकीय विचारांचा आणि राजकारणाचा त्यांचा गाढा व्यासंग होता. भारतीय समाज व्यवस्थेत अंतर्भूत असलेली अस्पृश्यता ही एक सामाजिक समस्या आहे याचा कोणी विचारच केला नव्हता उलट अस्पृश्यता पाळणे म्हणजे धर्मानुसार आचरण करणे होय असेच मानले जात होते कारण अस्पृश्यतेच्या प्रश्नाचे सामाजिक दृष्टिकोनातून कोणी अध्ययनच केले नव्हते. अस्पृश्यता ही हिंदू धर्मातील एक धर्म मान्य रूढी आहे असाच लोकांचा होता अस्पृश्यतेचे पालन करणे हाच आपला धर्म आहे असे सामाजिक आणि धार्मिक नियमाद्वारे हिंदू लोकांच्या मनावर बिंबवण्यात आले होते म्हणून गुलामगिरीच्या समस्ये पुढे अस्पृश्यतेचे समस्या काहीच नाही असे एकंदरीत समाजाची विचारसरणी होती.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर थोर समाजचिंतकाने संस्कृती पुरुष होते त्यांना अमोलग्रह समाज परिवर्तन हवे होते महाराष्ट्रातील अनेक समाजकारणी व राजकारण्याप्रमाणे वृत्तपत्राच्या माध्यमातून समाजवादी होईल यावर त्यांचा विश्वास होता त्यांनी एक निष्ठावान संपादक आणि सव्यसाचे लेखक म्हणून वृत्तपत्रसृष्टीत पाऊल ठेवले पत्रकार म्हणून कोणी संबोधले काय किंवा संबोधले नाही या त्यांना स्वाराष्ट्र नव्हते. अस्पृश्याबरोबरच पुरुषाचे विचार जागृत करून आत्मपरीक्षण करण्यासाठी वृत्तपत्राच्या माध्यमातून त्यांनी परा कष्ट केले डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या 'मूकनायका' ने (१९२०) 'बहिष्कृत भारता' ती(१९२७ ) ' जनता (१९३० ) प्रबुध्द भारत ची (१९५६) दीक्षा दिली एक मनवंतर घडले आंदोलने आणि विचार या दोन्ही साधनांचा अत्यंत समृद्ध आणि संपन्न असा उपयोग त्यांनी केला वृत्तपत्र हे त्यांचे समर्थ माध्यम होते त्यांच्या वृत्तपत्रातून साकारते ती बाबासाहेबांचे नैस्टिक ध्येयवादी आणि निर्भीड पत्रकार ही प्रतिमा.



**- डॉ. सदाशिव देवकर**
इतिहास विभागप्रमुख
सांगोला महाविद्यालय, सांगोला. मो.क्रं. ९०११५६४००१

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# बाजार समितीचे त्रांगडे सुटेना; बिनविरोधबाबतही शंकाच!

## माजी सभापती मानेंची भूमिका महत्वाची तर देशमुखांची गुलदस्त्यात; राजकीय हालचाली नसल्याने संभ्रमवस्था

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**


**सर्वाधिक उलाढाल असलेली बाजार समिती अशी ओळख असलेल्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक लागली असून अर्ज माघारीची घटिका समिप आली असतानाही बाजार समिती सत्तेचे तांगडे सुटत नसल्याचे चित्र आहे. निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता कमी असल्याने राजकीय नेत्यांच्या भूमिकेकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. बाजार समितीचे माजी सभापती माजी आमदार दिलीप माने, आ. विजयकुमार देशमुख यांची भूमिका महत्वाची आहे तर आ. सुभाष देशमुख यांनी देखील मैदानात उतरण्याचे संकेत देत दंड थोपटले आहेत. आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष शहाजीभाऊ पवार यांच्यासह बाजार समितीचे माजी संचालक सुरेश हसापुरे, बाळासाहेब शेळके आदींचीही भूमिका निर्णायक असणार आहे. राजकीय हालचालींना वेग नसल्याने मतदारांमध्ये संभ्रमावस्था दिसत आहे.**









सोलापूर बाजार समितीवर एकूण १७ संचालक असून यापैकी दोन व्यापारी तर एक हमाल गटातून निवडून येतो. उर्वरित १४ सदस्य हे राजकीय पार्श्वभूमी असलेले असतात. निवडणुकीत प्रत्यक्ष पक्षाचे लेबल कोणाला नसले तरी संबंधित उमेदवार कोणत्या तरी पक्षाचा अथवा पॅनलचा सूत्रधार कोणत्या तरी राजकीय पक्षाचाच असतो. दक्षिण सोलापूर आणि उत्तर सोलापूर हे दोन तालुके कार्यक्ष असलेल्या सोलापूर बाजार समिती निवडणुकीत ११ सोसायट्यांचे आणि चार ग्राम पंचायतींचे मतदार मतदान करतात. एका सोसायटीमध्ये १३ मतदार असतात तर प्रत्येक ग्रामपंचायतीचे सरासरी मतदान ११ च्या आसपास असते.

बाजार समितीच्या निवडणुका कोणत्याही राजकीय पक्षाच्या चिन्हावर लढवल्या जात नाहीत. तर स्थानिक नेत्यांकडून सर्वपक्षीय पॅनल तयार करून या निवडणुकीत रंगत आणली जाते. बाजार समितीवर प्रशासक येण्यापूर्वी मागणी पाच वर्षे भाजपाचे आ. विजयकुमार देशमुख हे बाजार समितीचे सभापती होते. तर गेल्या काही वर्षापूर्वी बाजार समितीचा कारभार वादग्रस्त ठरला होता तर मागीलवेळी बाजार समितीवर पडद्यामागून भाजपाचेच वर्चस्व होते. यंदा बाजार समितीची निवडणुक रंगतदार होण्याची शक्यता आहे. कारण या निवडणुकीत ३८८ उमेदवारांनी तब्बल ४५० उमेदवारी अर्ज दाखल केलेले आहेत. येत्या १६ एप्रिल रोजी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत आहे. अर्ज माघारीनंतरच या निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.

**प्रशांत माने**
**मो. ९८८११९१४४३**

केंद्र आणि राज्यात भाजपाची सत्ता असल्याने यंदाही बाजार समितीवर भाजपाचे वर्चस्व असावे असे प्रयत्न सुरु आहेत. या कार्यक्षेत्रात भाजपाचे चार आमदार कार्यरत आहेत. चार आमदार असले तरी यांच्याकडे निवडणुक जिंकतील अशी पुरेशा मतदार संख्येचा अभाव असल्याचे जाणवते. त्यामुळे चारही आमदारांनी एकत्र येत काही रणणिती आखली तरी मतदारांची जुळवाजुळव करणे तसे कठीणच आहे. तर याउलट काँग्रेसचे माजी आमदार दिलीप माने, सुरेश हसापुरे, बाळासाहेब शेळके, राजशेखर शिवदारे, चाकोते यांच्याकडे मतांची बेगमी आहे.

भाजपाच्या नेत्यांची तोंडे वेगवेगळ्या दिशेला असल्याने या निवडणुकीत काँग्रेस नेत्यांच्या भूमिका केला महत्व आलेले आहे. मागील पाच वर्षे बाजार समितीचे सभापती राखणारे आ. विजयकुमार देशमुख यंदा निवडणुकीच्या मैदानात नसले तरी पडद्यामागून त्यांची भूमिका महत्वाची ठरणार आहे. तर मागील निवडणुकीत अयशस्वी ठरलेले आ. सुभाष देशमुख यांनी भाजपा कार्यकर्त्यांसाठी बाजार समिती निवडणुक लढणारच असे दंड थोपटले आहेत. आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे, शहाजीभाऊ पवार हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे दूत म्हणून या निवडणुकीत काय भूमिका बजावतात याकडेही सर्वांचे लक्ष लागलेले आहे. भाजपाचे चार आमदार असतानाही सत्तेची जुळवाजुळव तशी अवघडच आहे. बाजार समिती निवडणकीची जुळवाजुळव करण्याची जबाबदारी मुख्यमंत्र्यांनी शहाजी पवार यांच्याकडे यांच्याकडे दिल्याचे वृत्त आहे. या भूमिकेतून पवारांनी नेत्यांच्या भेटीगाठी सुरु केल्या आहेत. सुवर्णमध्ये काढून बाजार समितीमध्ये योग्य ता वाटा मिळवत भाजपाची लाज राखण्याची किमया ते पार पाडणार का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

या निवडणुकीत विजयासाठी निर्णायक भूमिकेत असलेले दिलीप माने यांचे महत्व ओळखून नुकतेच जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देत स्नेहभोजनाचा आस्वाद घेतलेला आहे. या निवडणुकीत पालकमंत्र्यांची थेट भूमिका नसली तरी शासनाचा दूत आणि पालकमंत्री म्हणून ते बिनविरोध निवडणुकीसाठी यशस्वी मध्यस्थी करू शकतात. दिलीप माने, हसापुरे, शेळके, शिवदारे, चाकोते या काँग्रेसच्या गटाचे नेतृत्व कोणाकडे हे गुलदस्त्यात आहे. कारण काँग्रेसचे नेते सुशीलकुमार शिंदे सोलापूर दौऱ्यावर आहेत पण या विषयावर काही चर्चा नाही तर खा. प्रणिती शिंदे या निवडणुकीपासन अद्याप अलिप्त असल्याचेच चित्र आहे.

अर्ज माघारची मुदत १६ एप्रिल असून १५ व १६ एप्रिल हे दोन दिवस नेत्यांमध्ये वाटाघाटीच्या हालचाली वाढण्याची शक्यता आहे. सर्वपक्षीय जुळवाजुळव होणार का? निवडणुकीचा निकाल काय लागणार, सभापती कोण होणार हे कळीचे मुद्द असणार आहेत. अन्यथा पुन्हा प्रशासक राज येणार अशा देखील चर्चा रंगल्या आहेत.

### बाजार समिती शेतकऱ्यांची अन् राजकारण मात्र नेत्यांचे

खऱ्या अर्थाने कृषी उत्पन्न बाजार समितीचा केंद्रबिंदू हा शेतकरी राजा होय. परंतु या शेतकऱ्याला बाजार समितीचा खरोखर किती लाभ होतो हा विषय संशोधनाचा आहे. बाजार समितीच्या वतीने शेतकऱ्यांना कितपत सोयी-सुविधा मिळतात, शेतमाल विक्रीसाठी घेऊन येणाऱ्या शेतकऱ्यांच्या निवाऱ्याची, भोजनाची, सुरक्षिततेची सोय कितपत होते याबाबतही संदिग्धताच आहे. शेतीमालाची नासाडी, चोऱ्या हा तर शेतकऱ्यांच्या पाचवीला पूजलेला भाग आहे. बाजार समितीच्या सत्तेकडे कुरण म्हणून निवडणुकीत उतरणाऱ्या आणि पाच वर्षे सत्तेकडे मलिदा म्हणून पाहणाऱ्यांनी बळीराजाचे ऋण फेडण्यासाठी प्रयत्न करण्याची खरी गरज आहे.



## संजय घाडी, संजना घाडी यांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश

**मुंबई, दि.१३ एप्रिल-**


शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे माजी नगरसेवक संजय घाडी आणि उपनेत्या प्रवक्त्या संजना घाडी, व मागाठाणे विधानसभेतील अनेक उप शाखाप्रमुख, गट प्रमुख, शाखाध्यक्ष आणि युवा सेनेच्या कार्यकर्त्यांनी आज शिवसेना मुख्य नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत प्रवेश केला. त्यानंतर संजना घाडी यांची शिंदे गटाच्या शिवसेनेच्या उपनेते आणि प्रवक्तेपदी नियुक्ती जाहीर करण्यात आली.

यावेळी माजी नगरसेवक राम रेपाळे ,विधान परिषद उपसभापती आणि शिवसेना नेत्या आमदार डॉ. निलम गोऱ्हे ह्या उपस्थित होत्या. पक्ष प्रवेशाने महापालिका निवडणुकीपूर्वी ठाकरे गटाला धक्का बसला आहे. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत राज्यातील जनतेने महायुतीला ऐतिहासिक विजय मिळवून दिला. या निवडणुकीत ८० जागा लढवून ६० जागा जिंकलो तर कोणी १०० जागा लढवून २० जागा जिंकल्या, यावरुन खरी शिवसेना कोणाची यावर जनतेने शिक्कामोर्तब केले. त्यांच्या आरोपाला आरोपातून नाही तर कामातून उत्तर दिले.

## चित्रलेखाचे सामाजिक आणि साहित्यिक योगदान महत्त्वपूर्ण : अमित शहा

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. १३ एप्रिल-**

चित्रलेखाचे सामाजिक आणि साहित्यिक योगदान महत्त्वपूर्ण आहे. चित्रलेखा हे केवळ एक साप्ताहिक नसून, साहित्य, समाजजीवन आणि प्रश्नांचे आरसा असल्याचे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केले. तर वाचकांच्या मनात चित्रलेखाने आपले स्थान निर्माण केले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



विलेपार्ले येथील मुकेश पटेल सभागृहात साप्ताहिक चित्रलेखाच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त शनिवारी झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पियुष गोयल, राज्याचे कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, पणन, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांच्यासह चित्रलेखाचे अध्यक्ष मौलिक कोटक, मेनन कोटक, अभिषेककुमार चौहान, अभिनेत्री सरिता जोशी आदी उपस्थित होते. हरकिशन मेहता, तारक मेहता यांच्यापासून ते मनन कोटकपर्यंतच्या परंपरेचा उल्लेख करत, हे साप्ताहिक नफ्यापेक्षा मूल्याधारित हेतूनं चालवले जाते, असे स्पष्ट करुन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले, आरक्षण आंदोलन, नर्मदा प्रकल्प, २६/११ दहशतवादी हल्ला यांसारख्या संवेदनशील विषयांवर चित्रलेखाने निर्भीडपणे लेखन केले आहे. 'लिख दो मेरे रोम रोम में राम' या विशेषांकाचा उल्लेख करत राम मंदिर विषयावरही साप्ताहिकाचे योगदान अधोरेखित केले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, साप्ताहिक चित्रलेखाने ७५ वर्षे वाचकांच्या हृदयावर राज्य केले आहे. मराठी, गुजराती वाचकांच्या मनात चित्रलेखाने आपले स्थान निर्माण केले आहे. कोरोना कालावधीनंतर आज मासिक चालवणे कठीण असतानाही चित्रलेखा हे मासिक वाचकांच्या प्रेमामुळेच सुरू आहे. चांगल्या साहित्याची गरज असलेल्या संवेदनशील समाजाला चित्रलेखाने योग्य दिशा दिली. चित्रलेखा मराठी प्रकाशन काही काळासाठी बंद झाले असले तरी किमान त्याचे इंटरनेट आवृत्ती पुन्हा सुरू करण्याचे आवाहनही त्यांनी कोटक कुटुंबीयांना केले.

## न्या. भूषण गवई बनणार देशाचे ५२ वे सरन्यायाधीश

### १४ मे रोजी घेणार शपथ

**मुंबई, दि.१३ एप्रिल-**

देशाचे विद्यमान सरन्यायाधीश संजीव खन्ना यांचा वारसा निश्चित झाला आहे. ते निवृत्त झाल्यानंतर पुढील सरन्यायाधीश पदावर महाराष्ट्रातील प्रसिद्ध विधिज्ञ आणि आंबेडकरी चळवळीचा वारसा लाभलेले न्यायमूर्ती भूषण गवई यांना संधी मिळणार आहे. ते ५२ वे सरन्यायाधीश म्हणून १४ मे रोजी राष्ट्रपती द्रोपती मुर्मू यांच्याकडून सरन्यायाधीश पदाची शपथ घेतील.

न्या. भूषण गवई हे भारतीय रिपब्लिकन पक्षाचे दिवंगत नेते, माजी खासदार आणि बिहार, सिक्कीम व केरळ राज्यांचे राज्यपाल राहिलेल्या रा.सु. गवई आणि कमलाताई गवई यांचे पुत्र आहेत. संजीव खन्ना १४ मे रोजी निवृत होणार असून त्यानंतरचा त्यांचा उत्तराधिकारी निश्चित करण्यात आला आहे.जेष्ठ न्या. गवई यांना या पदावर नियुक्ती होणार असून त्यांना या पदासाठी सहा महिन्यांचा काळ मिळणार आहे. गवई यांचा जन्म अमरावती जिल्ह्यात २४ नोव्हेंबर १९६० रोजी झाला. मुंबईतून कायद्याची पदवी घेतल्यानंतर त्यांनी १९८५ मध्ये वकिलीला सुरुवात केली. काही काळ त्यांनी मुंबई आणि अमरावतीमध्ये काम केले. त्यांनी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दिवंगत बारिस्टर राजा एस. भोसले यांच्यासोबत काम केले. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात ते न्यायाधीश झाले. काही काळानंतर त्यांना बढती मिळाली. ते २४ मे २०१९ रोजी सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश झाले. आता १४ मे २०२५ रोजी ते सरन्यायाधीश पदाची शपथ घेणार आहेत. त्यांना सरन्यायाधीश म्हणून सहा महिन्यांचा काळ मिळणार आहे. ते २३ नोव्हेंबर २०२५ रोजी निवृत्त होतील.

### जनहित याचिकेसाठी दिला एक दिवस

न्यायमूर्ती भूषण गवई यांनी सर्वोच्च न्यायालयात काही नवीन प्रथा सुरु केल्या. त्यांनी जनहित याचिकांच्या सुनावणीसाठी आठवड्यातून एक दिवस निश्चित केला. सर्वसामान्य लोकांसाठी त्यांनी अनेक आदेश दिले. त्यांनी उत्तर प्रदेशात सुरु झालेले आरोपींच्या घरांवरील बुलडोझर कारवाईच्या विरोधात सरकारचा चांगलेच फटकारले होते. सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्तींसमोर वकील मोठ्याने बोलत होते. त्याबद्दल त्यांनी नापसंती व्यक्त केली होती. कडक शब्दांत त्यांनी वकिलांना फटकारले होते

## आमसभेत नगरपालिका, महावितरण आणि पाणीपुरवठा खात्याचे निघाले वाभाडे

### सलग नऊ तास चालली आमसभा

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १३ एप्रिल-**

केवळ लोकप्रतिनिधीवर जनतेचा रोष यावा म्हणून कोणाच्यातरी दबावाखाली वागणाऱ्या कामचुकार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची शिफारस शासनाकडे करणार असल्याचा इशारा खासदार ओमराजे निंबाळकर यांनी दिला. यावेळी आमदार दिलीप सोपल आमसभेच्या अध्यक्षस्थानी होते.




यावेळी तालुक्यातील विविध शासकीय खात्यांचे प्रमुख उपस्थित होते. या आमसभेमध्ये रखडलेल्या ग्रामीण पाणीपुरवठा योजना, तसेच पाणीपुरवठा योजनांची कामे करताना वेगवेगळ्या गावांमध्ये झालेले काँक्रीट रस्त्यांचे उत्खनन, विविध गावांना जोडणाऱ्या रस्त्यांची निकृष्ट दर्जामुळे झालेली दुर्दशा, वेगवेगळ्या गावातले ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त झाल्यानंतर त्यासाठी वीज वितरणकडे करावा लागणारा पाठपुरावा, ट्रान्सफॉर्मर जळाल्यामुळे वस्ती मधल्या अंधाराकडे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष, कमी वेळ वीज असल्यामुळे त्या वेळेत शेतीची कामे करण्यासाठी शेतकऱ्यांना करावा लागणारा आटापिटा, अनेक ठिकाणी पाण्याचे स्त्रोत नसताना केवळ पाणीपुरवठा जलवाहिन्या उभारून आणि टाक्या बांधून झालेली गावाची चेष्टा, प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्याची अनुपस्थिती, पंतप्रधान व मुख्यमंत्री सडक योजनेतील अपूर्ण कामे, कंत्राटदारांनी ठेवलेली प्रलंबित कामे, सेवा हमी कायद्याचा पुरता बट्ट्याबोळ, २०१३ पासून पुरवठा विभागाने तालुक्यात दारिद्र्यरेषेखालील व अंत्योदय योजनेखालील लाभार्थ्यांची न केलेली नोंदणी, लोककल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणी मध्ये झालेला दलालांचा सुळसुळाट, यासारख्या अनेक गैरप्रकारांवर प्रकाशझोत पडला.

यावेळी गेल्या दोन महिन्यात चार अधिकारी व कर्मचारी निलंबित झालेल्या महावितरण खात्यामध्ये नुकताच पदभार स्वीकारलेले अतिरिक्त अभियंता मांडके यांनी आम सभेत मांडले गेलेल्या लेखी प्रश्नांची सुद्धा तयारी केली नसल्याचे जाणवले. मांडके यांना डिसेंबर २०२४ नंतर तालुक्यात सोलार ऊर्जा जनित्र याबाबत आलेले प्रस्ताव व मंजुरी व वितरित झालेल्या सोलारचीही व्यवस्थित माहिती देता आली नाही, त्याचप्रमाणे ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे अभियंता अजितकुमार वाघमारे यांनाही ग्रामीण जनतेच्या असंतोषाला सामोरे जावे लागले.

बार्शी नगरपालिकेचे मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण यांनाही विविध सामाजिक कार्यकर्त्यांनी शहरातील प्रश्नांवर घेरले. नगरपालिकेला नगरठाण योजनेचे ८९ कोटी रुपये मिळवताना पालिकेचा २५ टक्के वाटा शासनाला जमा न करता शासनाची दिशाभूल करून अनुदान उचलल्याचा आरोप त्यांच्यावर झाला.

यावेळी चव्हाण यांनी टप्प्याटप्प्याने हा वाटा पालिका भरणार असल्याचे सांगितले. यावेळी शहरातील शिवसृष्टीला कुंपण भिंत बसवण्याची मागणी शिवप्रेमींनी केली तसेच शिवसृष्टी मध्ये अफजलखानाचा वध व शाहिस्तेखानाची फजिती या दोन महत्त्वाच्या क्षणांचा परिचय करून देणारी शिल्प कामे बसविण्याची मागणी झाली.

यावेळी संतप्त बार्शीकरांनी पाणीटंचाईबाबत व विचारणा केली. यावर मुख्याधिकारी चव्हाण यांनी नूतन पाणीपुरवठा योजनाचे काम १० मे पर्यंत पूर्ण झाल्यानंतर शहराला नियमित पाणीपुरवठा होईल असे सांगितले. शहरामध्ये बसस्थानक ते कोर्ट या रस्त्यावर सार्वजनिक स्वच्छतागृहे नाहीत याकडे कार्यकर्त्यांनी मुख्याधिकाऱ्यांचे लक्ष वेधले. यावेळी यशवंतराव चव्हाण सभागृहाची दुरावस्था, महात्मा फुले भाजी मंडईची झालेली दुर्दशा, तालुक्यामध्ये राजरोसपणे सुरू असणारा गुटखा विक्रीचा प्रकार याकडेही लोकप्रतिनिधींचे लक्ष वेधण्यात आले.

यावेळी खासदार निंबाळकर व आमदार सोपल यांनी जनतेचे उत्तरदायित्व आपल्यावर आहे. आपण शासनाचे नोकर आहोत याचे भान ठेवा. नियमबाह्य पद्धतीने काम करणाऱ्या आणि सतत मुदतवाढ मागणाऱ्या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाका. आणि तालुक्यातील विविध कल्याणकारी योजनांची सद्यस्थिती आणि त्याबाबत आमसभेमध्ये विचारल्या गेलेल्या प्रश्नांना दिलेली उत्तरे व त्याबाबतचे आश्वासने यांची तत्परतेने पूर्तता करा अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागेल असे सुनावले.

स्थानिक व अन्य पदाधिकाऱ्यांच्या दबावाखाली पक्षपाती वर्तन करू नका असे आवाहनही या दोघांनी केले.


## अज्ञात वाहनाने ठोकरल्याने सोड्डी-शिवणगी मार्गावर एकाचा मृत्यू

### अपघातात दोन दिवसात दोघांचा मृत्यू; चालक मात्र झाले फरार

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.१३ एप्रिल-**

सोड्डी फाटा ते शिवणगी हायवे रोडवर रस्ता ओलांडताना अज्ञात वाहनाने एका व्यक्तीस जोराची धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला असल्याची घटना घडली असून या प्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी सिकंदर इनामदार (रा. शिवणगी) यांचे भाऊ ख्वाजासो इनामदार (वय ६२) हे दि.११ रोजी सोड्डी फाटा ते शिवणगी हायवे रस्ता ओलांडून पायी चालत असताना अज्ञात वाहनावरील चालकाने त्याच्या ताब्यात असलेले वाहन अविचाराने चालवून मयतास गंभीर जखमी करुन मृत्यूस कारणीभूत झाला असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत. दरम्यान मंगळवेढा तालुक्यात अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून मागील दोन दिवसात अज्ञात वाहनाने जोराची धडक दिल्याने दोघांचा मृत्यू झाला असून यातील दोन्ही वाहने अपघातानंतर फरार झाली आहेत. परिणामी याचा तपास लागणार का? असा सवालही



सुज्ञ नागरिकामधून केला जात आहे. सध्या तालुक्यात सुपर रोड झाल्यामुळे वेगावर चालकांचे नियंत्रण नसल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढत आहे. अपघात झाल्यानंतर पोलीसांना खबर देणे ही त्या चालकाची नैतिक जबाबदारी असताना असे कुठेही आढळून येत नाही. लाख मोलाचा माणसाचा जीव जातो व चालक सहीसलामत अपघात झाल्यानंतर पळून जातात. त्यामुळे मयतास न्याय मिळणे दुरापास्त बनत चालले आहे. सध्या उपप्रादेशिक परिवहन कार्यालय ते तालुक्याच्या ठिकाणी लायसन्ससाठी भरणाऱ्या कॅम्प मध्ये एजंटदारांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने चालकांची कुठलिही परीक्षा न घेता दामाजी घेवून थेट लायसन्स दिली जात असल्यामुळे जवळपास ८० टक्के अपघाताचे प्रमाण यामुळेच घडत असल्याचा आरोप नागरिकांचा आहे. सोलापूर येथील उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी एजंटगिरी हद्दपार करुन चालकाची वाहतूकीच्या नियमांची परीक्षा घेवूनच लायसन्स दिल्यास ती लायसन्स घेण्यास व वाहन चालविण्यास खरे पात्र असतील अशा भावनाही व्यक्त होत आहेत.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# वक्फ सुधारणा आवश्यकच होती

समाजातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी सुधारणा करणारे कायदे महत्त्वाचे ठरतात. असे असताना संसदेच्या दोन्ही सभागृहांत वक्फ दुरुस्ती विधेयक मंजूर झाल्याच्या घटनेची नोंद घ्यावी लागेल. समाजातील धार्मिक तसेच सांस्कृतिक घटकांमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने टाकलेले हे एक पाऊल आहे. म्हणूनच या कायद्याचा इतिहास, बदलाची आवश्यकता आणि त्याच्या परिणामांचा सखोल विचार करणे आवश्यक ठरते. वक्फ किंवा वक्फ बोर्ड ही संकल्पना भारतात स्वातंत्र्यपूर्व काळापासून अस्तित्वात आहे. मुघलांच्या आधीची सल्तनत 'दिल्ली सल्तनत' म्हणून ओळखली जाते. त्याद्वारे सर्वप्रथम भारतात वक्फची संकल्पना आली. मोईजुद्दीन घौर तेव्हाचे शासक होते. त्यांनी दोन गावे वक्फ म्हणून जामा मशिदीच्या संतांच्या हाती दिली. संकल्पना अशी की, कोणतीही चल वा अचल मालमत्ता धर्मकार्य, दान स्वरूपात आपण वक्फ म्हणून देऊ शकतो. पण कोणी ही मालमत्ता विकू शकत नाही, दुसऱ्याला भेट स्वरूपात देऊ शकत नाही. त्याची जन्मजात मालकी मिळू शकत नाही आणि ती गहाण ठेवू शकत नाही. या सगळ्या महत्त्वाच्या बाबी अत्यंत काटेकोरपणे पाळणे अपेक्षित होते.

इतिहासाचा धांडोळा घेतला तर 'लॅंग्वेजेस ऑफ पॉलिटिकल इस्लाम' या पुस्तकात अभ्यासक मुजफ्फर आलम म्हणतात की, इंग्रज येण्याआधी भारतात धर्मांतराशी वक्फचा जवळचा संबंध होता. म्हणजेच लोकांकडून दान, मदत म्हणून दिल्या जाणाऱ्या जमिनींचा वापर इस्लामेतर व्यक्तींचे धर्मांतर घडवून आणण्यासाठी मोठ्या प्रमाणावर केला गेला. पुढे रिचर्ड अर्टन यांचे पुस्तक आले. त्यांनी आपल्या 'अॅप्रोचेस टू स्टडी ऑफ कन्व्हर्जन टू इस्लाम इन इंडिया' नामक पुस्तकातही वक्फशी सुफी संतांचा जवळचा संबंध होता आणि याच्या साह्याने धर्मांतर केले जात असे, असे म्हटले आहे. ब्रिटिश काळात या व्यवस्थेत फारसा हस्तक्षेप केला गेला नाही. त्यांनी वक्फमधील अनागोंदी, गैरव्यवहार याकडे कानाडोळा केला. थोडक्यात वक्फच्या प्रशासनात ढवळाढवळ केली नाही. मुळातला वक्फ कायदा १९२३ चा होता. त्यानुसारच सगळ्या वक्फ मालमत्ता व्यवस्थापित होत असत. मात्र स्वातंत्र्यानंतर १९५४ मध्ये भारत सरकारने वक्फ कायदा पारित केला आणि त्यातून वक्फच्या मालमत्तांचे प्रशासकीय अधिकार केंद्रीय पद्धतीने करण्याचा प्रयत्न केला. याच कायद्यांतर्गत वक्फ बोर्डाला अनेक अधिकारही दिले गेले. मात्र यावरूनच मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त झाली. भारत सरकार यात का दखल देत आहे, असे म्हणत रोषही व्यक्त झाला. एकूणच वक्फ बोर्डाने सरकारी हस्तक्षेप अजिबात मंजूर केला नाही.

या पृष्ठभूमीवर वक्फ सुधारणा विधेयक मंजूर होऊन आता हा कायदा लागू करण्यात आला आहे. त्या अंतर्गतही वक्फ बोर्डातील प्रशासकीय यंत्रणा, कारभार सुनियंत्रित करण्याचा विचार आहे. वक्फ बोर्डाच्या मॅनेजमेंटमध्ये सुधारणा करणे, हाच या दुरुस्तीमागील मुख्य हेतू आहे. याविषयी बोलताना गृहमंत्री अमित शाह यांनी अनेक मुद्यांना स्पर्श केला. वक्फ ही संकल्पना केवळ मुसलमानांसाठी लागू होते. असे असताना आधी मुस्लिमेतर समाजातील लोकांच्या जमिनीदेखील वक्फ बोर्ड हडपत होते. त्यामुळेच शाह यांनी मुस्लिमेतर समाजाची मालमत्ता वक्फ बोर्डाच्या अंतर्गत येऊ शकत नाही, ही बाब स्पष्ट केली. त्यामुळेच पुढील काळात वक्फ बोर्डाने हडपलेल्या मुस्लिमेतर समाजाच्या मालमत्ता मूळ मालकांना परत मिळण्याची शक्यता वाढली आहे. मुळात इथे सरकारला मुस्लिम समूहाच्या धार्मिक बाबींमध्ये वा त्यांना मिळणाऱ्या देणग्यांमध्ये दखल देण्याची अजिबात इच्छा दिसत नाही. सरकार या बाबींमध्ये हस्तक्षेप करू इच्छित नाही. दुसरी बाब म्हणजे वक्फ बोर्डावर सरकार कोणत्याही मुस्लिमेतर व्यक्तीला बसवणार नाही. खेरीज वक्फच्या कोणत्याही ऑफिसमध्ये मुस्लिमेतर व्यक्तीची नोंद करण्यात येणार नाही. प्रत्येकाला आपापल्या धर्मांचे पालन करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. हे भारताच्या संविधानातच सांगितले आहे. मात्र, एखाद्यामध्ये लालसा उत्पन्न करण्यासाठी, घाबरवण्यासाठी किंवा एखादा लाभ दाखवून धर्मांतर करण्यास भाग पाडणे आणि त्यासाठी वक्फच्या मालमत्तेचा गैरवापर करणे नियमबाह्य असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

खेरीज केंद्रीय गृहमंत्र्यांनी हेदेखील स्पष्ट केले की, वक्फ बोर्डामधील कोर्ट-खटले वा कोणत्याही प्रकारच्या तक्रारी न्यायालयापुढे नेल्या पाहिजेत. ते वक्फ न्यायाधिकरणात जाऊन चालणार नाही. कोर्टातच याचा सोक्षमोक्ष लागला पाहिजे. जमिनीचे रेकॉर्ड ठेवणे वा यासारख्या गोष्टींसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे काही अधिकार आहेत. त्यामुळे वक्फ बोर्डातील काही अनागोंदी वा तक्रारींसंदर्भात जिल्हाधिकारीही लक्ष घालू शकतात. याचे कारण असे की, कर्नाटकमधील दत्तपीठ देवळाच्या जमिनीवर वक्फ बोर्डाने मालकी सांगितली आहे. इतकेच नव्हे, तर ख्रिश्चन समुदायाच्या अनेक मालमत्तांवरही त्यांनी दावा केला आहे. कब्जा करण्याचा प्रयत्न केला आहे. तेलंगणातील ६६ हजार कोटी रुपये किमतीच्या १७०० एकर जमिनीवरही वक्फ बोर्डाने कब्जा करण्याचा प्रयत्न केला. हे सर्व लक्षात घेता सरकारने उचललेले हे महत्त्वाचे पाऊल म्हणावे लागेल. यापुढेही वक्फ बोर्डाला देणगी देणारे, त्याचे नियमन करणारे पूर्वीच्याच पद्धतीने काम करतील. त्यात सरकार हस्तक्षेप करणार नाही. मात्र नियमनाच्या आणि गैरव्यवहार रोखण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची राहील. एखादी जमीन खरेच वक्फची आहे की सरकारची, हे जाणून घेण्याचे अधिकार या पदावरील व्यक्तीला मिळतील. शेवटी कोणत्याही जमिनीवरील हक्क वा मालकीची प्रकरणे जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिकार क्षेत्रात येतात. तेव्हा आपण दुसरी पर्यायी यंत्रणा राबवू शकत नाही, असे केंद्र सरकारने यायोगे स्पष्ट केले आहे.

दुसरी आणि सगळ्यात महत्त्वाची बाब म्हणजे अलिकडच्या या दुरुस्तीकडे एकटेपणाने नव्हे तर एकत्रितपणे बघायला हवे. म्हणजेच सीएए (सिटिझनशिप अमेंडमेंट अॅक्ट), ट्रिपल तलाकशी संबंधित कायदा या सगळ्याद्वारे सरकार अल्पसंख्यकांचे रक्षण करण्याचा प्रयत्न करताना दिसते. कारण यामध्ये विधवा, अनाथ भरडले गेले आहेत. वक्फ बोर्डाने मालमत्ता हडपल्यामुळे काहींना प्रचंड त्रास सहन करावा लागला आहे. या लोकांना जाणीवपूर्वक मिळकतीपासून दूर ठेवण्यात आले आहे. त्यामुळेच ही दुरुस्ती अडचणीत आलेल्या अल्पसंख्यक समाजाला योग्य ती कायदेशीर मदत पुरवू शकेल, यात शंका नाही.

जगभरातले इराण, इराक, सीरिया, टर्की यासारखे अन्य मुस्लिम देश बघितले तर तिथे प्रत्येक ठिकाणीही वक्फची कार्यपद्धती नियंत्रित करण्यासाठी केंद्रीय कायदे असल्याचे दिसते. तेथेही कोणत्याही एका बोर्डाला देणगी वा भेट स्वरूपात मिळालेली मालमत्ता सांभाळण्याचे वा त्याविषयीचे निर्णय घेण्याचे स्वायत्त अधिकार मिळत नाहीत. कारण असे अधिकार असणे कायदा-सुव्यवस्था आणि सुप्रशासनामध्ये बाधा आणणारी बाब आहे. म्हणूनच ताजी दुरुस्ती भारतातील यासंबंधीच्या कायद्यातील त्रुटी दूर करेल. वक्फ बोर्डाने अनेकांच्या जमिनी घेतल्या असून, त्यातून लाखोंची मिळकत येत आहे. अशा प्रकारे अयोग्य पद्धतीने लाटलेल्या जमिनी मूळ मालकांना, त्यांच्या वारसांना परत मिळाल्या तर अनेकांना मोठी मदत होईल. तेव्हा मतपेटीकडे डोळा ठेवून मुस्लिम समुदायाला भ्रमित करण्याचा आरोप इथे होता कामा नये. इथे हेदेखील लक्षात घ्यायला हवे की, काँग्रेसचे सरकार असतेवेळी २००६ च्या काळात जस्टिस सच्चर समितीचा अहवाल आला होता. त्यामध्येदेखील वक्फच्या कार्यपद्धतीमध्ये बदल करण्याची आवश्यकता स्पष्टपणे मांडण्यात आली होती. वक्फ बोर्डाकडे येणारी मिळकत त्यांच्या ताब्यात असणाऱ्या जमिनींच्या तुलनेत अत्यंत कमी असल्याचे समितीने निदर्शनास आणून दिले होते. समितीच्या माहितीप्रमाणे बोर्डाकडे असणाऱ्या मालमत्तेतून किमान १२ हजार कोटी रुपयांचा महसूल मिळणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात मात्र त्याच्या एक-दोन टक्केही मिळकत नाही. म्हणूनच आता या सर्व त्रुटी दूर होतील आणि बोर्डाचा स्वच्छ कारभार अनुभवायला मिळेल, अशी आशा वाटते.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# बांगलादेशही चीनचा मांडलिक?

भारताभोवती 'गळफास' तयार करण्याच्या ज्या योजनेवर चीन मागील काही वर्षांपासून काम करीत होता, त्याचा शेवटचा अध्याय संपलेल्या आठवड्यात चीनची राजधानी बीजिंगमध्ये लिहिला गेला. ज्या बांगलादेशच्या स्वातंत्र्यलढ्यात भारताने निर्णायक भूमिका बजावली, तो बांगलादेशही चीनचा मांडलिक झाला.

**भारताचा तडाखा :** बांगलादेशच्या या भूमिकेच्या विरोधात भारताने या देशाला एक तडाखा देत भूतान, नेपाळ व म्यानमार या देशांशी बांगलादेशचा व्यापार अवघड करून टाकला. भारताने २०२० मध्ये एक निर्णय घेत बांगलादेशला या देशांशी व्यापार करणे सुगम- सोपे व्हावे म्हणून त्याला आपल्या भूमीवरील कस्टम केंद्रावरून व्यापारी सामानाची वाहतूक करण्याची परवानगी दिली होती. यामुळे बांगलादेशला नेपाळ, म्यानमार, भूतान या देशांना निर्यात करणे सोपे झाले होते. भारताने आता ही सवलत काढून घेतल्याने बांगलादेशला आपल्या वस्तूंची या देशांना निर्यात करणे अवघड जाईल.

**चिनी कारस्थान :** चीन शांतपणे, कोणताही गाजावाजा न करता भारताच्या विरोधात कोणते व कसे कारस्थान करीत आहे याचे नेमके वर्णन दोन दशकांपूर्वी प्रकाशित झालेल्या 'चायनीज नायटमेर, अमेरिकाज ड्रीम- इंडिया एज द नेक्स्ट ग्लोबल पॉवर' या विल्यम एवरीच्या पुस्तकात करण्यात आले आहे आणि दोन दशकांतील सारा घटनाक्रम या पुस्तकातील वाक्यन् वाक्य खरा ठरविणारा राहिला आहे. बांगलादेशचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस नुकतेच चीनच्या दौऱ्यावर जाऊन आलेत. चीनच्या राष्ट्रपतींची त्यांची फार सुखद भेट झाली असावी असे दोघांच्या छायाचित्रावरून दिसून येते.

**अंदाज खरा ठरला :** बांगलादेशात वर्षभरापूर्वी जो सत्ताबदल घडवून आणण्यात आला, त्यात पाकिस्तानची आयएसआय व चीन दोघांचाही सहभाग असावा असा एक कयास बांधला जात होता तो खरा असावा असे आता घडत असलेल्या घटनांवरून वाटते. पाकिस्तान-बांगलादेश हे परस्परांचे कट्टर शत्रू. आता या दोघांमध्ये सलोखा झाला. बांगलादेश-चीन यांच्यातही फार सुखद संबंध नव्हते. आता त्यांच्यातही सलोखा तयार होत असताना दिसत आहे. याचा अर्थ बांगलादेशातील सत्ताबदल हा काही स्थानिक नव्हता, तर तो घडविण्यात आला होता असा स्पष्ट निष्कर्ष काढला जात आहे.

**'रॉ'चे अपयश :** चीन व पाकिस्तान बांगलादेशात एवढी मोठी उलथापालथ घडवून आणण्याचे कारस्थान करीत असताना भारताच्या 'रॉ' या गुप्तचर संस्थेला याचा मागमूसही लागू नये याचे आश्चर्य वाटते. 'रॉ'ने अनेकदा देशासाठी उल्लेखनीय कामगिरी बाजवली आहे. विशेषत: १९९९ मध्ये कारगिल युद्ध सुरू असताना, पाकिस्तानचे लष्करप्रमुख बीजिंगच्या दौऱ्यावर होते. त्यांनी आपल्या हॉटेलमधून इस्लामाबादला केलेला दूरध्वनी 'रॉ'ने टेप केला होता आणि ते संभाषण भारतासाठी फार मोलाचे ठरले होते. यावेळी 'रॉ'ला बांगलादेशात होत असलेल्या घटनाक्रमाचा काहीच सुगावा लागू नये? 'रॉ'च्या काही अधिकाऱ्यांच्या या अपयशाची मोठी किंमत भारताला मोजावी लागली आणि आता बांगलादेश चीनच्या घशात गेल्यासारखाच आहे.



**वादग्रस्त विधान :** भारताच्या पूर्वोत्तर भागावर भाष्य करीत मोहम्मद युनूस यांनी 'हा सारा भाग भूभागाने वेढलेला आहे आणि बांगलादेशचा समुद्रकिनाराच काय तो या भागाचा संरक्षक आहे' असे वादग्रस्त विधान केले आहे. चीनने बांगलादेशात भरपूर गुंतवणुक करावी, आम्ही त्यांच्या स्वागतासाठी सज्ज आहोत असेही युनूस म्हणाले असल्याचे प्रसिद्ध झाले आहे. चीन-बांगलादेश यांच्यात एवढी जवळीक व्हावी हे जरा आश्चर्यकारक आहे. या दोन देशांत एवढी जवळीक कधीही नव्हती. बांगलादेशने चीनला एकप्रकारे आपल्या देशात हात-पाय पसरण्यासाठी निमंत्रण दिलेले आहे. भारतासाठी यापेक्षा धक्कादायक घटना कोणती असू शकेल? भारताला कोंडीत पकडण्याच्या चीनच्या कारस्थानात भूतान, नेपाळ, पाकिस्तान, श्रीलंका, मालदीव या देशांवर चीनची पकड मजबूत झाली आहे . भारताच्या शेजारी देशांपैकी फक्त बांगलादेश काय तो भारताच्या बाजूने खंबीरपणे उभा होता. अर्थात शेख हसीना पदावर असेपर्यंत. त्यांनी चीनशी सामान्य संबंध ठेवले होते पण त्यांचा कल भारताकडे होता. त्या पदच्युत झाल्यापासून चीन-बांगलादेश जवळीक वाढत गेली आणि आता मोहम्मद युनूस यांच्या ताज्या चीन भेटीने ही जवळीक समोर आली आहे.

**मुख्य अडसर :** बांगलादेशच्या पदच्युत पंतप्रधान शेख हसीना यांना नवी दिलीत राजकीय आश्रय देण्यात आला आहे. भारत सरकारचा हा निर्णय योग्य असाच आहे. बांगला देशात हसीना यांच्या विरोधात काही खटले दाखल करण्यात आले आहेत. त्यासंदर्भात भारताने त्यांना आपल्या ताब्यात द्यावे अशी मागणी बांगलादेशने भारत सरकारकडे केली आहे. भारत ही मागणी मान्य करू शकत नाही. भारताने ही मागणी मान्य करता कामाही नये. बांगलादेशची ही मागणी केवळ एक निमित्त असल्याचे मानले जाते. बांगलादेशला चीनच्या गोटात दाखल व्हावयाचे आहे. त्यासाठी एक निमित्त म्हणून त्याने शेख हसीना यांच्या प्रत्यार्पणाची मागणी केली जात आहे. भारत शेख हसीना यांना आपल्या ताब्यात देणार नाही याची पूर्ण कल्पना बांगलादेश सरकारला आहे. आजवर भारतासाठी बांगलादेशची सीमा सुरक्षित मानली जात होती. आता ती स्थिती राहणार नाही. चीन, पाकिस्तान या दोन्ही सीमा संवेदनशील असताना, यात बांगलादेशची भर पडली आहे. येणाऱ्या काळात बांगलादेश-चीन मैत्रीचे नवे नवे अध्याय समोर येतील आणि भारतासाठी ही बाब निश्चितच दु:खद राहणार आहे. कारण बांगलादेशच्या निर्मितीत भारताने फार मोलाची व निर्णायक भूमिका बजावली होती. ५४ वर्षांपूर्वी भारताने केलेले उपकार विसरीत बांगलादेशने चीनचा हात धरावा यापेक्षा अधिक दुर्दैव कोणते?

**ट्रम्प नरमले :** दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांना अखेर माघार घ्यावी लागली. चीन वगळता अन्य देशांवर त्यांनी लागू केलेले आयातशुल्क ९० दिवसांसाठी स्थगित करण्याची घोषणा केली. आपल्या निर्णयाची किंमत साऱ्या जगाला चुकवावी लागत आहे. साऱ्या जगातील शेअर बाजार कोसळत आहेत. जागतिक मंदीची अशुभ पावले येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत हे ट्रम्प यांच्या लक्षात आले असावे.

**जनअसंतोषाचा परिणाम? :** साऱ्या अमेरिकेत ट्रम्प यांच्या विरोधात निदर्शने सुरू होत आहेत. केवळ तीन महिन्यांपूर्वी सत्तेवर आलेल्या एका राष्ट्रपतीच्या विरोधात अमेरिकन जनता कधी रस्त्यावर उतरली नव्हती. ट्रम्प यांचे सल्लागार कोण, असे प्रश्न आता अमेरिकेत विचारले जात असून, याचा पहिला फटका त्यांचे उद्योगपती मित्र एलन मस्क यांना बसला आहे. ट्रम्प सत्तेवर आल्यापासून मस्क यांची संपत्ती वाढली. म्हणजे टेस्ला या त्यांच्या कंपनीच्या शेअरचे भाव वाढले. पण, प्रत्यक्षात टेस्ला कारचा खप कमी झाला. २०२५ च्या पहिल्या तिमाहीत टेस्लाने विकलेल्या मोटारींची संख्या १५ टक्के कमी झाली आहे. काही ठिकाणी तर टेस्लाच्या शो रुमवर निदर्शने झाली आहेत. पण, ट्रम्प बेदरकार होते. एखादा आजार दूर करण्यासाठी कडू औषध द्यावेच लागते अशी त्यांची प्रतिक्रिया होती. मात्र जनअसंतोषाची दखल त्यांना घ्यावी लागली. अमेरिकेचे माजी राष्ट्रपतीही परंपरा बाजूला सारीत ट्रम्प यांच्या विरोधात बोलू लागले होते. या साऱ्याचा परिणाम ९० दिवसांच्या 'युद्धबंदीत' झाला.

## वेध

अनिरुद्ध पांडे

# ६० बँका, २००८ पतसंस्था

युनायटेड नेशन्स, म्हणजेच 'युनो' या जगातील सर्व देशांचे प्रतिनिधित्व असणाऱ्या संस्थेने २०२५ हे आंतरराष्ट्रीय 'सहकार वर्ष' म्हणून जाहीर केले आहे. सहकाराचे महत्त्व लक्षात घेऊन भारत सरकारनेही काही वर्षांपूर्वीच सहकार मंत्रालयाची निर्मिती केली आहे. एकीकडे 'बिना सहकार नहीं उद्धार' असे म्हणून, त्याच पद्धतीने व्यवहार करून अतिशय स्वच्छ आणि नेत्रदीपकही कारभार करणाऱ्या सहकारी आर्थिक संस्था आहेत. फारशी उलाढाल नसलेल्या कृषी खरेदी-विक्री, बाजार समिती अशाही लाखो संस्था महाराष्ट्रात नीटनेटके काम करीत आहेत. अर्थातच मोठी उलाढाल नसल्यामुळे त्यांचे गैरप्रकारही लहानच असतात. त्यामुळे फारशी चर्चा होत नसली तरी, गैरप्रकार म्हणजे भ्रष्टाचारच. पण ते फारसे चर्चेचा विषय होत नाहीत. सहकारी क्षेत्रातील मोठ्या संस्था म्हणजे प्रामुख्याने साखर कारखाने, सूतगिरण्या या कृषी आधारित आणि सहकारी बँका व पतसंस्था या आर्थिक संस्था असतात. जितक्या मोठ्या संस्था तितका गैरप्रकार आणि भ्रष्टाचार मोठा असे सरळसरळ गणित असते. या साऱ्याच मोठ्या सहकारी संस्थांना गेल्या काही वर्षांत राजकारणाने पोखरून टाकले आहे. राजकीय माणसांनी 'सहकारातून स्वाहाकार' करून या संस्था पार देशोधडीला लावल्या आहेत. महाराष्ट्रातील कित्येक सहकारी साखर कारखाने आणि सूतगिरण्यांच्या उद्ध्वस्त आणि मोडकळीला आलेल्या इमारती आणि यंत्रसामुग्री याची साक्ष देतात. आर्थिक सहकारी संस्था या तर निव्वळ आर्थिकच व्यवहार करत असल्यामुळे आर्थिक गैरप्रकार सहजसोपा असतो.

एका ताज्या अहवालातून महाराष्ट्रात गेल्या पाचच वर्षांत ६० नागरी सहकारी बँका बुडाल्या आहेत. या बँका नुसत्या स्वत:च बुडाल्या असल्या तर एकवेळ खपूनही गेले असते. पण साऱ्या बँकांनी लाखो लोकांचे काही हजार कोटी रुपये बुडवून टाकले आहेत. सहकाराची कशीही का असेना मोठी परंपरा असलेल्या महाराष्ट्रात २०२४ मध्ये ४९६ नागरी बँका कार्यरत होत्या. एप्रिल २०१९ ते मार्च २०२४ या पाच वर्षांत ६० हून अधिक नागरी सहकारी बँकांचा परवाना रद्द केला गेला. त्यापैकी काही बँकांचे दुसऱ्या बँकेत विलीनीकरण झाले, पण त्या नामशेष झाल्याच. विलीनीकरण झालेल्या बँका, त्यांचे कर्मचारी, खातेदार यांची स्थिती जरा बरी असते. नोकऱ्या, ठेवी सुरक्षित असतात. पण विलीनीकरण झालेल्यांच्या तुलनेत पूर्णपणे बुडालेल्या बँकांची संख्या खूपच जास्त असते. त्यामुळे रस्त्यावर आलेले, नोकऱ्या गमावलेले कर्मचारी, ठेवींचे पैसे अडकलेले ठेवीदार खूप मोठ्या संख्येत असतात. सध्या एक बरे आहे, त्यातल्या त्यात. नागरी सहकारी बँकेतील ५ लाखांपर्यंतच्या ठेवी सुरक्षित असतात. ठेव विमा आणि पत हमी महामंडळ बँकांकडून विमा रक्कम घेऊन ५ लाखांपर्यंतच्या ठेवींची हमी घेते. यामुळे ५ लाखांपर्यंतचे म्हणजेच लहान ठेवीदार सुरक्षित राहतात. ५ लाखांच्या वरचे ठेवीदार फार मोठे नाहीत तरी त्यांच्यापेक्षा बरे असतात. त्यातही त्यांचे ५ लाख निघालेलेच असतात. अर्थात, निवृत्तीनंतरची मोठी रक्कम गुंतवून मोठीच शेकून घेतलेले अशा बुडित बँकांचे ठेवीदार आजूबाजूला दिसत असतातच.

पाच वर्षांत ६० नागरी बँका बंद पडल्या, संपून गेल्या. तशीच काहीशी स्थिती महाराष्ट्रातील पतसंस्थांची आहे. आपल्या राज्यात जशा ४९६ नागरी बँका, तशाच १६००० पतसंस्था आहेत. आकड्यांच्या या फरकाच्या तुलनेत बुडणाऱ्या पतसंस्थाही त्याच्या चौपट म्हणजे २००८ असल्याचा अहवाल आहे. जसा बँक बुडण्यामुळे ठेवीदारांचा जीव टांगणीला लागला, तसेच पतसंस्थांचेही आहे. वेगळ्या अर्थाने 'चौपट' झालेल्या या संख्येनेही चौपट असलेल्या पतसंस्थांचे भरडले जाणारे ठेवीदारही चौपटच आहेत. महाराष्ट्रात नऊ महसुली विभाग आहेत. त्यात नाशिक विभागातील सहकारी धेंडांनी ४३७ पतसंस्था बुडवून टाकून यात 'अव्वल' स्थान पटकावले आहे. दुसरा 'मान' ३१६ पतसंस्था बुडवून कोल्हापूर विभागाने मिळवला आहे. त्यानंतर पुणे २१३, लातूर २११, मुंबई १८९, अमरावती १७६, छत्रपती संभाजीनगर १६३, कोकण १६१ यांनी अशा क्रमाने पतसंस्था नामशेष करून टाकल्या आहेत. सर्वांत विशेष म्हणजे यातही आपल्या नागपूर विभागाने फक्त १४२ पतसंस्थांना बुडवून सर्वांत शेवटचे कौतुकास्पद स्थान मिळवले आहे. जिल्हानिहाय पाहिल्यास १७४ पतसंस्था 'बुडवून टाकण्याचे श्रेय' एकट्या जळगाव जिल्ह्याने घेतले आहे. त्या खालोखाल कोल्हापूर १५८, सोलापूर ११६ आणि छत्रपती संभाजीनगर १०२ या तीन जिल्ह्यांनी 'शतकी' खेळी खेळली आहे. यातही नागपूर जिल्ह्याने एकही पतसंस्था बुडू दिलेली नाही, हेही विशेष. या साऱ्या बुडलेल्या, विशेषत: मस्तवाल, भ्रष्ट संचालक व अधिकारी किती सर्वसामान्य लोकांचे, किती पैसे खाल्ले आणि किती बुडवले हा हिशेब करणाऱ्या यंत्रणासुद्धा थकून गेल्या आहेत. छत्रपती संभाजीनगरमधील 'आदर्श' या एकाच पतसंस्थेने २४ हजार ठेवीदारांचे २०२ कोटी रुपये जवळजवळ बुडवूनच टाकले आहेत. आता आपण करत बसू या बुडलेल्या पतसंस्था, गुणिले ठेवीदार, गुणिले ठेवींची रक्कम वगैरे. इतकेच तर आहे आपल्या हातात..!

९८८१७१७८२९

## कानोसा

अमोल पुसदकर

# डॉ. आंबेडकर यांचा तरुणांना संदेश

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समस्त भारतीयांचे आदराचे, श्रद्धेचे व प्रेरणेचे केंद्र आहे. त्यांचे जीवन, त्यांच्या व्यक्तिगत जीवनात त्यांनी खाल्लेल्या खस्ता, दिलेला लढा, प्राप्त केलेले यश या सर्वच गोष्टी अभ्यासनीय आहेत. आयुष्यभर त्यांना टीका, टिप्पणी, निंदा यांचा सामना करावा लागला. कधी त्यांच्या जातीवरून त्यांची थट्टा उडविली गेली तर कधी त्यांच्या गरिबीवरून, परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर कधीही डगमगले नाहीत. त्यांना माहीत होते की, केवळ शिक्षणच त्यांना इतरांच्या बरोबरीमध्ये येण्याचा अधिकार देऊ शकते. यावरून विद्यार्थ्यांनी हा संदेश घेतला पाहिजे की त्यांनी आपला मार्ग सोडू नये. टीका, टिपणी आणि हतोत्साहित करणारे प्रसंग यांना हसत हसत सामोरे गेले पाहिजे.

आज जवळपास सगळ्यांच्या जवळ स्वतःची पुस्तके असतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याजवळ स्वतःची पुस्तके नसायची. त्यामुळे वाचनालयात जाऊन पुस्तके वाचणे, त्याचे नोट्स काढणे व परीक्षेची तयारी करणे हे त्यांच्या हातात होते. यासाठी त्यांनी कधीही कंटाळा केला नाही. अगदी अल्प अशी झोप घेऊन उर्वरित सर्व वेळ ते अभ्यासामध्ये खर्च करायचे. आज आपल्याला माहीत आहे की आजचा तरुण हा टीव्ही, मोबाईल, समाज माध्यमांमध्ये गुरफटलेला आहे. आपला अधिकाधिक वेळ अभ्यासासाठी खर्च करून यश प्राप्त करून घेणे हेच विद्यार्थ्यांचे परम कर्तव्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातून हा संदेश आम्ही घेतला पाहिजे.

एकदा तरुण वकिलांच्या समोर बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, न्यायाधीश माझे मित्र आहे, त्यांच्याशी माझे संबंध आहे असे समजून खटल्याची तयारी न करणे हा वकील म्हणून अक्षम्य अपराध आहे. आपण आपल्या खटल्याची उत्तम तयारी करूनच आपले मत मांडले पाहिजे. आजकाल प्रत्येकच विद्यार्थ्याला इंटरव्ह्यू म्हणजे मुलाखत ही नोकरीसाठी द्यावीच लागते. अनेक वेळा मुलाखतीच्या आधी विद्यार्थ्यांची तयारी त्यासाठी नसते. परिणामी त्यांना अपयश येते. प्रत्येकाने आपल्या नोकरी, व्यवसायासाठी आवश्यक ती तयारी करूनच त्याला सामोरे गेले पाहिजे हा संदेश यावरून आपल्याला मिळतो.



१९४६ साली मुंबईतल्या सिद्धार्थ कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांसमोर केलेल्या भाषणात ते म्हणतात की, आपल्या देशामध्ये एका विशिष्ट कालखंडात न्या. रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, लोकमान्य टिळक, फिरोजशहा मेथा आदींनी आपल्या विद्यार्थी जीवनात तन्मयतेने केलेल्या अध्ययनामुळे एक उत्तुंग आदर्श प्रस्थापित केलेला होता. परंतु आजचा विद्यार्थी हा सहज सुलभ कामात आनंद मानू लागलेला आहे. अनुशासन, समर्पित वृत्ती याचा अभाव उत्तरोत्तर वाढू लागलेला आहे. सत्य शोधण्यासाठी तन्मयतेची नितांत आवश्यकता आहे. प्रसंगी सत्ताधीशांशी संघर्षही करावा लागू शकतो. सत्याचा शोध हाच आपला धर्म आहे. यावरून विद्यार्थ्यांनी असा बोध घेतला पाहिजे की यशासाठी शॉर्टकट मारण्याची प्रवृत्ती आपण त्यागली पाहिजे.

तरुण शिक्षकांना मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, आपण आयुष्य ऐषोआरामात घालविण्यात आनंद मानू नये. गाईड आणि शॉर्ट नोट लिहून पैसा कमवणे व मौजमजा करणे याला आपला धर्म मानू नये. अध्ययन, अध्यापन आणि संशोधन प्रत्येक प्राध्यापकाचे जीवनकार्य बनले पाहिजे. शिक्षक स्वतः विद्वान असले पाहिजेत. त्यांची वाणी शुद्ध असली पाहिजे. ज्ञानाचे त्यांच्याजवळ भंडार असले पाहिजे व एखादा जटिल विषयही रंजक स्वरूपात विद्यार्थ्यांना शिकविता आला पाहिजे.

ज्ञान, शील, विनय या डॉ. आंबेडकरांच्या अंगी असलेल्या गुणांचा त्यांनी दलितांच्या सेवेकरिता उपयोग केला. युवकांना ते म्हणतात, माझ्या आयुष्यात मी कधीही कोणासमोर लाचार झालो नाही. जीवनाच्या प्रारंभीच मी माझ्या आयुष्याची दिशा निश्चित केली. स्वतःच्या पायावर मी उभा राहिलोच पण केवळ पैशाच्या मागे न लागता जनसेवेसाठी जास्तीत जास्त वेळ देईल असा विचारही लहानपणीच मी केला होता आणि आयुष्यात या विचारापासून मी कधीही स्वतःला ढळू दिले नाही. विद्यार्थ्यांनी सुद्धा आपल्या गुणांचा समाजाच्या सेवेसाठी उपयोग करण्याचे ध्येय ठेवले पाहिजे.

एका प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, मी आजवर कोणाची फसवणूक केली नाही. मला ना दारूबद्दल आकर्षण आहे ना विडी, सिगारेटबद्दल. परंतु आजचा युवक हा विविध प्रकारच्या व्यसनांच्या अधीन झालेला आपल्याला दिसतो. उपभोगात रममाण होऊ पाहणारा ध्येयहीन युवक स्वतःचे इमान सहजगत्या विकू शकतो. जीवनामध्ये अनेक वेळा बाबासाहेबांनी सार्वजनिक निधी जमवलेला होता. परंतु त्यातील एकाही पैशाचा उपयोग त्यांनी स्वतःच्या कामासाठी केला नाही. यावरून तरुणांनी हे लक्षात घेतले पाहिजे की विविध प्रकारचे सामाजिक उत्सव आणि कार्यक्रम करताना आपण निधी उभा करतो. परंतु जनतेचा आपल्यावर विश्वास राहिला पाहिजे यासाठी त्या निधीचा योग्य विनियोग आपण केला पाहिजे आणि त्याचा हिशेबसुद्धा आपल्याला कधीही सादर करता येण्यासारखा असला पाहिजे. दलित विद्यार्थ्यांसमोर बोलताना ते म्हणतात की, आपले शिक्षण पूर्ण झाल्यानंतर लगेच नोकरी करून दलित विद्यार्थी आपल्या संसारात रममाण होतात. परंतु शिक्षित झालेल्या दलितांनी आपल्या अशिक्षित, अडाणी बांधवांची काळजी केली पाहिजे. दलित समाजाच्या प्रगतीसाठी ध्येयवादी युवक कार्यकर्त्यांची गरज आहे. हा संदेश सर्व समाजातील सर्वच तरुणांना लागू पडणारा आहे.

निवडणुकीसाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना उद्देशून ते म्हणतात की, आजकाल निवडणुकांमध्ये तरुण लोक मोठा रस घेतात. परंतु निवडणूक संपल्याबरोबर ते निष्क्रिय होऊन जातात. वास्तविक पाहता राजकारणा व्यतिरिक्त समाज जीवनाची अनेक क्षेत्रे अशी आहेत की जेथे आपल्यापैकी प्रत्येकाने गेले पाहिजे व तेथे काम केले पाहिजे. हारतुरे घालणे, आमदार, खासदार बनणे याच्या व्यतिरिक्त सुद्धा करण्यासारखी बरीच कामे आहेत, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. डॉ. आंबेडकरांचे जीवन हे एका राष्ट्रभक्त व्यक्तीचे जीवन होते. त्यांच्या जीवनावरून आपणही बोध घ्यावा व कोणाचीही जात न बघता जे गरजू पीडित, शोषित आहेत अशा सर्वांसाठीच काम करण्याचा संकल्प करावा असे वाटते.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### पालकमंत्र्यांच्या आदेशाचे पालन करावे

नागपूर जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी शहरातील कोलमडून पडलेली वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी नादुरुस्त ३५०० कॅमेरे त्वरित सुरू करण्यासाठी कार्यपालिका आणि पोलिस प्रशासन विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन सूचना केल्या आहेत. पालकमंत्र्यांनी या प्रशासकीय दोन्ही विभागातून कार्यक्षम व तत्परतेने कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांना जबाबदारी देऊन हा प्रश्न मार्गी लावावा. बैठकीतील निर्णयांची अंमलबजावणी करण्याचे काम जोपर्यंत सोपवत नाही तोपर्यंत असेच सुरू राहणार. लोकांच्या पैशाचा विनियोग अशाच पद्धतीने होत आला आहे. शासन कार्यपद्धती बदलली आहे, पारदर्शकता आली आहे हे चित्र दिसायला पाहिजे. अनेक चौकांत सिग्नल लागले आहेत, काही ठिकाणी वेळ दर्शविणारे डिजिटल घड्याळे आहेत. नागपुरातील बाहेरच्या रिंग रोडवरील चौकात आजूबाजूच्या रहिवासी वस्त्यांमधून दुचाकी/चारचाकी वाहतूक ही मुख्य रस्त्याच्या तुलनेत कमी असते. मात्र थांबण्याची वेळ ही सारखीच दाखविली जाते. त्यामुळे मुख्य चौकात थांबणारा दचाकी/चारचाकी वाहक हा आधीच अधीर झालेला असतो. तो डावी-उजवीकडे पाहून लाल दिवा असताना आपले वाहन पुढे दामटतो. त्याला पाहून इतरही वाहने निघतात. थांबतात फक्त ज्यांना नियमानुसार वाहूक करायची आहे ते. त्यांचा भ्रमनिरास होतो. मनोमनी ते प्रशासनावर राग करतात आणि पुढे निघतात. प्रशासनाने वाहतुकीचा अंदाज घेऊन सिग्नल घड्याळाच्या वेळेचे निर्धारण नव्याने करावे. सर्व सिग्नलवर घड्याळे बसविण्यात यावी, बंद झालेली दुरुस्त करावी आणि झोनप्रमाणे अधिकाऱ्यांना जबाबदारी द्यावी. दर तीन महिन्यांनी निरीक्षण करून उच्चस्तरीय अधिकाऱ्यांना अहवाल सादर करावा. या कार्यात हयगय, कामचुकारपणा करणाऱ्या कर्मचाऱ्याला कडक शासन करावे.

**संजय पाठक**/नागपूर

### तहव्वूरच्या चौकशीत याचा खुलासा होईल काय?

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या प्रयत्नांमुळे अतिरेकी तहव्वूर हुसेन राणा आता भारताच्या कोठडीत आहे. मुंबईच्या २००८ च्या २६/११ हल्ल्याविषयी अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत. त्या हल्ल्याच्या वेळी भारताचे परराष्ट्र मंत्रालयाचे मोठे अधिकारी पाकिस्तानच्या 'मनाली लुमा' या हिल स्टेशनमध्ये मौजमजा का करीत होते? गृहमंत्री शिवराज पाटील यांनी कमांडोंबरोबर दिल्लीहून मुंबईला यायला उशीर कां केला? दिग्विजयसिंह, महेश भट्ट इ. काँग्रेस नेत्यांनी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला २६/११ हल्ल्यासाठी जबाबदार सिद्ध करण्यासाठी केवळ सहा दिवसांत पुस्तक कसे प्रसिद्ध केले. हल्लेखोरांना हिंदू दर्शविण्यासाठी त्यांच्या उजव्या हाताला लाल धागा बांधण्याची कल्पना कुणाची? या हल्ल्याच्या काही महिने अगोदर राहुल गांधी, पी. चिदम्बरम्, सुशीलकुमार शिंदे यांनी 'भगवा आतंकवाद' ही कल्पना का पसरवायला सुरू केली? समझौता एक्सप्रेस, मालेगाव बॉम्बस्फोट हे घडवून 'हिंदू टेरर'च्या नावाखाली कर्नल पुरोहित, साध्वी प्रज्ञा यांचा तुरुंगात अनन्वित छळ करण्याची कल्पना कुणाची? इत्यादी अनुत्तरित प्रश्नांची उत्तरे आता मिळवायला पाहिजेत. या कटाचा तहव्वर राणा हा एक महत्त्वाचा भाग आहे. २६/११ कटाच्या पाच दिवस अगोदर तहव्वूर राणा भारतातून पसार झाला. त्याअगोदर अतिरेक्यांना हिंदू दाखवणारी आवश्यक कागदपत्रे तयार करायला व कटाला 'फिनिशिंग टच' द्यायला वगैरे भारतातच ठाण मांडून होता. काँग्रेस व संपुआ सरकारने हिंदू आतंकवाद सिद्ध करण्यासाठी मुंबई २६/११ कटाची जय्यत तयारी केली होती. पण मुंबईच्या तुकाराम ओंबले या पोलिस हवालदाराच्या सतर्कतेमुळे कसाब अतिरेकी जिवंत पकडला गेला व हिंदू आतंकवाद सिद्ध करण्याचा काँग्रेसचा कट फसला. ओंबले यांना झटापटीत हौतात्म्य प्राप्त झाले. त्याची किंमत आता काँग्रेसला मोजावी लागेल. तहव्वूर राणाची या सर्व बाबतीत कसून चौकशी होणारच, यात शंका नाही, पण यात दोषी आढळलेल्या देशद्रोही भारतीयांना कठोर शिक्षा व्हायलाच पाहिजे.

**गणेश हजारे**/८६९८८१५५५९

### मे महिन्यात शाळा कशासाठी?

मे महिन्यात विदर्भात सूर्य अक्षरशः आग ओकत असतो. दपारच्या वेळी तर घराच्या बाहेर पडणे अशक्य असते. अशा वेळी काही सीबीएसई शाळा मे महिन्यात शाळा चालू ठेवण्याचा विचार करीत आहे.

अशा शाळेतील मुख्याध्यापक, इतर शिक्षकवर्ग यांना अक्कल आहे की नाही? मुलांची प्रकृती बिघडेल असे हे लोक का वागत आहे अचानक? मे महिन्यापर्यंत परीक्षा ठेवून या अतिशहाण्या लोकांना काय साध्य करायचे आहे? शिक्षकांना अभ्यासक्रम पूर्ण करणे जमत नाही, म्हणून हा सगळा तमाशा आहे का?

उन्हाचा त्रास मात्र मुलांना भोगावा लागतो. शासनाने अशा शाळांवर त्वरित कारवाई करावी, जेणेकरून लहान मुलांच्या प्रकृतीवर विपरीत परिणाम होणार नाही. जरा मुलांच्या तब्येतीकडे लक्ष द्यावे. अन्यथा अशा बोगस शाळा बंद कराव्या.

**अपर्णा अग्निहोत्री**/८९५५१६४१६९

## वाचक पत्रे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


# जिल्ह्यात अपात्र शिधापत्रिकांची शोधमोहीम ३१ मेपर्यंत

## जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, रहिवाशी पुरावा न दिल्यास रेशन कार्ड होणार रद्द

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

'अंत्योदय', 'केशरी' आणि 'पांढऱ्या' शिधापत्रिका असलेल्या शिधापत्रिकाधारकांपैकी 'अपात्र' असणाऱ्या कुटुंबीयांचा शोध घेण्याची मोहीम राज्याच्या अन्न व नागरीपुरवठा विभागाने हाती घेतली आहे. ही मोहीम सुरू झाली असून, येत्या ३१ मे पर्यंत सोलापूर जिल्ह्यातही ही मोहीम सुरू राहणार असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी दिली. दरम्यान, शिधापत्रिकाधारकांना रहिवाशांचा पुरावा देणे बंधनकारक आहे. पुरावा न दिल्यास त्या कुटुंबीयांची शिधापत्रिका अपात्र अथवा रद्द करण्यात येणार आहे. त्याबाबत सरकारने आदेश दिले असल्याचेही त्यांनी नमूद केले.



केंद्र शासनाकडून यापूर्वी प्राप्त झालेल्या निर्देशानुसार अपात्र शिधापत्रिकांचा शोध घेऊन अशा शिधापत्रिका रद्द करण्याच्या सूचना सर्व क्षेत्रीय कार्यालयांना वेळोवेळी देण्यात आल्या आहेत. लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्था (नियंत्रण) आदेश, २०१५ मधील तरतुदीनुसार शिधापत्रिका तपासणी ही निरंतर प्रक्रिया आहे. सद्यस्थितीत राज्यात देण्यात आलेल्या अंत्योदय, प्राधान्य कुटुंब लाभार्थी (केशरी) व शुभ्र या सर्व प्रकारच्या शिधापत्रिकांची तपासणी करण्यासाठी दरवर्षी दि.०१ एप्रिल ते दि.३१ मे या कालावधीमध्ये शोध मोहिम राबविण्यात यावी, सदर शोध मोहिमेत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांच्या शिधापत्रिकांसाठी शासनाने उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयान्वये विहित केलेल्या निकषांतर्गत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी असे आदेश देण्यात आले आहेत.

यामध्ये सध्याच्या शिधापत्रिकाधारकांकडून माहिती घेणे, राज्यातील प्रत्येक शिधापत्रिकाधारकांच्या शिधापत्रिकांची प्रचलित शासन निर्णयांनुसार तपासणी करावी, वरीलप्रमाणे तपासणी करण्यासाठी त्या त्या विभागातील / कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रास्तभाव / अधिकृत शिधावाटप दुकानदार यांचेमार्फत ठरवून दिलेल्या वेळेत सोबत जोडलेले शिधापत्रिका तपासणी नमुना फॉर्म ऑनलाईन विनामुल्य उपलब्ध करून देण्यात यावेत, रास्तभाव दुकानदार / अधिकृत शिधावाटप दुकानदार यांनी संबंधीत रास्तभाव दुकानास जोडलेल्या शिधापत्रिकाधारकांकडून माहिती भरलेले फॉर्म सोबत जोडलेल्या हमीपत्रासह स्विकृत करून अर्जदारास स्वाक्षरी व दिनांकासह पोच देण्यात यावी, केंद्र सरकारकडून मोफत धान्य योजनेंतर्गत राज्यातील विविध उत्पन्न असलेल्या घटकांना योजनेचा लाभ घेता येतो. त्यासाठी अंत्योदय, केशरी आणि पांढऱ्या सरकारच्या सूचना तपासणी करताना ज्या सरकारी, निमसरकारी कर्मचाऱ्यांकडे पिवळी, केशरी शिधापत्रिका असेल आणि उत्पन्न एक लाखापेक्षा जास्त असल्यास त्यांची शिधापत्रिका रद्द करावी, उत्पन्नानुसार त्यांना नवीन शिधापत्रिका द्यावी, दुबार, तसेच अस्तित्वात नसलेल्या व्यक्ती, मृत व्यक्तींना लाभार्थ्यांच्या यादीतून वगळावे, छाननी वेळी संशयास्पद वाटणाऱ्या शिधापत्रिकांच्या पुराव्याबाबत पोलिसांकडून तपासणी करावी, शिधापत्रिकाधारकांचे प्रकार निश्चित करण्यात आले आहेत. त्या शिधापत्रिकाधारकांना धान्य मोफत देण्यापूर्वी माहिती द्यावी लागणार आहे. त्याचा कोटा ठरविण्यात आला आहे. त्यानुसार प्रत्येक राज्यातील शिधापत्रिकाधारकांच्या संख्येच्या आधारे कोटा निश्चित करण्यात आला आहे.

### सर्व बोगस शिधापत्रिका रद्द करणार

नव्याने समाविष्ट होणाऱ्या लाभार्थ्यांचा कोटा वाढवून घेता यावा; तसेच त्यांना त्या योजनेंतर्गत सामावून घेता यावे यासाठी अपात्र लाभार्थ्यांची शोध मोहीम घेण्याचा निर्णय घेण्यात आला. शहर, ग्रामीण भागातील स्वस्त धान्य विक्रेत्यांकडे अर्ज उपलब्ध करण्यात येणार आहेत. त्या अर्जासोबत शिधापत्रिकाधारकांना हमीपत्र द्यावे लागणार आहे. या शोध मोहिमेत एकाच पत्त्यावर दोन शिधापत्रिका तसेच एकाही विदेशी नागरिकाला शिधापत्रिका दिली जाणार नाही. दरम्यान, पुरावा उपलब्ध शिधापत्रिकाधारकांना करण्यासाठी १५ दिवसांची मुदत देण्यात येणार आहे. मुदतीत पुरावा सादर न केलेल्यांची शिधापत्रिका रद्द करण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत.

**- संतोष सरडे, जिल्हा पुरवठा अधिकारी**

### कोणते पुरावे द्यावे लागणार?

अर्जासोबत रहिवाशी पुरावा म्हणून भाडेपावती, निवासस्थानाच्या मालकीचा पुरावा, गॅस जोडणी क्रमाकांची पावती, बँकेचे पासबुक, विजेचे बिल, फोन मोबाइल बिल, वाहन परवाना, कार्यालयीन; तसेच अन्य ओळखपत्र, मतदार ओळखपत्र, आधारकार्ड यापैकी एक दाखला द्यावा लागणार आहे.

## महत्वाचे...



### सोलापूर विद्यापीठाची जयभीम पदयात्रा उत्साहात

**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभाग व नेहरू युवा केंद्र सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त जय भीम पदयात्रेचे आयोजन मा. कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते या पदयात्रेचे उद्घाटन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते संपन्न झाले. सदर पद यात्रेच्या वेळी विद्यापीठाचे प्र.कुलसचिव डॉ. अतुल लकडे , विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे , नेहरू युवा केंद्राचे युवा अधिकारी श्री. अजितकुमार , विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. देवानंद चिलवंत, श्री राजाभाऊ सरवदे, कॉमर्स विभागाचे डिन डॉ. शिवाजी शिंदे, डॉ. तानाजी कोळेकर, सहाय्यक कुलसचिव श्री. सोमनाथ सोनकांबळे यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. जय भीम पदयात्रा छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून सुरू होवून नवी वेस पोलीस चौकी, सरस्वती चौक, चार पुतळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात समारोप करण्यात आला. सदर पद यात्रेत सोलापूर शहरातील १९ महाविद्यालयातील २५० विद्यार्थी स्वयंसेवक स्वयंसेविका व कार्यक्रम अधिकारी व विद्यापीठातील कर्मचारी उपस्थित होते.



### शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची जयभीम पदयात्रा उत्साहात

**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंतीनिमित्त येथील डॉ. वै. स्मृ. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकडून अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली जयभीम पदयात्रा काढण्यात आली. रविवारी सकाळी ८.३० वाजता वैद्यकीय महाविद्यालयात डॉ. विद्या तिरणकर यांनी हिरवा झेंडा दाखविल्यावर पदयात्रेला सुरुवात करण्यात आली. या पदयात्रेमध्ये डॉ. विद्या तिरणकर, डॉ. ऋत्विक जयकर, डॉ. गजानन जत्ती, डॉ. सुनिल हंद्राळमठ, डॉ. सचिन बंदीछोडे, डॉ. विठ्ठल धडके, डॉ. वंदना चव्हाण, डॉ. गोविंद तावरे, श्रीमती तलवार, डॉ. शशिकला जगताप, श्रीमती वर्षाली गायकवाड, कांचन ढावरे, स्वप्नाली कांबळे, आकाश तळमोहीते, वाघमारे, बनसोडे तसेच कर्मचारीवर्ग आणि विद्यार्थी सहभागी झाले होते. डॉ. बाबासाहेबांनी देशाप्रती केलेल्या कार्याची महती सांगणारे फलक घेऊन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.महाविद्यालय येथून निघालेली जयभीम पदयात्रा डफरीन चौक मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ पोहोचली. यावेळी विद्यार्थ्यांनी घोषणा दिल्या. डॉ. आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केल्यानंतर पदयात्रेचे विसर्जन करण्यात आले.




### संभाजी ब्रिगेडच्या वतीने गरजवंतांना पादत्राण्याचे वाटप

**सोलापूर, दि. १४ एप्रिल-**

क्रांतीसूर्य महात्मा फुले व घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त संभाजी ब्रिगेडच्या वतीने गरजवंतांना उन्हामुळे भाजलेल्या पायांना वाहनांच संरक्षण मिळावं या हेतूने पादत्रानाचे वाटप शहरातील विविध भागात करण्यात आले. संभाजी ब्रिगेडच्या वतीने होडगी रोड, सात रस्ता, रेल्वे टेशन, एसटी स्टँड, सिद्धेश्वर मंदिर आदी परिसरातील रस्त्यावर फिरणाऱ्या गोरगरिबांना गरजूंना चप्पल देऊन सामाजिक भान जपण्यात आले. यासाठी संभाजी ब्रिगेडचे मार्गदर्शक प्रमोद पवार यांचे सहकार्य लाभले. यावेळी संभाजी ब्रिगेड पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, जिल्हा संपर्कप्रमुख छत्रगुण माने, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष मीनल दास, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, जिल्हा कार्याध्यक्ष दिलीप निंबाळकर, सतीश वावरे, रमेश भंडारे गजानन शिंदे आदी उपस्थित होते.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात सलग १८ तास अध्ययन अभियान

### स्पर्धेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा जोतिराव फुले यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त मेडीकल रिसर्च सोसायटी, डॉ. वै. स्मृ. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी सलग १८ तास अध्ययन अभियान व स्पर्धा -२०२५ पार पडली. चांगला प्रतिसाद मिळाला.



या सलग १८ तास अध्ययन अभियानाचे उद्घाटन अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. हे अभियान सकाळी सहा ते रात्री बारा वाजेपर्यंत महाविद्यालयाच्या ग्रंथालयात झाले. यात ७१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगातील ६ विद्वानांमधे गणले जातात. अतिशय प्रतिकूल परिस्थिती असून सुद्धा परदेशात राहून दररोज १८ ते २० तास अभ्यास करुन त्यांनी विविध पदव्या संपादन केल्या व संपूर्ण जगामधे ज्ञानाचे प्रतिक अशी स्वतःची ओळख निर्माण केली. त्यांच्या ज्ञानाला व कार्याला अभिवादन म्हणून त्यांचा वारसा पुढे चालविण्यासाठी सन २००७ पासून दरवर्षी हे अध्ययन अभियान राबवले जाते. शेवटच्या तासात त्यांची बहुपर्यायी प्रश्नांची परीक्षा व स्पर्धा घेतली जाते. परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांनुसार प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस दिले जाते, असे डॉ. औदुंबर मस्के यांनी सांगितले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. औदुंबर मस्के, डॉ. सचिन बंदीछोडे, डॉ. सुशील सोनवणे, डॉ. स्वाती मुने, डॉ. शंकर टेंगळे, डॉ. गजानन जत्ती, डॉ. अवधूत डांगे, डॉ. रवी कंदलगावकर, डॉ. संचीत खरे, डॉ. शुक्लधन रोडे, डॉ. गायत्री चक्रे, डॉ. सुरज थोटे, डॉ. मनोज वेदपाठक, डॉ. स्वप्नील सांगळे, डॉ. वैभव लादे, डॉ. प्रशांत शिरुरे, श्रीमती सुलभा दातार, कवीवर्य देवेंद्र औटी, ड. रवी गजधाने, विशाल इरागंटी, स्वप्नील ठाकरे, शशिकांत साळवी, ज्ञानेश्वर जोशी व अर्चना नाचरे यांनी परिश्रम घेतले.

# रोटरीचे मोफत शस्त्रक्रिया शिबीर पुन्हा एकदा जम्मू-काश्मीरमध्ये

### राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देत महाराष्ट्रातून ३० डॉक्टरांचा चमू सज्ज

**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

रोटरीच्या वतीने मोफत शस्त्रक्रिया शिबीर यंदाही जम्मू-काश्मीरमध्ये १६ ते २४ एप्रिल दरम्यान होणार आहे. किश्तवाड, बदरवा आणि डोडा या दुर्गम व संवेदनशील भागांमध्ये हे शिबीर होणार असून यंदाचे हे तिसरे वर्ष असल्याची माहिती रोटरीचे डॉ. राजीव प्रधान यांनी दिली.

जम्मू-काश्मीरचे राज्यापाल मनोज सिन्हा यांच्या खास आमंत्रणावरून देशभरातून ३० हून अधिक सर्जन डॉक्टर आणि स्वयंसेवक जम्मू-काश्मीरमध्ये दाखल होत आहेत. या शिबिराचे नेतृत्व डॉ. प्रधान यांच्यासमवेत जिल्ह्यातील डॉ. अनंत खडके, डॉ. मनोज भयगुडे, डॉ. अंजली शिवपुजे, डॉ. उमा प्रधान यांचा समावेश आहे. तसेच पनवेलचे डॉ. गिरीश गुणे आणि गुजरात, तामिळनाडूप्रमाणे इतर राज्यांतील तज्ज्ञ डॉक्टर देखील या शिबिरात सहभागी होणार आहेत.

काश्मीर प्रशासनाने शिबिरासाठी शस्त्रक्रियेची गरज असणाऱ्या रुग्णांची पूर्वतपासणी करून १५०० हून अधिक रुग्णांची नोंदणी केली आहे. या रुग्णांवर किडनी, गॉल ब्लॅडर, अस्थिरोग, कान-नाक-घसा, मोतीबिंदू, प्लास्टिक सर्जरी, स्त्रीरोग आणि बालरोग यासह अनेक गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी काश्मीर सरकारने सर्व आवश्यक रुग्णालयांमध्ये अतिरिक्त वैद्यकीय कर्मचारी व अधिक ऑपरेशन थिएटरची व्यवस्था केली आहे. तर भारत सरकारकडून शस्त्रक्रिया साहित्य आणि उपकरणांची पुरवठा सुविधा करण्यात आली आहे.

मागील तीन वर्षांत रोटरीच्या डॉक्टरांनी जम्मू-काश्मीरच्या कुपवाडा, बारामुल्ला, अनंतनाग, पुलवामा, शोपियां, कुलगाम, राजोरी, पुंछ इत्यादी भागांमध्ये ६ हजारहून अधिक मोफत शस्त्रक्रिया करून नागरिकांना उच्च दर्जाची आरोग्यसेवा दिली आहे. या उपक्रमामागे केवळ वैद्यकीय मदत देण्याचेच नव्हे, तर राष्ट्रीय एकात्मता, धार्मिक सहिष्णुता आणि सामाजिक ऐक्य यांचा संदेश देण्याचे उद्दिष्ट आहे.

राज्यपाल श्री. सिन्हा यांच्या मार्गदर्शनाखाली रोटरी आणि जम्मू-काश्मीर प्रशासन यांचे हे संयुक्त प्रयत्न देशाच्या एकात्मतेसाठी महत्त्वपूर्ण ठरत आहेत. रोटरीने मागील २७ वर्षांमध्ये भारतात आणि आफ्रिकेसारख्या आंतरराष्ट्रीय स्तरावर ५० हून अधिक शस्त्रक्रिया शिबीरे यशस्वीरित्या राबवली असून आरोग्य सेवा क्षेत्रात एक विश्वासार्ह नावलौकिक मिळवला आहे.

# प्रीहिस्टोरिक ॲडव्हेंचरची मेजवानी

**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

या उन्हाळ्यात,फिनिक्स मार्केटसिटीचा मोस्ट अवेटेड इव्हेंट हॉलिडे लँड आता डायनासोर वर्ल्डच्या माध्यमातून तुम्हाला घेऊन जाणार आहे.

एका थरारक प्राचीन दुनियेच्या प्रवासावर..११ एप्रिल ते ०४ मे २०२५ दरम्यान लिबर्टी स्केअर येथे हा इव्हेंट होणार आहे. हा अविश्वसनीय अनुभव मुलांसाठी आणि कुटुंबांसाठी मौजमस्ती,माहिती आणि ॲडव्हेंचरची मेजवानी घेऊन येणार आहे. प्रीहिस्टोरिक जायंट्स पहा अगदी जवळून : डायनासोर वर्ल्ड मध्ये मेसोजोइक युगातील जादू पुन्हा जिवंत केली गेली आहे.यंदाचं डायनासोर वर्ल्डसुद्धा हेच सातत्य पुढे नेत असून येथे येणाऱ्या लोकांसाठी मजा,मौजमस्ती,साहस आणि थराराने भरलेला अविस्मरणीय अनुभव देतं.

# एसटी कर्मचाऱ्यांसाठी शुद्ध पाण्याचा नितळ उपक्रम

### कै. रामचंद्र विठोबा आवताडे संस्थेचा स्तुत्य उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

'कै. रामचंद्र विठोबा अवताडे बहुद्देशीय सामाजिक संस्था' आंधळगाव ता.मंगळवेढा ही एसटी कर्मचाऱ्यांसाठी शुद्ध पाण्याच्या माध्यमातून सेवा पुरवत आहे. एसटी कर्मचाऱ्यांचे कार्य तासन्तास उन्हात, पावसात सुरू असते. त्यांच्या या मेहनतीच्या जीवनशैलीत स्वच्छ पिण्याच्या पाण्याची गरज अधिक तीव्र असते. याच गरजेतून राज्य परिवहन विभागाच्या सोलापूर विभागीय कार्यालयात मंगळवेढा, पंढरपूरनंतर सोलापूर आगारात तिसऱ्या आर. ओ.वॉटर प्लांटचे उद्घाटन राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या सोलापूर अधीक्षक भाग्यश्री जाधव यांच्या हस्ते पार पडले. यावेळी एसटीचे विभाग नियंत्रक अमोल गोंजारी, नगरचे उपजिल्हाधिकारी अनुप यादव, उद्योजक जयदीप रत्नपारखी, सकल मराठा समाजाचे समन्वयक माऊली पवार, उद्योजक व सी. ए.धीरज जवळकर, माजी नगरसेवक विनोद भोसले यांच्यासह संस्थेचे अध्यक्षा सपना अवताडे, उपाध्यक्ष शिवदास जाधव, खजिनदार ब्रम्हदेव माने सचिव दत्ता स्वामी, सदस्य लहू अवताडे उपस्थित होते.



यावेळी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या सोलापूर अधीक्षक भाग्यश्री जाधव यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. सरकारी नोकरी करतानाही समाजासाठी काहीतरी देण्याची भावना फार थोड्यांत दिसते. अंकुश अवताडे यांनी ही भावना कृतीतून साकारली आहे. असे गौरवउदगार काढले. तर एसटीचे विभाग नियंत्रक अमोल गोंजारी यांनी देखील कर्मचाऱ्यांसाठी पाण्याची सोय केल्याबद्दल आभार मानत अक्कलकोट येथेही असाच प्लांट बसवण्याची मागणी केली, ज्याला कै. रामचंद्र विठोबा अवताडे बहुद्देशीय सामाजिक संस्थेने तात्काळ सकारात्मक प्रतिसाद दिला. ''कै. रामचंद्र विठोबा अवताडे हे एसटी विभागात कार्यरत होते. त्यांच्या पश्चात सामाजिक जाणीव ठेवत काही उपक्रम करण्याचा मानस होता. त्यातूनच पाण्याची सेवा देण्याचा मनात विचार आला. आतापर्यंत संस्थेच्या वतीने तीन वॉटर प्लांट बसवण्यात आलेत. बसवण्यात आलेले तीन वॉटर प्लांट दर तासाला १ हजार लिटर पाणी प्रक्रिया करतात, आणि ते सातत्याने कसे कार्यरत राहतील याची पण दक्षता संस्थेकडून घेतली जात आहे. या कार्यक्रमला राज्य परिवहन विभागाचे कर्मचारी, आंधळगावचे ग्रामस्थ आणि कै. रामचंद्र विठोबा अवताडे उपस्थित होते. प्रास्ताविक भिमराव घुले यांनी यांनी केले. तर आभार आणि सूत्रसंचालन मंगेश लामकाने यांनी केले.

# सोशल महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषदेत समकालीन विषयांवर मंथन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

इंटरनल क्वालिटी ॲश्युरन्स सेल, शोलापूर सोशल असोसिएशनच्या आर्ट्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, सोलापूर येथील वाणिज्य आणि व्यवस्थापन विभागाच्यावतीने आणि नवी दिल्ली येथील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, टेक्नॉलॉजी ॲण्ड इनोव्हेशन ट्रस्टच्या सहकार्याने एक भव्य आंतरराष्ट्रीय परिषद सोशल महाविद्यालयात आयोजित करण्यात आली होती. समकालीन प्रश्न : वाणिज्य, व्यवस्थापन, कला, मानवशास्त्र, अभियांत्रिकी, संगणकशास्त्र व अनुप्रयोग या व्यापक विषयावर आधारित ही परिषद हायब्रिड पद्धतीने (प्रत्यक्ष व ऑनलाइन) आयोजित करण्यात आली होती.



या परिषदेमध्ये देश-विदेशातील विविध विद्यापीठांमधील प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी, आणि तज्ज्ञांनी सहभाग घेतला. परिषदेमध्ये विविध क्षेत्रांतील चालू घडामोडी, नविन तंत्रज्ञान, संशोधन, आणि शैक्षणिक दृष्टीकोनांवर चर्चा करण्यात आली. उदघाटन सत्रामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून आफ्रिका खंडाचे चाड रिपब्लिक देशाचे अली अस्सफी महमत, झिम्बाब्वे देशातून कुडझाई गांडा आणि बांग्लादेशातून नइमा सुलताना मीम आणि सादिया आफ्रिन मऊमी यांनी आंतरराष्ट्रीय परिषदेत प्रत्यक्ष सहभाग नोंदवून मार्गदर्शन केले. आंतरराष्ट्रीय वक्त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर बीज भाषणात कोणत्याही देशाच्या विकासासाठी आवश्यक मनुष्य विकास निर्देशांक व त्यामध्ये संशोधनाची गरज या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. तसेच ऑनलाइन माध्यमातून नजेरियाचे सगुन सोलोमन विशेष कार्यकारी अधिकारी मेड्रॉस टेकनोलॉजि यांनी बदलत्या जागतीक अर्थव्यवस्था या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच नुकतेच सत्र न्यायाधीश परिक्षा पास झालेली महाविद्यालयाची माजी विद्यार्थीनी मुंजरीन जेलर यांनी आंतरराष्ट्रीय परिषदेस मार्गदर्शन केले. परिषदेत सादर करण्यात येणाऱ्या शोधनिबंधाचे आंतराष्ट्रीय पत्रिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.दुसऱ्या सत्रामध्ये वाणिज्य व व्यवस्थापन, मानववंशशास्त् व भाषा या विषयावर ऑनलाईन व ऑफलाईन १०२ शोधनिबंध सादर करण्यात आले. या सत्राचे अध्यक्ष म्हणून सोलापूर विध्यापीठ व्यवस्थापन परिषद प्रा. डॉ. आयेशा रंगरेझ, विद्यापरिषद सदस्य प्रा. डॉ. शिवानंद भांजे, प्रा. डॉ. गौस शैख व मुंबई विद्यापीठाचे ड. नायर यांनी काम पाहिले. समारोप सत्राचे प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. बब्रुवाहन रोंगे, प्राचार्य व संथापक सचिव स्वेरी पंढरपूर यांनी उपस्थितांना स्टार्टअप व युवकांची भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले. उपक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य व आंतरराष्ट्रीय परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. आय. जे. तांबोळी, विभागप्रमुख व परिषदेचे संयोजक सोलापूर विद्यापीठ सिनेट सदस्य प्रा. डॉ. जैनोद्दीन मुल्ला, नवी दिल्ली संस्थेचे अध्यक्ष व प्राचार्य डॉ. अन्वर शेख, महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# गैबीपीर उर्दू प्रा. स्कूल येथे महात्मा फुले जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

गैबीपीर उर्दू प्रा. स्कूल सोलापूर क्रांती ज्योती महात्मा ज्योतीराव फुले जयंती साजरा करण्यात आली. या कार्यक्रमात कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून फुले शाहू आंबेडकर विचार मंचाचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष हाजी के.बी. नदाफ होते तर धनंजये झाकर्डे यांच्या हस्ते महात्मा ज्योतीराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमवर पुष्प हार घालून अभिवादन करण्यात आले.




या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बामसेफचे राज्य कार्यकारणी सदस्य श्री. संजय अबुटे, मराठा सेवासंघाचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य व मर्चेंट नेव्ही ऑफीसर श्री विश्वनाथ श्रीधर गायकवाड, सांची फिल्म मेकर फोटो ग्राफर श्री अमोल वाघमारे उपस्थित होते.

श्री धनंजये झाकर्डे व संजय अबुटे, विश्वनाथ गायकवाड यांनी आपले मनोगत व्याक्त केले. शाळेतील विध्यार्थी यांनी महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, फातिमा शेख यांची वेशभूषा मध्ये कार्क्रमात उपस्थित होते. मुख्याध्पाक अ.मजीद शेख यांनी पाहुण्याचे आभार मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



**चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया**

भाग - ८

## रनिंगमध्ये क्रॉस ट्रेनिंगचे महत्त्व

क्रॉस ट्रेनिंग म्हणजे धावण्यासोबत विविध प्रकारचे व्यायाम समाविष्ट करून संपूर्ण शरीर मजबूत करणे.

**क्रॉस ट्रेनिंगचे फायदे**

● चोट टाळते एकाच स्नायूवर ताण न पडता विविध स्नायू बळकट होतात. ● संपूर्ण शरीर मजबूत होते कोर, पाठ, खांदे यांचा व्यायाम होतो. ● कार्यक्षमता सुधारते स्टॅमिना आणि वेग वाढतो. ● मानसिक ताजेपणा टिकतो व्यायामात विविधता मिळते. ● रिकव्हरीला मदत होते सौम्य व्यायाम शरीर दुरुस्त करतो.

**रनर्ससाठी सर्वोत्तम क्रॉस ट्रेनिंग प्रकार**

● सायकलिंग हृदयाची क्षमता वाढवते, पायांची ताकद सुधारते. ● पोहणे संपूर्ण शरीराचा व्यायाम, सांध्यांवरील ताण कमी. ● वजन प्रशिक्षण स्क्वॅट्स, डेडलिफ्ट्समुळे स्नायू मजबूत होतात. ● वेग, ताकद आणि स्टॅमिना वाढवतो. ● योगा आणि स्ट्रेचिंग लवचीकता वाढवते, दुखापती टाळते. ● पिलाटेस कोर मजबुती आणि बॅलन्स सुधारतो. ● हायकिंग/ट्रेल रनिंग नवीन स्नायू सक्रिय होतात, सहनशक्ती वाढते. ● प्लायोमेट्रिक्स वेग आणि स्फोटक शक्ती सुधारते.

**निष्कर्ष -** दर आठवड्यात २-३ वेळा क्रॉस ट्रेनिंगचा समावेश केल्यास धावण्याची गुणवत्ता सुधारते आणि दुखापतीपासून संरक्षण मिळते.

**- अतिश शहा**
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रा मॅराथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फौंडेशन, सोलापूर
मो. ९१७५८२८२०३

# कोहली, फिल सॉल्टची झुंझार खेळी

## बंगळुरूचा राजस्थानवर ९ गडी राखून विजय

◆ **जयपूर, १३ एप्रिल**

सलामीवीर फिल सॉल्ट (६५) व विराट कोहलीच्या (नाबाद ६२) झुंझार अर्धशतकांच्या बळावर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने (आरसीबी) संजू सॅमसनच्या रविवारी आयपीएल सामन्यात राजस्थान रॉयल्सवर १५ चेंडू शिल्लक ठेवत ९ गड्यांनी दणदणीत विजय नोंदविला. या विजयाबरोबरच आरसीबीने ८ गुणांसह गुणतालिकेत चौथ्या स्थधानावरून तिसऱ्या स्थानावर झेप घेतली, तर राजस्थान ४ गुणांसह सातव्या स्थानावर कायम राहिला. आरसीबीच्या विजयाचा पाया भक्कम करणारा फिल सॉल्ट सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

आरसीबीचा कर्णधार रजत पाटीदारने नाणेफेक जिंकून राजस्थान रॉयल्सला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. सलामीवीर यशस्वी जयस्वालच्या (७) अर्धशतकी खेळीच्या आधारावर राजस्थानने २० षटकांत ४ बाद १७३ धावा उभारल्या आणि आरसीबीसमोर विजयासाठी १७४ धावांचे लक्ष्य ठेवले. फिल सॉल्ट, विराट कोहली व देवदत्त पडिक्कलच्या दमदार खेळीच्या बळावर आरसीबीने १७.३ षटकांत १ बाद १७५ धावा काढून आपला विजय साकार केला. आरसीबीचा हा सहा सामन्यातील चौथा विजय ठरला.



धाव घेताना विराट कोहली व फिल सॉल्ट

राजस्थान रॉयल्सच्या डावाची सुरुवात करताना पुन्हा एकदा सलामीवीर यशस्वी जयस्वालची बॅट तळपली. यशस्वीने कर्णधार संजू सॅमसन (१५) सोबत ४९ धावांची सलामी भागीदारी केली. पुढे यशस्वीने रियान परागच्या साथीने आपले वैयक्तिक अर्धशतक साजरे करत आपल्या संघाला शंभर धावांचा टप्पा ओलांडून दिला. २२ चेंडूंत ३० धावांची खेळी करणारा रियान यश दयालच्या गोलंदाजीला बळी पडला. ध्रुव जुरेलसोबत खेळत असताना यशस्वी जयस्वालला हेझलवूडने पायचित केले. जयस्वालने अवघ्या ४७ चेंडूंत १० चौकार व २ षट्कारांसरह ७५ धावांची खेळी केली. पुढे ध्रुव जुरेलने शिमरॉन हेटमायर (९) व नितीश राणाच्या (नाबाद ४) सहकार्याने नाबाद खेळी करत राजस्थान रॉयल्सला २० षटकांत ४ बाद १७३ धावा उभारून दिल्या. ध्रुव जुरेलने २३ चेंडूंत नाबाद ३५ धावांचे योगदान दिले, यात त्याने प्रत्येकी २ चौकार व षट्कार ठोकलेत.

विजयासाठी १७४ धावांचा पाठलाग करताना फिल सॉल्ट व विराट कोहलीने ९२ धावांची सलामी भागीदारी करून आरसीबीच्या डावाची दमदार सुरुवात केली. फिल सॉल्टने ३३ चेंडूंत ५ चौकार व ६ षट्कारांसह ६५ धावांची खेळी केली. पुढे कोहली व देवदत्त पडिक्कलने नाबाद खेळी करत आरसीबीच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. आरसीबीने १७.३ षटकांत १ बाद १७५ धावा केल्या. विराट कोहलीने ४५ चेंडूंत ४ चौकार व २ षट्कारांसह नाबाद ६२ धावांची, तर पडिक्कलने २८ चेंडूंत ५ चौकार व एका षट्कारसह नाबाद ४० धावांची विजयी खेळी केली. ◀ *(वृत्तसंस्था)*

# चेन्नई घसरणीला रोखण्यास उत्सुक

◆ **लखनौ, १३ एप्रिल**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत सोमवारी यजमान लखनौ सुपर जायण्ट्स (एलएसजी) आणि चेन्नई सुपर किंग्ज (सीएसके) यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे.

सध्या दहा संघांच्या आयपीएल गुणतालिकेत लखनौ ८ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे, तर पाच वेळचा विजेता सीएसके दोन गुणांसह तळाशी आहे.

या सामन्यात सीएसकेच्या घसरणीला आळा घालण्यासाठी त्यांच्या

फलंदाजांना उत्कृष्ट कामगिरी करावी लागेल. आयपीएलमध्ये सीएसकेने कधीही यापेक्षा वाईट काळ अनुभवला नाही, त्यांनी सलग पाच सामने कधीही गमावले नाहीत. यात त्यांचा किल्ला असलेल्या चेपॉक येथे झालेल्या अभूतपूर्व तीन सामन्यांचा समावेश आहे. जर कोणी सीएसकेला संकटातून बाहेर काढू शकेल तर तो महेंद्र सिंह धोनी आहे, परंतु ऋतुराज गायकवाडच्या दुखापतीनंतर त्याची पुन्हा कर्णधारपदी नियुक्ती करण्यात आली, परंतु शुक्रवारी तो आपल्या गत सामन्यात संघाचे नशीब बदलू शकला नाही. सीएसकेचा सर्वोत्तम फलंदाज ऋतुराज गायकवाड नसल्यामुळे त्यांच्या पुनरागमनाची वाटचाल अधिक कठीण होते.

चेन्नई सुपर किंग्ज संघात पॉवर हिटर नसणे, उत्कृष्ठ खेळाडूंना पाठीशी घालणे हा सुद्धा चर्चेचा विषय झाला आहे.

सलामीवीर रचिन रवींद्र व





डेव्हॉन कॉनवे हे दोघेही चांगले फलंदाज आहेत, पण त्यांच्याकडून भरीव कामगिरीची अपेक्षा आहे.

गायकवाडच्या जागी तिसऱ्या क्रमांकावर येणारा राहुल त्रिपाठी कामगिरी करण्यासाठी प्रचंड दबावाखाली असेल. संघाला अनुभवी अष्टपैलू रवींद्र जडेजाकडूनही अधिक फायदा घेण्याची आवश्यकता आहे.

शिवम दुबेला पॉवर-हिटिंगच्या आघाडीवर अधिक पाठिंबा हवा आहे आणि त्यासाठी धोनी स्वतः सर्वोत्तम स्थानावर आहे, परंतु फलंदाजी क्रमवारीच्या स्थितीत सतत बदल, यामुळे विश्वचषक विजेत्या कर्णधारासाठी काम कठीण होते. गत सामन्यात धोनी ९ व्या क्रमांकावर होता.

आमचा संघ अजूनही हार मानणार नाही. कारण आमच्याकडे योग्य खेळाडू आहेत व त्यांच्या खेळण्याच्या शैलीबद्दल बरीच चर्चा आहे. आम्ही त्यांना पूर्णपणे वेगळ्या पद्धतीने खेळण्यास सांगू इच्छित नाही; त्यांच्यासाठी हे स्वाभाविक आहे, असे चेन्नई सुपरकिंग्जचे फलंदाजी प्रशिक्षक माइक हसी म्हणाले.

तिकडे घरच्या मैदानाचा फायदा घेत लखनौ सुपर जायण्ट्स आवश्यक सातत्य मिळवून सलग चौथा विजय मिळवण्याच्या प्रयत्नात

**आजचा सामना**

**लखनौ सुपर जायण्ट्स**
**वि. चेन्नई सुपर किंग्ज**
**स्थळ :** लखनौ
**वेळ :** सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रक्षेपण :** स्टार स्पोर्ट्सवर

असेल. मुख्य वेगवान गोलंदाजांना दुखापत झाल्यामुळे स्पर्धेच्या सुरुवातीला त्यांची गोलंदाजी ही त्यांची सर्वात कमकुवत बाजू होती, परंतु शनिवारी येथे गुजरात टायटन्सवर गोलंदाजांनीच लखनौला विजय मिळवून दिला. गुजरात टायटन्सच्या डावाच्या शेवटी धावांचा प्रवाह रोखण्यात आवेश खान, रवी बिश्नोई व शार्दुल ठाकूर हे यशस्वी झाले हे उल्लेखनीय आहे.

लखनौची खेळपट्टी पारंपारिकपणे संथ होती, ती फलंदाजीसाठी चांगली राहिली आहे व निकोलस पूरनसारख्या खेळाडूंसाठी ती अनुकूल आहे.

शनिवारी अव्वल क्रमांकावर मिशेल मार्श नसल्यामुळे ऋषभ पंतला फॉर्ममध्ये असलेल्या एडन मार्करामसोबत सलामीला संधी मिळाली. पंतनेसुद्धा वरच्या क्रमांकावर चांगली कामगिरी केली, पण मार्शच्या पुनरागमनानंतर तो सलामीवीर म्हणून स्वतःला अधिक संधी देईल का? हे बघणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

ऑस्ट्रेलियन फलंदाज आतापर्यंत त्यांच्या सर्वोत्तम फलंदाजांपैकी एक आहे, त्यामुळे पंतला वरच्या क्रमांकावर पोहोचणे अधिक कठीण झाले आहे. ◀ *(वृत्तसंस्था)*

# मोहन बागानने आयएसएलचा किताब जिंकला

**कोलकाता, १३ एप्रिल-**

येथील विवेकानंद युवा भारती क्रीडांगणावर खेळल्या गेलेल्या चुरशीच्या अंतिम सामन्यात अतिरिक्त वेळेत मोहन बागान सुपर जायण्ट्स संघाने बंगळुरू एफसीवर २-१ असा रोहर्षक विजय नोंदवून स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. मोहन बागानचा हा ऐतिहासिक विजय ठरला असून त्यांनी एकाच हंगामात शिल्ड चषक व आयएसएल चषक असे दोन्ही चषक जिंकणारा इतिहासातील हा एकमेव दुसरा संघ ठरला. साखळी फेरीत गुणतालिकेत अव्वल स्थान मिळवणारा संघ लीग शिल्ड जिंकतो व एएफसी चॅम्पियन्स लीग टू गट फेरीसाठी (आशियाई खंडीय क्लब स्पर्धेचा दुसरा टप्पा) पात्र ठरतो.

जेमी मॅकलरेन हा मोहन बागानच्या विजयाचा शिल्पकार ठरला. जेसन कमिंग्जने बरोबरीचा गोल केल्यानंतर आणि मॅकलरेनने अतिरिक्त वेळेत मोहन बागनसाठी विजयी गोल कला. आमच्या संघाने आक्रमक खेळ दाखवून आयएसएल चषक जिंकला, याचा मला अभिमान आहे, असे मोहन बागान सुपर जायण्ट्सचे मुख्य प्रशिक्षक जोस मोलिना यांनी अशा शब्दात मोहन बागान संघाचे कौतुक केले.

सामन्याच्या सुरुवातीला बंगळुरू एफसीने आक्रमक कौशल्याचे प्रदर्शन करून पूर्वाधात वर्चस्व गाजविले. मोहन बागान संघ काहीसा दबावाखाली खेळत होता. सेंटर-बॅक अल्बर्टो रॉड्रिग्जच्या चुकीच्या क्लिअरन्समुळे आत्मघाती गोल झाला आणि बंगळुरू एफसीला आश्चर्यकारकपणे १-० अशी आघाडी मिळाली. तरीही मोहन बागान संघ खचला नाही व आपला किल्ला राखण्यासाठी सर्वोत्तम प्रयत्न सुरूच ठेवले.




इंडियन सुपर लीगच्या (आयएसएल) च्या अंतिम सामन्यात विजय मिळवल्यानंतर पुरस्कार स्वीकारताना मोहन बागान सुपर जायण्ट्सचा कर्णधार सुभाशीष बोस

## महत्त्वाचे

### कोहलीचे टी-२० मध्ये अर्धशतकांचे शतक

**जयपूर :** स्टार फलंदाज विराट कोहलीने रविवारी आपल्या शानदार कारकिर्दीत आणखी एक विक्रम नोंदवला आणि टी-२० मध्ये १०० अर्धशतके पूर्ण करणारा तो पहिला आशियाई फलंदाज ठरला. जयपूरमध्ये राजस्थान रॉयल्सविरुद्धच्या आयपीएल सामन्यात कोहलीने ही कामगिरी केली. १७४ धावांचा पाठलाग करताना ३९ चेंडूत वानिंदू हसरंगाच्या गोलंदाजीवर षटकार मारून त्याने हंगामातील तिसरे अर्धशतक पूर्ण केले. तो ६२ धावांवर नाबाद राहिला. ऑस्ट्रेलियाचा माजी सलामीवीर डेव्हिड वॉर्नर टी-२० क्रिकेटमध्ये १०० अर्धशतके पूर्ण करणारा पहिला क्रिकेटपटू ठरला. कोहलीने आयपीएलमध्ये ५८ वे अर्धशतक नोंदवले, ज्यामुळे लीगमध्ये ५० पेक्षा जास्त धावा करणाऱ्या त्याच्या धावसंख्येची संख्या ६६ झाली. आयपीएलच्या इतिहासात सर्वाधिक ५० पेक्षा जास्त धावा करणाऱ्या वॉर्नरच्या विक्रमाशी बरोबरी झाली. आयपीएल कारकिर्दीत दिल्ली कॅपिटल्स आणि सनरायझर्स हैदराबादचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वॉर्नरने १८४ सामन्यांमध्ये ६२ अर्धशतके आणि ४ शतके केली. त्या तुलनेत, कोहलीने २५८ आयपीएल सामन्यांमध्ये ५८ अर्धशतके आणि आठ शतके केली आहेत.

# जुळे सोलापुरात उन्हाळी क्रीडा शिबिर २० एप्रिलपासून

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

सिध्देश्वर एस. पी. डान्स स्पोर्टस् क्लब व वॉरीयर कुंगफू कराटे मार्शल आर्ट असोसिएशनच्या संयुक्त विदयमाने २० एप्रिल ते ३० मे या कालावधीत सकाळी ७ ते दु. १ या वेळेमध्ये क्रीडा व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षण शिबिर जुळे सोलापूर येथील गोविंदश्री समोरील क्रीडांगण शिवगंगा नगर व भारतरत्न इंदिरा गांधी बालोदयान, इंपिरियल पॅलेस हॉल शेजारी, सोलापूर क्लबच्या समोर गांधीनगर येथे आयोजित केले आहे. या शिबिरामध्ये सहभाग नोंदणीकरीता व अधिक माहितीसाठी मुख्य प्रशिक्षक युसूफ पिरजादे (मो.९८९०८६९८१४) यांच्याशी संपर्क साधावा.



**असे आहेत क्रीडा शिबिरातील खेळ प्रकार**

स्विमिंग, स्केटींग, ज्युडोकराटे, तॉयक्वॉंदो, बुध्दिबळ, योगासन, सुर्यनमस्कार, क्रिकेट, फूटबॉल, फिजिकल फिटनेस, रायफल शूटिंग, सर्प ज्ञान, लाठी-काठी, टग ऑफ वॉर, रोलबॉल, डान्स, सांस्कृतिक फॅशन शो, अभिनय, मॉडेलिंग.

या उन्हाळी शिबिरामध्ये सहभागी होणाऱ्या सर्व विदयार्थ्यांना सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र देवून गौरविण्यात येईल. यापैकी उत्कृष्ट तीन विदयार्थ्यांना रोख पारितोषिक देवून बेस्ट स्टुडंट म्हणून गौरविण्यात येईल. हे शिबिर यशस्वी पार पांडण्याकरीता युसूफ पिरजादे, मॅडी, राजश्री तोडकरी, मिनाक्षी रजपूत, महेश बिराजदार, शाहीद मुलवाड, पंकज देशपांडे, कुमारी प्रसाद, रुपाली यल्लम आदी प्रशिक्षकांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

# राज्य स्केटिंग स्पर्धेत बार्शीतील खेळाडूंची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ एप्रिल**

परभणी येथे झालेल्या राज्य शालेय म्युझिकल चेअर स्केटिंग स्पर्धेत १९ वर्षांखालील गटात बार्शीच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली.

यशस्वी खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. खेळाडूंना श्रीशा स्केटिंग क्लब बार्शीच्या प्रियंका येडलवार यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच १६ वी राज्य म्युझिकल चेअर स्पर्धा परभणी येथे झाली होती. याही स्पर्धेत बार्शीतील खेळाडूंनी मोठे यश संपादन




केले. यावेळी महाराष्ट्र म्युझिकल चेअर स्केटिंग चीफ पॅटर्न संतोष कठाळे, गीता साखरे, म्युझिकल चेअर स्केटिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र उपाध्यक्ष प्रशांत नाईक, सचिव तुकाराम ठोंबरे, लक्ष्मी मगर माजी शिक्षणाधिकारी विठ्ठल पोचणारे, गणेशराव शिंदे शिक्षणाधिकारी हे उपस्थित होते. या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील ७ विभागातून एकूण ४८० खेळाडू सहभागी झाले होते. या स्पर्धेतील विजत्या खेळाडूंची गोवा येथे ३ व ४ मे रोजी होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

**स्पर्धेतील यशस्वी खेळाडू**

**चेअर स्केटिंग:** प्रथम : प्रसाद प्रमोद मांडे, शिवराज अविनाश साळुंखे, पृथ्वीराज हेमंत जाधव, श्रीशा जितेश येडलवार. द्वितीय : कृष्णा आनंद ढाळे, कार्तिकेय रवींद्र पवार, प्रसाद पांडुरंग शिंदे.

**स्केटिंग स्पीड रेस:** सुवर्ण : अथर्व अनंत केसकर, प्रसाद पांडुरंग शिंदे, सर्वेश शिवशंकर उदबळे, सोहम दिपक सावंत, कार्तिकेय रवींद्र पवार, द्वारकेश रुषिकेश झारेगावकर, शिवराज अविनाश साळुंखे, प्रसाद प्रमोद मांडे, पृथ्वीराज हेमंत जाधव. रौप्य : स्वरूप वैभव पोळ. कांस्य : आरव निरंजन गांधी, कृष्णा आनंद ढाळे.

**म्युझिकल चेअर स्केटिंग :** सुवर्णः अथर्व अनंत केसकर, प्रसाद पांडुरंग शिंदे, सर्वेश शिवशंकर उदबळे, कार्तिकेय रवींद्र पवार, द्वारकेश रुषिकेश झारेगावकर, शिवराज अविनाश साळुंखे, कृष्णा आनंद ढाळे. रौप्य : आरव निरंजन गांधी, सोहम दिपक सावंत, प्रसाद प्रमोद मांडे, पृथ्वीराज हेमंत जाधव, कांस्यः स्वरूप वैभव पोळ

# काटीच्या म्हमाणेची जागतिक कुस्ती स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**



जागतिक मास रेसलिंग स्पर्धेकरिता तुळजापूर तालुक्यातील वडगाव (काटी) येथील आंतरराष्ट्रीय खेळाडू तथा सध्या पुणे वास्तव्यास असलेल्या जयदेव घनश्याम म्हमाणे व पिंपरी चिंचवड, पुणे येथील थेरगाव मधील आर्यन साठे यांची जागतिक मास रेसलिंग स्पर्धेकरिता या दोघांची भारतीय संघात निवड झाली आहे. स्पर्धा २१ ते २७ एप्रिल या कालावधीत त्सकाल्टुबो, जॉर्जिया येथे होणार आहेत. म्हमाणे याने आतापर्यंत ३ गोल्ड ४ सिल्वर, ६ ब्राँझ अशा विविध पदकांची कमाई केली आहे. तर म्हमाणे हे आंतरराष्ट्रीय खेळाडू तसेच, प्रशिक्षक व पंच आहेत.

# तरुणांच्या शिस्तीसाठी क्रीडा शिक्षकांची गरज

## क्रीडा शिक्षकांच्या महाअधिवेशनाप्रसंगी विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांचे प्रतिपादन




**शिर्डी : क्रीडा शिक्षकांच्या महाअधिवेशनाचे दीपप्रज्वन करून उद्घाटन करताना विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे व मान्यवर. दुसऱ्या छायाचित्रात अधिवेशनास उपस्थित असलेले सोलापूरचे क्रीडाशिक्षक.**

**तभा वृत्तसेवा,**
**शिर्डी, दि. १३ एप्रिल-**

राज्य आणि देश सुदृढ व्हायचं असेल तर क्रीडा धोरण मजबूत व सक्षम असले पाहिजे. देशातील विद्यार्थी तरुण यांना जर शिस्त लावायची असेल तर क्रीडा शिक्षकांची गरज आहे, असे प्रतिपादन विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी केले.

महाराष्ट्र राज्य शारीरिक शिक्षण शिक्षक समन्वय समितीच्या दुसऱ्या राज्यस्तर शारीरिक शिक्षण शिक्षक महाअधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले, मागील तेरा वर्षापासून क्रीडा भरती बंद आहे. क्रीडा क्षेत्र व आरोग्यदायी विद्यार्थ्यांचे भविष्य काय? त्यामुळे आपण योग्य हेडमास्तरची निवड केली आहे. मी विधान परिषदेच्या सभापती या नात्याने संबंधित विभागाला निश्चितपणे विचारणा करून क्रीडा शिक्षकांच्या न्याय मागण्या मंजूर करण्यासाठी प्रयत्न करेन.

**ग्रामसेवक व कृषी सहाय्यकाप्रमाणे क्रीडा शिक्षक भरतीचे धोरण**

सुदृढ क्रीडा शिक्षक असेल तर सदृढ क्रीडा धोरण व खेळाडू घडतील. खऱ्या अर्थाने देश घडविण्याचे काम हा क्रीडा शिक्षक करतो. विनाअनुदान शिक्षकांच्या बाबतीत योग्य निर्णय घेण्याची वेळ आली आहे याचा मी स्वतःही लाभार्थी आहे. विना अनुदान शिक्षकाने निवृत्त होईपर्यंत बिन गारी नोकरी केली त्याची परिस्थिती पाहून मी चार वर्षात नोकरी सोडली. ग्रामसेवक व कृषी सहाय्यकाला शासनाने वेतनाचे जे धोरण ठरविले आहे. तेच विनाअनुदानित शिक्षकांच्या बाबतीत घेतलं पाहिजे यासाठी मी प्रयत्न करेन, असेही प्रा. शिंदे म्हणाले.



# न्यू जॉगर्स फाउंडेशनच्या अध्यक्षपदी संतोष अरवतु

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

नेहरूनगर शासकीय मैदानावरील न्यू जॉगर्स फाउंडेशनच्या अध्यक्षपदी संतोष भीमाशंकर अरवतु यांची निवड झाली.

रविवारी अध्यक्ष पदासाठी झालेल्या निवडणुकीत १०५ पैकी ९० सदस्यांनी मतदानाचा हक्क बजावला. यात अरवतु यांना ४० तर दिलीप सुखदेव कदम यांना २५ व संतोषकुमार नागनाथ कदम २४ मते पडली. या मतदान प्रक्रियेसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून पत्रकार प्रशांत जोशी, विक्रम पाठक व अजितकुमार संगवे यांनी काम पाहिले. मावळते अध्यक्ष सुहास साळुंखे यांनी त्यांचे स्वागत केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### यशराज संस्थेच्या वक्तृत्व स्पर्धेचा बक्षिस वितरण कार्यक्रम उत्साहात

**बार्शी, दि. १३ एप्रिल-**
येथील यशराज बहुउद्देशीय व संशोधन संस्थेतर्फे महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रम नुकताच झाला. स्पर्धेचे उद्घाटन दयानंद यादव यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. राहुल पालके यांची उपस्थिती होती. यावेळी विनोद कबाडे व अमृता रंगदाळ उपस्थित होते. या वक्तृत्व स्पर्धेसाठी जिल्ह्यातील विविध गटातील विद्यार्थी सहभागी झाले होते. विजेत्या विद्यार्थ्यांना रोख रक्कम, प्रमाणपत्र व पुस्तके देण्यात आली तर सहभागींना प्रमाणपत्र देण्यात आले. या वक्तृत्व स्पर्धेमध्ये ५ वी ते ७ वी गटात मयुरी लोंढे व आदिती काळे यांचा विभागून प्रथम क्रमांक आला. तर वेदश्री हिंगे द्वितीय आली. ८ वी ते १० वी गटात नंदिनी हिंगमिरे प्रथम, सुरभी कसबे द्वितीय, तर अमित कदम तृतीय आला. खुल्या गटात संस्कृती बसवंत प्रथम, प्रज्ञा जानराव द्वितीय तर अमित कदम तृतीय आले. स्पर्धेचे परीक्षण ॲड. वृषाली वाघमारे आणि प्रा. अशोक वाघमारे यांनी केले. यावेळी शंकर वाघमारे, अमृता रंगदाळ, कोमल कबाडे, श्रद्धा कबाडे, संजय निरंजन, परमेश्वर खुने, यशराज कबाडे, ज्ञानेश्वर भाले, उमेश भराटे, शिलाजी घोळवे, हेमंत मेश्राम, विकास ओमन, प्रमोद पाटील, प्रथमेश निरंजन, सुनील दहिवले, अंकुश बांगर, विलास शिंदे, धनराज नारायणकर आदींनी सहकार्य केले.

### युगंधरतर्फे समता सप्ताह निमित्त विविध उपक्रम

**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**
येथील युगंधर फाउंडेशन आणि शिवाजी नाईट कॉलेज यांच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त समता सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या निमित्ताने सोलापूरातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी महामानवांचे पोस्टर मेकिंग आणि निबंध स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. यामध्ये पोस्टरच्या माध्यमातून महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील विविध पैलूंवर प्रबोधन करण्यात येणार असल्याची माहिती फाउंडेशनच्या अध्यक्ष प्रा. रश्मी माने यांनी दिली. स्पर्धेचे आयोजन शिवाजी नाईट कॉलेज राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्फे आहे. या स्पर्धेमध्ये भाग घेऊन इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी पोस्टर आणि निबंध बनवून शिवाजी नाईट कॉलेजमध्ये जमा करावेत असे आवाहन एनएसएस विभाग प्रमुख डॉ. युवराज सुरवसे यांनी केले आहे. विजेत्यांना प्रमाणपत्र आणि महापुरुषाचे ग्रंथ देऊन गौरविण्यात येईल. स्पर्धेचा निकाल एप्रिल अखेर लावण्यात येईल. निबंधासाठी विषय पुढीलप्रमाणे - १ महात्मा फुले यांचे सामाजिक विचार २) महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारांचे मंथन,३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रियांविषयी कार्य ४) बहुआयामी डॉ. बाबासाहेब आंबेडकर ५) महात्मा फुलेंचे शेतकऱ्यांविषयी कार्य ६०. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे महिलांसाठी कार्य. निबंध व पोस्टर जमा करण्याची तारीख १५ एप्रिल २०२५. संपर्क: डॉ. युवराज सुरवसे +९१ ८४८५० ६४१७२, प्रा.रश्मी माने - ८९२८७७४०२८

### सांगोला कराटे असोसिएशनच्या कार्यकारी अध्यक्षपदी निजेंद्र चौधरीची निवड

**सांगोला, दि. १३ एप्रिल-**
सांगोला तालुक्यातील कराटे असोसिएशनच्या कार्यकारी अध्यक्षपदी निजेंद्र रतनलाल चौधरी यांची निवड करण्यात आली



आहे. ही निवड स्पोर्ट्स कराटे डॉ असोसिएशन सोलापूरचे अध्यक्ष जी.के.वाघमारे यांनी केली. निजेंद्र चौधरी यांनी वयाच्या १६ व्या वर्षी राष्ट्रीय पंच होण्याचा मान मिळवला. तसेच नुकत्याच झालेल्या बँकॉक, थायलंड येथे जागतिक कराटे स्पर्धेमध्ये सुवर्णपदक मिळून यश संपादन केले. त्यांच्या या कामगिरीची दखल घेऊन ही निवड करण्यात आली. निजेंद्र चौधरीचे शालेय व विद्यालय शिक्षण विद्यामंदिर इंग्लिश मीडियम व ज्यू.कॉलेजमध्ये झाले. सध्या महाविद्यालयीन शिक्षण घेत आहे. त्याच्या यानिवडी बद्दल कला, क्रीडा, साहित्य क्षेत्रातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.



### महापालिकेच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**
सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त सुपर मार्केट येथील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास व कौन्सिल हॉल येथील कार्यालयात त्यांच्या प्रतिम ेस उपायुक्त तैमूर मुलाणी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विभागीय अधिकारी अविनाश अंत्रोळीकर, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी ओमप्रकाश वाघमारे, सिद्धू तिमीगार, अशोक खडके आदी मान्यवर उपस्थित होते.

## निधन वृत्त...



### विजयलक्ष्मी गाडी

**सोलापूर दि.१३ एप्रिल-**
हैदराबाद रोड विडी घरकुल येथील रहिवासी विजयलक्ष्मी बालाजी गाडी (वय ५८) यांचे रविवार, दि. १३ एप्रिल रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, दोन मुली, सून व नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा सोमवार, दि. १४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता राहत्या घरापासून निघणार आहे.

# आई- वडिलांच्या उपकाराची घातली भावनिक साद

## श्रोत्यांच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा

## केडगाव येथे यात्रेनिमित्त वसंत हंकारे यांचे व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.१३ एप्रिल-**
केडगाव (ता. करमाळा) येथील ग्रामदैवत भैरवनाथ यात्रेनिमित्त भैरवनाथ मित्र मंडळाच्या वतीने स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून शासकीय सेवेत निवड झालेल्या व देशसेवेचे कार्य करणाऱ्या गावातील सुपुत्रांचा सन्मान व ढासळत चाललेल्या समाजव्यवस्थेत समाज प्रबोधनासाठी आयोजित प्रा. वसंतराव हंकारे यांच्या 'न समजलेले आईवडील' या विषयावरील व्याख्यान कार्यक्रमाला ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती. वसंत हंकारे यांचे आईबापांचा मुलांसाठीची त्यागाची भावना समजून सांगताना भावनिक व्याख्यान ऐकताना महिलांना अश्रू अनावर झाले .



येथील ग्रामदैवत भैरवनाथ यात्रेनिमित्त यावर्षी कुस्त्याचे मैदान व इतर करमणुकीच्या कार्यक्रमाला फाटा देऊन येथील भैरवनाथ मित्र मंडळाच्या वतीने वर्षभरामध्ये गावातील स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून विविध शासकीय सेवेत निवड झालेल्या व अखंडपणे देशसेवेसाठी भारतीय सैन्य दलात कार्यरत असलेल्या गावच्या सुपुत्रांचा सन्मान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश भाऊ करे पाटील होते. यावेळी बोलताना करे-पाटील म्हणाले की काही यात्रा म्हणजे खरेतर धार्मिक उत्सव असतो परंतु केडगाव येथील तरुणांनी याला सामाजिकतेची जोड देऊन गावातील संघर्षमय वाटचाल करून यशवंत झालेल्या व देशसेवेसाठी भारतीय सैन्य दलात कार्य करत असलेल्या गावातील तरुणांचा केलेला सन्मान करण्याचा अभिनव उपक्रम केला तो इतर गावातील इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उपक्रम असून केडगावच्या तरुणांचा आदर्श इतर ठिकाणच्या तरुणांनी घेण्याची गरज असल्याचे प्रतिपादन अध्यक्षस्थानावरून बोलताना केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.नंदकिशोर वलटे यांनी केले प्रास्ताविक भैरवनाथ मित्र मंडळाचे वैभव बोराडे यांनी केले तर आभार सचिन बोराडे यांनी मानले यावेळी गावातील अन्न सुरक्षा अधिकारीपदी निवड झालेल्या रोहित लोकरे, याबरोबरच विविध विभागांत निवड झालेल्या रोहन बोराडे, रोहित बोराडे, दिपक मस्तूद, प्रितम गुटाळ, तेजस बोराडे, संदेश बोराडे, करन गायकवाड, प्रतिक्षा मस्तूद यांचा तर भारतीय सैन्य दलात कार्यरत असलेल्या नारायण बोराडे, प्रदिप गोडसे, अमीत खोलासे यांचा सन्मान प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाला यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष करे पाटील, गजेंद्र पोळ, प्रशांत नाईकनवरे ग्रामस्थ व परिसरातील मंडळी बहुसंख्येने उपस्थित होती.

प्रा. वसंत हंकारे यांनी न समजलेले आईबाप या विषयावर बोलताना आई-वडील या नात्यातील विविध पदर उलगडले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला हास्याचे फवारे तर आई व बाप या विषयी भावनिक साद घालताना अक्षरशः ऐकणाऱ्या महिला व पुरुष वर्गांच्या भावनेचा बांध फुटून डोळ्यातून अक्षरशः अश्रू ओघळले यावेळी अत्यंत भावनिक वातावरण होऊन न समजलेले आपलेच आई व वडील याविषयी मनात कृतज्ञतेचा भाव निर्माण झाला होता.

## अपहरणाच्या गुन्ह्यातून चौघांना जामीन मंजूर

**मंगळवेढा दि.१३ एप्रिल-**
मुलगी भाग्यश्री हिस नांदवण्यास का नेत नाही? या कारणावरुन आरोपी लक्ष्मी लक्ष्मण हुगार, भिमराव लक्ष्मण हुगार, प्रकाश लक्ष्मण हुगार, यमण्णाप्पा परसाप्पा हारुगिरी (रा.धान्याळ, कर्नाटक) आदींनी तिच्या पतीस मारहाण करुन जबरदस्तीने चारचाकी वाहनात घेवून गेल्या प्रकरणी यांच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला होता. दरम्यान मंगळवेढा न्यायालयाच्या न्यायाधिश एस.एन.गंगवाल शाह यांनी वरील चौघा आरोपींना २५ हजाराच्या जातमुचलक्यावर, तसेच पोलीस स्टेशनला हजेरी लावण्याच्या अटीवर जामीन मंजूर केला आहे.

या घटनेची हकीकत अशी, यातील फिर्यादी रवी शामराव उर्फ सोमलिंग शेजाळ (रा.हुलजंती) हे कुटूंबासह मुंबई येथे राहून भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करीत होते. फिर्यादी यांची पत्नी भाग्यश्री ही सुमारे एक वर्षापुर्वी प्रसुतीसाठी तिचे माहेरी धान्याळ जि.विजापूर येथे गेली होती. घटना घडेपर्यंत फिर्यादीकडे नांदवयास आलेली नव्हती. फिर्यादी व त्यांचे आई,वडिल,बहिण देवदर्शनासाठी दि.२८ मार्च रोजी गावी हुलजंती येथे आले होते. यावेळी वरील आरोपींनी चारचाकी वाहन क्रमांक ८५९० मधून फिर्यादीचे काका मल्लिकार्जून पेटर्गी यांचे घरासमोर येवून फिर्यादीस तुम्ही मुलगी भाग्यश्री हिस नांदवणेस का नेत नाही? आत्ताच आपण बैठकीस बसूया असे म्हणाल्यावर फिर्यादी व त्यांची आई गौराबाई,वडिल सोम लिंग म्हणाले,रात्रीच्यावेळी बैठक बसवायची नसते,दोन दिवसाने मुंबई मध्ये या असे समजावून सांगत असताना वरील आरोपींनी फिर्यादीस लाथाबुक्क्याने मारहाण करुन,कॉलरला धरुन आणलेल्या चारचाकी वाहनात जबरदस्तीने घेवून गेल्याचे फिर्यादीत म्हटले होते. पोलीसांनी अटक करुन न्यायालयाकडे पाच दिवसाच्या पोलीस कोठडीची विनंती केली होती. तद्नंतर आरोपीचे वकील ॲड.सागर टाकणे यांनी फिर्यादी व आरोपी हे जवळचे नातेवाईक आहेत. फिर्यादी हे त्यांच्या पत्नीस नांदवत नाहीत.

सासरच्या लोकांनी कायदेशीर कारवाई करु नये म्हणून खोटी केस केली आहे. फिर्यादी हे स्वत:हून आरोपीच्या घरी गेले होते. अपहरणाचा बनाव करुन खोटी केस दाखल केली असल्याचा युक्तीवाद न्यायालयासमोर मांडल्यानंतर न्यायालयाने २५ हजाराच्या जाम ीनावर तसेच पोलीस स्टेशनला हजेरी लावण्याच्या अटीवर जामीन मंजूर केला आहे. आरोपीच्यावतीने ॲड.सागर टाकणे व ॲड. एस.एल.माने यांनी काम पाहिले.

## सांगोला-वाढेगाव रस्त्याचे डांबरीकरण करा; अन्यथा आंदोलन

**सांगोला, दि. १३ एप्रिल-**
सांगोला-वाढेगाव रस्ता खूपच खराब झाल्यामुळे वाहनधारकांना मोठी कसरत करावी लागत आहे. या रस्त्याचे त्वरित डांबरीकरण करावे अन्यथा आंदोलन करावे लागेल असा इशारा सामाजिक कार्यकर्ते विजयसिंह सुरवसे यांनी दिला आहे. सोलापूर व कोल्हापूरला जाण्यासाठी पूर्वी वाढेगाव मार्गे सर्वांना जावे लागत होते. आता राष्ट्रीय महामार्गाचा वापर होत असल्याम ुळे सांगोला-वाढेगाव या ७ किलोमीटर रस्त्याकडे राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अक्षम्य असे दुर्लक्ष होत आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडल्यामुळे दुचाकी तसेच चार चाकी वाहनधारकांना मोठी कसरत करत आपली वाहने चालवावी लागत आहेत. रस्त्यावर असलेल्या खड्ड्यामुळे वाहनांचे मोठे नुकसानही होत असून वाहनधारकांना मणक्यांच्या आजाराला तोंड द्यावे लागत आहे. यापूर्वी राज्य मार्ग विभागाकडे असलेला हा रस्ता आता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे आहे. याची देखभाल राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाने करायची असताना सुद्धा या रस्त्याकडे संबंधित अधिकारी जाणून बुजून दुर्लक्ष करत असल्याचा आरोप विजयसिंह सुरवसे यांनी केला आहे. लवकरात लवकर या रस्त्याचे डांबरीकरण केले नाही तर यासाठी आपण आंदोलनाची भूमिका घेणार असल्याचेही विजयसिंह सुरवसे यांनी यावेळी सांगितले.



## सराईत चोरट्यांना काही तासातच केली अटक

### नातेपुते गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. १३ एप्रिल-**
नातेपुते (ता. माळशिरस) येथे दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या महिलेचे दागिने पळवणाऱ्या सराईत चोरट्यास गुन्हे प्रकटीकरण शाखेने काही तासातच ताब्यात घेत त्याच्याकडून एकूण ८८ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.



याबाबत नातेपुते पोलीस ठाण्यातील नोंदीनुसार दि.३ एप्रिल रोजी सायंकाळी ७.३० वा सुमारास वैभव विठ्ठल नष्टे (वय-३१वर्षे रा. माळशिरस) हे त्यांची आई माया नष्टे यांच्यासह स्कुटी गाडी (एम. एच. ४५ ए.व्ही. १२६१) वरुन नातेपुते परिसरात, शिखर शिंगणापूर पाटी ते बायपास रोड मार्गे, नातेपुते-फडतरी जाणारे बायपास रोडवर आले असताना दोन अज्ञात इसमांनी पाठीमागुन येऊन माया विठल नष्टे यांच्या गळयातील सोन्याचे दागीने बळजबरीने काढुन घेत मोटार सायकल वरुन पळुन गेले. वैभव विठ्ठल नष्टे यांच्या फिर्यादीवरुन नातेपुते पोलीस ठाणे प्रकटीकरण शाखेचे पो.ना राकेश लोहार हे तपास करीत होते. त्यांना सिसिटीव्ही फुटेज तसेच गोपनिय बातमीदारामार्फत सदर गुन्हा सराईत रेकॉर्डवरील आरोपीने केल्याची म ाहीती मिळाली. तो मौजे- मेडद ता. माळशिरस येथील शिवारात संशयितरित्या फिरत असल्याची खात्रीशिर माहिती मिळाल्याने सहा. पोलीस निरीक्षक महारुद्र परजने यांना माहिती देवुन गुन्हें प्रकटीकरण शाखेने सापळा लावुन आरोपीस ताब्यात घेतले. त्याचे नाव अनिल उर्फ संदीप दिलीप लवटे (रा.मेडद ता.माळशिरस),असे असल्याचे सांगितले. अधिक विश्वासात घेवुन चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याचे कबुल केले. त्यास अटक करुन सदर गुन्हयात चोरीस गेलेले एकुण ८८ हजार रुपयाचा मुददेम ाल जप्त केला.


## तानाजी सावंतचा अटकपूर्व जामीन मंजूर

**बार्शी, दि. १३ एप्रिल-**
शिवीगाळ करुन मारहाण केल्याबाबतच्या आरोपाप्रकरणी बार्शीतील जिल्हा सत्र न्यायालयाने आरोपीचा २५ हजाराच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला. आरोपी तानाजी शिवाजी सावंत यांची अटकपूर्व जामीनावर सुटका झाली. सदरप्रकरणी अतुल संभाजी सावंत (रा.अरण, माढा) यांच्या फिर्यादीवरुन आरोपी विरुद्ध दि. ६ फेब्रुवारीला टेंभुर्णी पोलिसांत फिर्याद दाखल केली होती. त्यावर आरोपीने बार्शीतील जिल्हा सत्र न्यायालयात अटकपूर्व जामीन मिळणेकरीता अर्ज दाखल केला. यावर आरोपी वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरुन न्यायालयाने अटी शर्तीवर जामीन मंजूर केला. यात आरोपीतर्फे बार्शीचे ड. रियाज शेख, ड. जहाँगीर शेख, ड. विजय गलांडे यांनी काम पाहिले.

## बार्शीत भगवान महावीर जन्मकल्याणक सोहळा

**बार्शी, दि. १३ एप्रिल-**
भगवान महावीर स्वामी यांचा जन्मकल्याणक अर्थात जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर जयंतीनिमित्त येथील सकल जैन समाजातर्फे विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम झाले.रक्तदान शिबीरात ६१ जणांनी रक्तदान केले.

श्री वर्धमान जैन स्थानकापासून शोभायात्रा निघाली. फुलांनी सजवलेली भगवान महावीरांची प्रतिमा रथात होती. शोभायात्रा प्रमुख मार्गांवरुन विविध जैन मंदिरांना भेट देत श्री ऋषभदेव जैन मंदिर येथे विसर्जित झाली. युवक-युवतींनी अहिंसा म ोटरसायकल फेरी काढून महावीरांचा अहिंसेचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवला. स्व. पन्नालालजी श्रीश्रीमाळ यांच्यावतीने महाप्रसाद देण्यात आला.ऑल इंडिया जैन कॉन्फरन्स युवा शाखा, श्री वर्धमान नवयुवक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिरात ६१ जणांनी रक्तदान केले. वर्षभरासाठी जिवदया, जैन झुणका भाकर केंद्र, श्री वर्धमान तालुका वाचनालय, श्री महावीर धर्मार्थ दवाखाना, श्री नवकार जैन सेवातीर्थ गोरक्षण अंतर्गत कत्तलखान्याकडे जाणाऱ्या २५० भाकड गायींचे पालन केले जाईल कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री सकल संघाचे सुमतीलाल मुनोत, प्रदीप बागमार, धन्यकुमार शाह, जयचंद सुराणा, सुभाष लोढा, महेश बाफना, पवन श्रीश्रीमाळ, शैलेश वाखारिया, बाहुबली नगरकर, राजेंद्र येवनकर, दिलीप गांधी, राजेंद्र धारुरकर तसेच जैन समाजातील अनेक युवकांनी योगदान दिले.



## साहित्यातून व्यक्तिगत व सामाजिक अंतरंग प्रतिबिंबित होते : नागटिळक

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१३ एप्रिल-**
संत गाडगेबाबा यांचा स्वच्छतेचा मंत्र देणारे व नटसम्राट या नाटकाचे विक्रमी प्रयोग करणारे फुलचंद नागटिळक यांनी श्री शिवाजी महाविद्यालयाला भेट दिली. या भेटीप्रसंगी त्यांनी प्रा.डॉ. राहुल पालके व विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधला.विविध सांस्कृतिक कार्यक्रम, युवा महोत्सव, साहित्य संमेलनात त्यांचा सहभाग असतो. त्यांनी विविध चित्रपटांत काम केलेले आहे. डॉ. पालके यांच्याबरोबर झालेल्या संवादातून त्यांनी साहित्य, साहित्याच्या प्रेरणा, साहित्याची पार्श्वभूमी तसेच मराठी साहित्याला समृद्ध करणाऱ्या व्यक्तींचा संदर्भ दिला. मराठी साहित्य संमेलनांचा उद्देश त्यांनी स्पष्ट केला. साहित्यिक म्हणून समाजाप्रती त्यांनी काय करावे याचाही उल्लेख केला. विद्यार्थ्यांशी संवाद साधत असताना त्यांनी तरुणाईला प्रेरक असे विचार मांडले. या साहित्य संवादामधून त्यांनी व्यक्तिगत अनुभवांची रेलचेल मांडत असताना कर्मवीर डॉ.माम ासाहेब जगदाळे यांच्या कार्याचा आढावा घेतला. याप्रसंगी झुंबड, लोंढे, मोटे हे उपस्थित होते.

## वसतीगृहातील विद्यार्थ्यांसाठी ४० वॉशिंग मशीन्स

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१३ एप्रिल -**
येथील स्वेरी महाविद्यालयाच्या सहा वसतिगृहांना 'हायर स्मार्ट सोल्युशन' कंपनीतर्फे तब्बल चाळीस वॉशिंग मशीन्स भेट देण्यात आल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना कपडे धुण्यासाठी लागणारा वेळ आता वाचणार आहे.




कंपनीचे राज्याचे डेप्युटी इन्चार्ज महेंद्रसिंग रावत यांच्या हस्ते वॉशिंग मशीन्स रूमचे उदघाटन झाले. मुलांच्या ३ वसतिगृहांना २० तर विद्यार्थिनींच्या ३ वसतिगृहांना २० अशा एकूण ४० वॉशिंग मशीन्स वसतिगृहाला मिळाल्या आहेत. कंपनीचे विभागीय संचालक हेमंत बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली डेप्युटी इन्चार्ज रावत यांनी मशीनचे प्रात्यक्षिक दाखविले. या मशीन्स ऑटोमॅटिक पद्धतीने चालतात. दरम्यान पालक मेळाव्यातून वॉशिंग मशीन्स लावण्याची म ागणी होती. त्यामुळे मुला व मुलींच्या वसतिगृहात 'हायर स्मार्ट सोल्युशन' कंपनीने ४० वॉशिंग मशीन्स भेट दिल्या. प्रस्तावनेत वसतिगृह व्यवस्थापक डॉ. के. बी. पाटील यांनी कपडे धुण्यासाठीचा वेळ वाचणार असल्याचे सांगितले. श्री. रावत यांनी वॉशिंग मशीन्सचा वापर मोबाईल ॲप मार्फत कसा करायचा याचेही प्रात्यक्षिक करून दाखविले. माजी विद्यार्थिनी सचिवा राजनंदिनी पाटील यांनी स्वेरीच्या वसतिगृहांचे वेगळेपण स्पष्ट केले.याप्रसंगी स्वेरीचे सचिव व प्राचार्य डॉ. रोंगे, म ाजी अध्यक्ष व विश्वस्त एन.एस. कागदे, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, इन्फ्रास्ट्रक्चर अधिष्ठाता व इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. डी.ए. तंबोळी, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता प्रा.ए. ए. मोटे, इतर अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी, मुलांच्या वसतिगृहातील कर्मचारी श्रीकांत पवार, सौरभ चौगुले, जयवीर देशमुख, प्रवीण वाघमारे, अजय जोकार, दशरथ हावळे, तसेच मुलींच्या वसतिगृहातील कर्मचारी द्रोपती शेळके, संतोषी गंगेकर, संध्या काकडे, अश्विनी म्हमाणे, सुषमा मागाडे, शोभा भोसले व पूजा राठोड यांच्या सह विद्यार्थी उपस्थित होते.



# बाजार समितीच्या निवडणुकीची लगीन घाई

## मात्र, भुसार विभागाच्या उमेदवाराचा पत्ताच नाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ एप्रिल-**

शेतीमालांच्या विक्रमी उलाढालीत राज्यात दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची पंचवार्षिक निवडणूक यंदाही चांगलीच चुरशीची होण्याची चिन्हे आहेत. अर्ज माघारी घेण्यासाठी बुधावर (दि.१६) एप्रिल रोजी अंतिम दिवस आहे. मात्र अजून ही अर्ज मागे घेण्याच्या उमेदवारांची तयारीत झालेली दिसत नाही. यातील काही उमेदवारांनी लक्ष्मीदर्शनाची अपेक्षा ठेवून अर्ज काढले नाल्याची कुजबूज ऐकण्यास मिळत आहे. तर दुसरीकडे अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली. तरी देखील भुसार विभागाच्या उमेदवार अद्याप गुलदस्तात आहे. व्यापारी संघटनेच्या माध्यमातून सर्वांचे एकमत होऊन एक उमेदवार जाहीर करण्यात येतो. गतवर्षी बसवराज इटकळे यांचे नाव निश्‍चित करून त्यावर अंतिम मंजुरी दिली होती. मात्र, यंदाच्या निवडणुकीत संघटनेकडूचं एका नावावर शिक्कामोर्तब होतं नसल्याने, आता पुढे काय, असा सवाल व्यापारी वर्गातून उपस्थित केला जात आहे.

**व्यापारी मतदारसंघात रस्सीखेच**

यंदाच्या बाजार समितीच्या निवडणुकीसाठी आजवरच्या इतिहासात सर्वाधिक संख्येने अर्ज दाखल झाले आहेत. बाजार समितीच्या निवडणुकीत सोसायटी मतदारसंघातून ११, ग्रामपंचायत मतदारसंघातून ४,व्यापारी प्रतिनिधी म्हणून २ तर हमाल तोलारमधून १ असे १८ संचालक निवडून दिले जातात. अन्य मतदारसंघांप्रमाणेच व्यापारी मतदारसंघातील दोन जागांसाठीही व्यापाऱ्यांमध्ये रस्सीखेच दिसून येत आहे. व्यापारी मतदारसंघातील दोन जागांसाठी भुसार अडत व्यापाऱ्यांमधून एक व कस्तुरबा मार्केट आणि राणी लक्ष्मीबाई मार्केट यापैकी एकाला संधी देण्याची आजवरची परंपरा आहे. गतवर्षी कस्तुरबा मार्केटमधून केदारनाथ उंबरजे यांना संधी मिळाली होती. त्यामुळे यंदा अपेक्षेप्रमाणे राणी लक्ष्मीबाई मार्केटला संधी मिळणार आहे. यावेळी येथून उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कट्टर समर्थक राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर कार्याध्यक्ष जुबेर बागवान हे प्रबळ दावेदार मानले जात आहेत. मात्र दुसरीकडे भुसार विभागाच्या उमेदवाराचा पत्ताच नसल्याने पुढे काय? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत व्यापाऱ्यांमध्ये संचालकपदासाठी राजकारण होत नाही. व्यापारी संघटना जे नाव ठरवेल ते अंतिम असते. येथे त्याच नावावर शिक्कामोर्तब होतो. परंतु यंदाच्या निवडणुकीत भुसार अडत व्यापारी संघांची मानसिकता बदलली असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अजून देखील कोणा एकाच्या नावावर शिक्कामोर्तब झालेला दिसत नाही.

**भुसार विभागातून १४ व मिरची विभागातून १ अर्ज**

दरम्यान, व्यापारी वर्गातून कोणाला संधी द्यायची यावर एकमत ठरवण्यासाठी यापूर्वी बैठक घेण्यात आली होती. तेव्हा संघाचे अध्यक्ष सुरेश चिक्कळी यांनी निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केली. त्यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी तत्काळ निर्णय घेत, अध्यक्ष पदाचा राजीनामा देऊन नामनिर्देशन अर्ज भरण्याची सूचना केली. परंतु अध्यक्ष पदाचा राजीनामा न देताच अर्ज दाखल करण्याचा हट्ट त्यांनी धरला. अध्यक्ष आणि संचालकपद असे दोन्ही पदांवर एकच व्यक्ती विराजमान होऊ शकत नाही. नियमांच्या विरुद्ध असल्याने ते मान्य होणार नाही. असे पदाधिकाऱ्यांनी बैठकीत स्पष्ट सांगितल्याने चिक्कळी यांनी अर्ज न भरणेच पसंत केले. त्यांच्या व्यतिरिक्त भुसार विभागातून १४ व मिरची विभागातून १ असे एकूण १५ जणांनी आपले नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहेत. मात्र एकानेही अर्ज मागे घेतला नाही. वास्तविक पाहता भुसार संघटनेकडून इच्छुकांची मुलाखत घेऊन अर्ज ठेवायचा की व्हिड्रॉल करायचे हे बैठकीत ठरवले जाते. एकाचे नाव निश्‍चित केल्यानंतर इतर इच्छुकांचे व्हिड्रोल मागवले जातात. ते सर्व कागदपत्र लवादाकडे सादर केले जातात. व्यापारी वर्गातून निवडलेल्या उमेदवाराच्या नावाची जनरल बोर्डाची मंजुरी घ्यावी लागते. त्यानंतर ते नाव जाहीर केले जाते. सदरची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी संघटनेकडे आता केवळ दोन दिवसांचा कालावधी बाकी असल्याने व्यापारी संघटनेपुढे प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागणार आहे. या संदर्भात एक दिवसापूर्वी पदाधिकाऱ्यांची बैठक बोलवण्यात आली होती. या बैठकीमध्ये कोणत्या इच्छुकाच्या नावावर शिक्कामोर्तब करायचा याबाबत चर्चा प्राथमिक चर्चा झाल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे आता व्यापारी वर्गातून नेमकी कोणाला संधी मिळणार हे पाहणे आता औत्सुक्याचे ठरणार आहे.

# तरुणांना उद्योजक बनविण्यात बसवेश्‍वर महामंडळ अपयशी

## जिल्ह्यासाठी किमान हजाराहून अधिकचे उद्दिष्ट हवे, लिंगायत समाजांकडून मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल :**

महात्मा बसवेश्‍वर महामंडळ स्थापन करण्याची लिंगायत समाजाची मागणी खूप दिवसांपासून होती. त्यानुसार महायुती सरकारने महात्मा बसवेश्‍वर महामंडळाची स्थापना केली. जिल्ह्याच्या ठिकाणी त्याचे कार्यालयही सुरू झाले. येथील जिल्हा कार्यालयाला फक्त १३ प्रस्तावाच्या मंजुरीची उद्दिष्ट दिल्याने उद्योजक कसे तयार होणार ? असा सवाल उपस्थित केला जात आहे .

सोलापूर जिल्ह्यात लिंगायत समाजाची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. शिवाय सर्वच तालुक्यांसह सोलापूर शहरातही लिंगायत समाजातील तरूण नवनवीन उद्योग व व्यवसाय करण्यासाठी तयार होत आहे. राष्ट्रीयकृत बँकांकडून कर्जपुरवठा करताना हेळसांड होते. म्हणून अनेक तरूण खासगी सावकारांकडून कर्ज घेऊन उद्योग करीत आहेत. तर काही तरूण सरकारच्या महामंडळांकडून कर्जपुरवठा होण्याच्या प्रतीक्षेत आहेत. मात्र महात्मा बसवेश्‍वर महामंडळाकडून कर्जाच्या मागणी नुसार मंजुरी देणे महत्त्वाचे असताना जिल्ह्यासाठी केवळ तेरा प्रस्ताव मंजूरीचे उद्दीष्ट देण्यात आल्याने लिंगायत समाजबांधवांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. महात्मा बसवेश्‍वर महामंडळ लिंगायत समाजातील तरूणांसाठी वरदान ठरण्याची गरज आहे. मात्र या महामंडळाकडून तरूणांची चेष्टाच होत असल्याचे दिसून येते.

महामंडळाच्या परतांवासह पाच योजना आहेत. पण, उद्दिष्ट मात्र अत्यल्प असल्याने नवीन उद्योजकांची संख्या कशी वाढेल, असा प्रश्न तरुण वर्गातून केला जात आहे. राज्यातील लिंगायत समाजातील तरुणांना व महिलांना सहजासहजी कर्ज मिळावे, यातून राज्यात तरुण उद्योजक वाढतील, असा हेतु होता. थेट कर्ज योजनेतून एकाच लाभार्थ्याला कर्ज वाटप केले आहे. अन्य योजनेतून एकालाही कर्ज वाटप करण्यात आले नाही. वैयक्तिकसाठी ४३ जणांनी कर्ज मागणीसाठी अर्ज सादर केले आहेत. २३ जणांच्या प्रस्तावाला महामंडळाने मंजुरी दिली आहे. मात्र, कर्ज वाटपच झाले नाही. ११ तालुका व महापालिका असलेल्या जिल्हा शाखेच्या कार्यालयाला अत्यल्प उद्दिष्ट दिल्याने लिंगायत समाज बांधवातून संताप व्यक्त होत आहे. किमान या जिल्ह्यासाठी हजार लाभार्थी उद्दिष्टाची गरज आहे. अत्यल्प उद्दिष्टामुळे या समाजातील अपेक्षित उद्योजक तयार होणार नाहीत. हे महामंडळ असून अडचण नसून खोळंबा असेच आहे. बहुसंख्य असलेल्या समाजाची एकप्रकारे ही चेष्टाच आहे. यामधून कर्जदाराला १२ टक्के व्याज परतावा पाच वर्षासाठी देण्यात येतो. कर्जदाराचा एक जरी हप्ता चुकला तर व्याज परतावा मिळत नाही. नवीन उद्योजक तयार करण्यासाठी व वाढण्यासाठी येथील जिल्हा शाखेच्या कार्यालयाला किमान हजार प्रकरणाचे उद्दिष्ट देण्याची गरज आहे.

### उद्दिष्टानुसार अंमलबजावणी

शासनाकडून ज्या प्रकारे उद्दिष्ट देण्यात आले आहे. त्याची अंमलबजावणी या कार्यालयाकडून केली जाते. जेवढे प्रस्ताव आले आहेत. त्याची छाननी करून मंजुरी दिली आहे.

**-वृषाली लोहारे, जिल्हा व्यवस्थापक, बसवेश्‍वर महामंडळ, सोलापूर**

### लिंगायत समाजाची चेष्टा

सोलापूर जिल्ह्यात लिंगायत समाज मोठ्या प्रमाणात आहे. या समाजातील तरूण उद्योग व व्यवसायात येत आहेत. त्यांना आर्थिक मदत मिळाल्यास ते स्वावलंबी बनणार आहेत. म्हणून किमान जिल्ह्यासाठी हजाराहून अधिकचे उद्दिष्ट दिल्यास नवीन उद्योजक तयार होतील. सरकारकडून लिंगायत समाजाची चेष्टाच आहे. -

**-सचिन व्हनमाने, कार्याध्यक्ष, काँग्रेस, दक्षिण सोलापूर तालुका**

### कर्ज देण्यास टाळाटाळ केली जाते

नवीन व्यवसाय करताना बँकांकडे विचारणा केल्यानंतर वेगवेगळे नियम सांगून तरूणांना कर्ज देण्यास टाळाटाळ करण्यात येते. या त्रासातून मुक्त होण्यासाठी महामंडळाची निर्मिती करण्यात आली. मात्र तुटपुंज्या व अल्प उद्दीष्टांमुळे सरकारचे उद्दीष्ट साध्य होणार नाही. महात्मा बसवेश्‍वर महामंडळाला निधी व उद्दीष्ट वाढवून वाढवून दिल्यास समाजातील सुशिक्षात बेकारीचे प्रमाण कमी होईल.

**-रामचंद्र होनराव, उद्योजक कुंभारी**

### योजना व उद्दिष्ट

थेट कर्ज योजना -१३
वैयक्तिक व्याज परतावा- १०
शैक्षणिक - ०५
२० टक्के बीज भांडवल योजना - ०३
गट कर्ज - ०१



## गुड फ्रायडेनिमित्त प्रार्थना फेरी

**सोलापूर : गुडफ्रायडेनिमित्त रविवारी सकाळी दि फस्ट नवीन चर्च ख्रिस्त मुला-मुलींनी पाम संडेनिमित्त प्रार्थना फेरी काढली.** (छायाचित्र : केवल तिवारी)

# आदर्श गाव संकल्पना कार्यशाळेचा सरपंचांना फायदा

## भाजपा सरचिटणीस विकास वाघमारे यांचे प्रतिपादन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

आदर्श गाव ही संकल्पना अनेकांनी मांडली आहे, पण ती प्रत्यक्षात उतरवण्यासाठी तांत्रिक मार्गदर्शन, नियोजन कौशल्य आणि कृतीशील नेतृत्वाची गरज आहे जी अभियंत्यांमध्ये नैसर्गिकपणे असते त्यामुळे भाजपा अभियंता सेलच्या माध्यमातून आयोजिलेल्या या कार्यशाळेचा नक्कीच उपस्थित सरपंचांना फायदा होईल आणि अशी कार्यशाळा प्रत्येक तालुक्यात घ्यावी, अशी इच्छा भाजपा सोलापूर सरचिटणीस विकास वाघमारे यांनी उदघाटनपर भाषणातून व्यक्त केली.

भारतीय जनता पार्टी अभियंता सेल व पदवीधर प्रकोष्ठ सेल यांच्या वतीने ''आदर्श गाव संकल्पना कार्यशाळा'' या एकदिवसीय विशेष कार्यक्रमाचे आयोजन कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान संचलित ग्लोबल व्हिलेज शिक्षण संकुल, बोरामणी येथे करण्यात आले होते. कार्यशाळेचे संयोजक तथा भाजपा अभियंता सेल व पदवीधर प्रकोष्ठ, सोलापूरचे जिल्हाध्यक्ष प्रा. अनिकेत चनशेट्टी यांनी प्रास्ताविक केले.

या कार्यशाळेला सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, अभियंते, शिक्षक व युवक-युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सदर कार्यशाळेत सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, रस्ते व इमारती बांधणी, कृषी व पशु संवर्धन विभाग, शिक्षण, डिजिटल साक्षरता, जलसंधारण व्यवस्थापन यांसारख्या विषयांवर यशदा पुण्याचे तज्ज्ञ मार्गदर्शक व सोलापूर जिल्हा परिषदेचे वरिष्ठ अभियंता राजेश जगताप यांनी सखोल माहिती दिली. याप्रसंगी व्यासपीठावर पश्‍चिम महाराष्ट्र पदवीधर प्रकोष्ठचे सहसंयोजक सुरज रोंगे, बोरामणीचे सरपंच डॉ. राज साळुंखे, पंकज चिंचोळी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमात सहभागी सरपंचांचा विशेष गौरव करण्यात आला. तसेच, 'आदर्श गाव संकल्पना'वर आधारित २८८ शासकीय योजनांची माहिती पुस्तिकेचे ग्लोबल व्हिलेज शिक्षण संकुलाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या हस्ते अनावरण करून सर्व सरपंचांना वितरण करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सौ. अस्मा नदाफ, मल्लिनाथ जळकोटे, अमृता कोरीशेट्टी, सोनाली मुदकना, प्रदीप राठोड, राहुल काळे, आकाश मुस्तरे, ओंकार अतनूरे, निखिल अंकुशे, अपूर्व जाधव आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# ॲड. अश्‍विनी उपाध्याय यांचे रविवारी व्याख्यान

## विकास बँकेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

विकास सहकारी बँकेच्या वतीने रविवारी, दि. २० एप्रिल रोजी सकाळी १० वाजता शिवछत्रपती रंगभवन येथे सर्वोच्च न्यायालयाचे वरिष्ठ ॲड. अश्‍विनी उपाध्याय यांचे महान भारती या विषयावर व्याख्यान होणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन चेअरमन कमलकिशारे राठी, व्हाईस चेअरमन राजगोपाल चंडक, कार्यक्रम प्रमुख सीए राजगोपाल मिणियार, व्यवस्थापक सीए पांडुरंग मंत्री तसेच समस्त संचालक मंडळाने केले आहे.

# नागरीकांनी नळाला विद्युत मोटार लावू नये : चौबे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

पिण्याचे पाण्याच्या नळास विद्युत मोटार लावणे कायद्याने नियम बाह्य आहे. सोलापूर शहर व हद्दवाढ भागातील नागरीकांनी नळाला विद्युत मोटार लावू नये, असे आवाहन महापालिका सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी केले आहे.

सोलापूर शहर व हद्दवाढ भागातील बरेच नागरीक ज्या दिवशी सोलापुर महानगरपालिकेमार्फत नळाद्वारे पाणीपुरवठा सुरु असताना नळास विद्युत मोटार लावून पाणी खेचत असल्याचे निर्देशनास येत आहे. पिण्याचे पाण्याच्या नळास विद्युत मोटार लावणे कायद्याने नियम बाह्य आहे. नागरीकांनी नळाला मोटार लावू नये. याची गंभीर नोंद घ्यावी.

# रक्तदान व मोफत आरोग्य तपासणी शिबीरास उत्फूर्त प्रतिसाद

## भाजपा माजी जिल्हाध्यक्ष शहाजीभाऊ पवार यांचा वाढदिवस

**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

भाजपा माजी जिल्हाध्यक्ष शहाजीभाऊ पवार यांच्या ५३व्या वाढदिवसानिमित्त मार्डी येथील रक्तदान व मोफत आरोग्य तपासणी शिबीरास उत्फूर्त प्रतिसाद मिळाला. उन्हाळ्याचा तडाखा असूनही २०१ रक्तदात्यांनी रक्तदान केले व आरोग्य शिबिरामध्ये ३१४ जणांची तपासणी करून मोफत औषधोपचार देण्यात आले. यावेळी रक्तदात्यास रुक्मिणीदेवी पतसंस्थेमार्फत भेटवस्तू म्हणून घड्याळ देण्यात आले.



रुक्मिणीदेवी पतसंस्था मर्या. भारतीय जनता पार्टी उत्तर सोलापूर तसेच शहाजीराजे पवार युवा मंच मार्डी यांच्या मार्फत हे शिबीर आयोजित केले होते. आरोग्य शिबिरात मॅग्नस सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलचे मनोज कोरे, स्वप्निल वाळके, निखिल नवले, दत्तात्रय सर्जे, दिनेश कात्रे, प्रसाद कोरुलकर, दीपिका चिंचोली व विना कात्रे या डॉक्टरांनी तपासणी केली.

तसेच लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे वाचनालयातर्फे वृक्षारोपण करण्यात आले. जिल्ह्यातून अनेक मान्यवरांनी पवार यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. त्यात भाजपा कोषाध्यक्ष इंद्रजीत पवार, उपाध्यक्ष काशिनाथ कदम, युवा मोर्चा उपाध्यक्ष संभाजी दडे, विनायक सुतार, कमलाकर माने, कदीर कुडले, श्रीकांत वैदकर, रंगनाथ गुरव, संभाजी पवार, रुकमोद्दीन शेख, मल्हारी काळे, बापूसाहेब तोडकर, अंबीर बोगे, युवराज पवार, गणेश पवार, अझहर शेख, प्रभाकर फुलसागर, संजय इनामदार, नागनाथ भालेराव, भानुदास काळे, अरुण मुडके, पांडुरंग शेणमारे, हरिदास बंडपट्टी, मनगिन भालेकर, दीपक गिरे, तात्या नागणकरे, लक्ष्मण बनसोडे, कुमार भिंगारे, श्रीमंत बंडगर, सचिन भिंगारे, श्रीकांत पाटील, बाबुराव भोरे, अविनाश शिरसाठ, सुशांत गरड, योगेश गवळी, दिनेश गणपाटील, सुवर्णा पवार, माजी सभापती संध्याराणी पवार, सोनाली जगताप, मार्डीचे प्रथम नागरिक प्रांजली पवार, तबससूम शेख, सपना पवार, सरोजा पवार, नान्नज उपसरपंच ज्योती दडे, सोनालीताई गवळी, राजश्री विभुते आदींचा सहभाग होता.

# जिल्ह्यात ४ लाख ९५ हजार ७२ जणांनी काढला 'फार्मर आयडी'; आपण काढला का?

## 'फार्मर आयडी' नसल्यास शासन मदत नाही; ११ एप्रिलला निघाला नवीन शासन निर्णय

### जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले

**तभा वत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

कृषी विभागाच्या योजनांचा फायदा घेण्यासाठी येत्या १५ एप्रिलपासून शेतकरी ओळख क्रमांक अनिवार्य करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना या ओळख क्रमांकाशिवाय कोणत्याही योजनेचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी तातडीने ॲग्रीस्टॅक पोर्टलवर नोंदणी करावी, असं आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध शेतीविषयक योजनांचा लाभ घ्यायचा असल्यास शेतकऱ्यांकडे शेतकरी ओळखपत्र असणं आवश्यक आहे. केंद्र सरकारच्या कृषी आणि शेतकरी विकास मंत्रालयाकडून ॲग्रीस्टॅक या डिजीटल उपक्रमाद्वारे शेतकऱ्यांना ओळखपत्र देण्यासंदर्भात निर्णय घेतला गेला आहे. महाराष्ट्रात देखील शेतकऱ्यांना ॲग्रीस्टॅक अंतर्गत डिजीटल शेतकरी ओळखपत्रासाठी नोंदणी करावी लागणार आहे. फार्मर आयडीसाठी नोंदणी कुठं करायची? कोणती कागदपत्रं असणं आवश्यक आहेत याची शेतकऱ्यांना माहिती असणं आवश्यक आहे.

### किसान सन्मान निधीसाठीही 'आयडी'ची पडणार गरज

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेसाठी देखील फार्मर आयडी आवश्यक आहे. शेतकऱ्यांना जर पीएम किसान सन्मान निधीच्या १९ व्या हप्त्याची रक्कम मिळवायची असल्यास फार्मर आयडी मिळवावा लागेल. पीएम किसान योजनेंतर्गत शेतकऱ्यांना एका वर्षामध्ये ६००० रुपयांची रक्कम तीन समान हप्त्यांमध्ये दिली जाते. त्यामुळं आगामी १९ व्या हप्त्याची रक्कम मिळवायची असल्यास शेतकऱ्यांना फार्मर आयडी मिळवणं आवश्यक आहे.



**फार्मर आयडीसाठी कोणती कागदपत्रं आवश्यक?**

केंद्र व राज्य सरकारकडून शेती विषयक योजना चालवल्या जातात. त्या योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकरी ओळखपत्र आवश्यक आहे. हे ओळखपत्र काढण्यासाठी आधार कार्ड, सात बारा उतारा गट क्रमांक, नमुना ८ अ खाते उतारा क्रमांक, मोबाईल क्रमांक आणि लाभार्थी शेतकरी नोंदणीवेळी उपस्थित असणं आवश्यक आहे. फार्मर आयडी नोंदणीसंदर्भात तलाठी कार्यालय, कृषी सहाय्यक आणि सीएससी केंद्र चालकांशी संपर्क करु शकता.

**या योजनांसाठी फार्मर आयडी आवश्यक?**

पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजना, पीक विमा योजना, कृषी विभाग यांत्रिकीकरण योजना, थेट लाभाच्या हस्तांतरण योजना, पीक कर्ज सुलभपणे मिळवण्यासाठीच्या या ओळखपत्राचा उपयोग होणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी शेतकरी ओळखपत्र काढणे आवश्यक आहे. जर शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढलं नाही तर त्यांना केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनेचा लाभ मिळणार नाही.

**काय आहे ॲग्रीस्टॅक प्रकल्प?**

ॲग्रीस्टॅक हे असं डिजीटल फाऊंडेशन असेल ज्याद्वारे डेटा आणि डिजीटल सेवा वापरुन शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी स्थापन केलं जाणार आहे. यामध्ये शेतकऱ्यांना डिजीटल ओळखपत्र दिलं जाईल. त्यामध्ये त्यांच्या शेतीसंदर्भातील माहितीचा समावेश असेल. ॲग्रीस्टॅक हा प्रकल्प बीड जिल्ह्यात राबवण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्यानं नोंदणीचे तीन संच असतील. यामध्ये शेतकऱ्यांचा आणि त्याच्या शेतांचा आधार संलग्न नोंदणी संच, भूसंदर्भिकृत व्याप्त दर्शवणारा गाव नकाशांचा नोंदणी संच, हंगामी पिकांचा नोंदणी संच असेल.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## कुरघोट येथे पाण्याच्या टाकीवरून पडून महिलेचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**
कुरघोट येथे पाणीपुरवठा योजनेचे काम करताना टाकीवरून तोल जाऊन पडल्याने ३४ वर्षीय महिला मजुराचा जागीच मृत्यू झाला. महादेवी अनिल राठोड वय ३४, रा. सेवालालनगर, मंद्रूप असे महिलेचे नाव आहे. कुरघोट येथे तेजस ॲग्रो कंपनीकडून जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू आहे. यासाठी मंद्रूप येथील अनिल राठोड त्यांची पत्नी महादेवी राठोड, नामदेव चव्हाण, परमेश्वर मिस्त्री व इतर मजूर काम करण्यासाठी गेले होते. शुक्रवारी सकाळी दहा वाजता या टाकीवर काम करताना महादेवी राठोड तोल जाऊन खाली कोसळल्या. जबर मार लागल्याने त्या बेशुद्ध पडल्या. त्यांना मंद्रूपच्या ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी आणले. मात्र डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे सांगितले. अनिल राठोड यांनी पोलिसात खबर दिली आहे. महांतेश मुळजे तपास करीत आहेत. मयत महादेवी राठोड यांच्या पश्चात पती अनिल राठोड, दोन मुली व एक मुलगा असा परिवार आहे.

### महत्वाचे...

## मागील भांडणावरून लाकडी बांबूने मारहाण; तिघांवर गुन्हा

**सोलापूर, दि.१३ एप्रिल-**
मागील भांडणाचा राग मनात धरून लाकडी बांबूने वृध्दास मारहाण केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना ९ एप्रिल रोजी सकाळी पावणे आठ वाजण्याच्या सुमारास वाडिया हॉस्पिटल शेजारी भाजी मार्केट येथे घडली.याप्रकरणी प्रभू वालाप्पा शेळके (वय-६९,मु.पोस्ट गोटेवाडी,तालुका मोहोळ) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून ज्ञानेश्वर चौगुले,शारदाबाई चौगुले,बिरुदेव शेळके (रा.मु.पोस्ट गोटेवाडी,तालुका मोहोळ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची थोडक्यात हाकिकत अशी की,फिर्यादी हे भाजी मार्केट येथे भाजी विकण्याकरिता बसण्याची जागा झाडून काढत असताना अचानकपणे मागील भांडणाचा राग मनात धरून गावातील ज्ञानेश्वर चौगुले याने हातातील लाकडी बांबूने फिर्यादीच्या कमरेवर व हातावर मारून गंभीर जखमी केले. तसेच शारदाबाई चौगुले व बिरुदेव शेळके यांनी देखील शिवीगाळ करून त्याला सोडू नका असे म्हणून मारण्यास लावले आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल मोरे हे करीत आहेत.



## बनावट दस्त तयार करून ३६ लाख ९७ हजारांचा अपहार

**सोलापूर, दि.१३ एप्रिल-**
बनावट दस्त तयार करून ते खरे आहे असे बसून ३६ लाख ९७ हजार ५०० रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना जुलै २०२४ ते आस्थागायापर्यंत कॅन्सर सेंटर रामवाडी येथे घडली.याप्रकरणी डॉक्टर प्रमोद कालिदास टिके (वय-४३,रा.तथास्तु बंगला अटलांटिस को हौसिंग सोसायटी,ओल्ड एमआयडीसी) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून चंद्रशेखर म्हेत्रे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, वरील संशयित आरोपी याने फिर्यादी यांच्या वैद्यकीय अधिकारी यांच्यावर असलेला विश्वासाचा गैरफायदा घेऊन फिर्यादी यांच्या संस्थेची फसवणूक व विश्वासघात करण्याच्या उद्देशाने फसवणूक करत हिशोबात अफरातफर करून संस्थेमध्ये उपचार घेतलेल्या रुग्णांनी जमा केलेले पैसे कंपनीच्या खात्यात भरले नाही.ते पैसे स्वतःच्या खात्यात भरून कोणाच्याही लक्षात येऊ नये यासाठी खोटे व बनावट दस्त तयार करून ते खरे आहे असे भासवून आत्तापर्यंत लेखापरीक्षणा नुसार अंदाजे ३६ लाख ९७ हजार ५०० रुपये रकमेचा अपहार केल्य केला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.या घटनेचा पुढील तपास महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक जगताप हे करीत आहेत.

## एसटीचा प्रवास करताना काळजी घ्या !

# स्क्रॅप एसटीतून प्रवासी वाहतूक सुरुच

### सोलापुरात नवीन बसेस दाखल झाल्यानंतरही जुनाट एसटी बसेस धावतात रस्त्यावर

### भंगार बसेसमुळे प्रवाशांचा प्रवास कंटाळवाना; आणखीन नवीन बसेसची होतेय मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ एप्रिल-**
सर्वसामान्यांची जीवनदायिनी म्हणून ओळखली जाणारी लालपरी नागरिकांच्या जीवावर उठली आहे. अनेक बसेसचे पत्रे, दरवाजे व खिडक्यांचे पत्रे धारदार सुरीसारखे बाहेर निघाले आहेत. एसटीचे पत्रे निखळल्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. यामुळे एसटीजवळून जाताना तसेच बसेस मधून प्रवास करताना प्रवाशांना काळजी घेऊनच जावा, अशी म्हणण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

दरम्यान, दिवसेंदिवस वाढलेले एसटीचे अपघात आणि धावता-धावता अर्ध्या रस्त्यात बंद पडणाऱ्या बसेसमुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. अजून किती दिवस अशाच नादुरुस्त बसेसने प्रवाशांना प्रवास करावा लागणार? असा सवाल प्रवाशांमधून विचारला जात आहे. सोलापूर विभागातील नऊ आगाराला काही नवीन बसेस मिळाल्या आहेत, परंतु त्या बसेस पुरेसा नसल्याने आजही अनेक भंगार गाड्या रस्त्यावर धावत आहेत. आज सामान्यातील अतिसामान्य व्यक्तीही लालपरीचा प्रवास सुरक्षित असल्यामुळे तिच्यानेच प्रवास करतो आणि एसटीवर विश्वास ठेवतो. मात्र, वारंवार होणाऱ्या एसटीच्या ब्रेकडाऊनमुळे प्रवासी कमालीचे हैराण झाले आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील नऊ आगारांत अनेक बसेस नागरिकांच्या सेवेसाठी आहेत, परंतु ग्रामीण भागात जाणाऱ्या बसेस या अर्ध्या रस्त्यातच बंद पडत आहेत. एवढेच काय, तर लांब पल्ल्यासाठी धावणाऱ्या भंगार बसेस अर्ध्या रस्त्यातच दम तोडत असल्याच्या घटनाहीसमोर येत आहेत. सोलापूर विभागीय कार्यालय येथे दररोज दुरुस्ती केल्या जातात. परंतु या दुरुस्त बसेस सकाळी नियोजित ठिकाणी निघताच जर बंद पडत असतील, तर हा विषय अतिशय गंभीर आहे. याकडे महामंडळाने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. सोलापूर आगारासह अन्य आगारात भंगार बसेसचा प्रवाशांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे.

प्रवाशांसह शाळकरी विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. भंगार बसेस तातडीने बदलून देण्यात याव्यात, अशी मागणी होत असताना अनेक भंगार बसेस अजूनही रस्त्यावर धावताना बघायला मिळत आहेत. अचानक बंद पडलेल्या बसेसच्या संख्येमध्ये दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. यामुळे जिल्ह्यातील इतर आगारात नवीन बसेस उपलब्ध करून देण्याची मागणी होत प्रवाशांकडून होत आहे.





सोलापूर : एसटी स्टँडमधून स्क्रॅप, मोडकळीस, पत्रे उचकटलेले, काच फुटलेल्या बसेस मधून प्रवासी वाहतूक सुरूच आहे.

### प्रवाशांच्या जीवाशी खेळ करू नका

उन्हाळी हंगाम लक्षात घेता फिरायला व परगावला जाण्यासाठी प्रवाशांची एसटी स्टँडवर गर्दी वाढत आहे. अशा अवस्थेत एसटी महामंडळाकडून प्रवाशांना सोयी सुविधा पुरवणे गरजेचे आहे. प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता. स्क्रॅप आणि मोडकळीस आलेल्या बसेस देखील रस्त्यावर धावत आहेत. सदरच्या बसेस ताबडतोब बंद कराव्यात. प्रवाशांच्या जीवाशी खेळ करू नये, असा सवाल आता प्रवासी वर्गातून उपस्थित केला जात आहे.

### प्रवाशांना अनेक सवलती

महामंडळाने नागरिकांसाठी विविध सुविधा दिल्या आहेत, ज्यात महिलांना अर्ध्या तिकिटात प्रवास, ज्येष्ठ नागरिकांसाठी तिकिटात सवलत, तर ७५ वर्षांवरील नागरिकांसाठी मोफत प्रवास आहे, तर दिव्यांग प्रवाशांनाही प्रवासात सवलत देण्यात येत आहेत. सवलतीत प्रवास उपलब्ध आहे. परंतु सोयी सुविधा म्हणाव तशा उपलब्ध नाहीत. त्यामुळे एसटी महामंडळाने सवलतीसह बसेसची सुविधा प्रवाश्यासाठी उपलब्ध करावी.

**- माधुरी पंडित, महिला प्रवासी**

### आणखीन नवीन बसेस उपलब्ध करून द्या

एस.टी. महामंडळाच्या अनेक बसेस या भंगार अवस्थेत तसेच पत्रे तुटलेले, दरवाजे तुटलेले, खिडक्या निखळलेल्या असल्याने नव्या बसेस मागवण्याची गरज आहे. याकडे महामंडळाचे दुर्लक्ष होताना दिसून येत आहे. यामुळे प्रवाशांना भंगार बसेस मध्येच आपला जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. महामंडळाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन प्रवाशांच्या सोयीसाठी आणखीन नवीन बसेस उपलब्ध करून द्याव्यात.

**- हरी देशपांडे, प्रवासी**

## श्री बिरोबा, महालिंगराय मंदिरासाठी सहकार्य करू



### खा. प्रणिती शिंदे, आ. देवेंद्र कोठे यांची ग्वाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**
शहरातील श्री बिरोबा व महालिंगराया यांच्या मंदिराच्या जिर्णोध्दारासाठी तसेच मंदिर परिसराच्या सर्वांगिण विकासासाठी आपण सर्वोतोपरी मदत करु, असे आश्वासन खा. प्रणिती शिंदे, आ. देवेंद्र कोठे यांनी यावेळी दिले. दरम्यान, अश्विनी हॉस्पिटल परिसरातील श्री बिरोबा महालिंगरायाची यात्रा यंदा मोठ्या उत्साहात पार पडली.

यावेळी सिध्देश्वर कारखान्याचे एम डी समीर सलगर, वरिष्ठ पोलिस निरिक्षक धनाजी शिंगाडे, गुरुशांत धुत्तरगावकर, महादेव काकडे, पोलिस निरिक्षक गोविंद पांढरे, भारत कटारे, शिवाजी कांबळे, अमोल कारंडे, गुरुभाई कावडे, राम वाकसे, संभाजी गावडे, देवेंद्र मदने, विलास पाटील, चंद्रकांत वाघमोडे, भगवान बनसोडे, संजय बनसोडे, उज्वल माने, आप्पाराव वाघमोडे, रमेश तरंगे, राहुल कटारे, शेखर बंगाळे, लक्ष्मण तरंगे उपस्थित होते.

अभिषेक महापूजा नैवेद्य आरती, श्री बिरोबा महालिंगराया पालखी लष्कर, महालिंगराया पालखी कुमठे, वीर लिंगेश्वर पालखी ७० फूट रोड महालक्ष्मी पालखी, शंकर नगर पालखी आगमनानंतर मिरवणूक, वीर खेळणे, देवभेट, नंदादीप प्रज्वलित करणे, आरती, आंबील व महाप्रसाद वाटप, धनगरी ओव्या इत्यादी कार्यक्रम पार पडले. यावेळी रमेश तरंगे, बेगडनूर यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सदाशिव होनमाने यांनी केले.

# शाळेतून शिपाईपद गायब

### तात्पुरत्या भरतीचा शिक्षण संस्थांना अधिकार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**
खासगी अनुदानित शिक्षण संस्थांमधील शिपायांची पदभरती बंद केल्याने राज्यातील खासगी संस्थांमधील तब्बल २५ हजार जागा कायमच्या रद्द करण्यात आले आहेत. दुसरीकडे २०२३-२४च्या संचमान्यतेनुसार लिपिक संवर्गातील ४४७० व प्रयोगशाळा सहाय्यक १५३० पदे अशा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहा हजार जागा भरल्या जाणार असून त्यासंबंधीचा शासन निर्णय निघाला आहे. पण, सरळसेवेतून या जागा भरण्याचा अधिकार संस्था चालकांना देण्यात आला आहे.

शालेय शिक्षण विभागाच्या निर्णयानुसार खासगी अनुदानित शिक्षण संस्थांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीचा मार्ग मोकळा झाला आहे. आकृतिबंध निश्चित नसल्याने सहा ते सात वर्षांपासून शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती झाली नव्हती. आता तो आकृतिबंध निश्चित करून २०२३-२४च्या संचमान्यतेवरून शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदभरती होणार आहे. एकूण मंजूर पदांपैकी ८० टक्के पदभरती करता येणार आहे. पण, सध्याचा संस्थांमधील कार्यरत शिपाई सेवानिवृत्त झाल्यावर त्याठिकाणी अनुदानित तत्त्वावर शिपाई भरता येणार नाही.

### हमीपत्र घेणे बंधनकारक

शाळांमधील अनुदानित तत्त्वावरील शिपाई हे पद कायमचे रद्द करण्यात आले आहे. अनुदानित शैक्षणिक संस्थांना शासनाकडून मिळणाऱ्या वेतनेतर अनुदानातून शिपाई भरता येईल. पण शिपाई पदभरतीवेळी त्याच्याकडून पुढे कायमची मागणी करणार नाही, असे हमीपत्र घेणे बंधनकारक आहे.

**- सचिन जगताप,**
**माध्यमिक शिक्षणाधिकारी, सोलापूर**

### शिपाई पद रद्द करण्याचा निर्णय चुकीचा

शाळेत शिपाई नसल्याने घंटा मारणे व स्वच्छता करण्यासाठी शिक्षकानाच काम करावे लागणार आहे. शिक्षकांनी अध्यापनाचे काम करावे कि शाळेच्या स्वच्छतेचे काम करावे. नोकरीची हमी नसल्याने खासगी शिपायाकडून कामाची शाश्वती असणार नाही. शाळेतील शिपाई पद रद्द करण्याचे निर्णय चुकीचे आहे. संस्थेऐवजी शासनाकडून शिपाई पद भरण्यात यावे.

**-बसवराज कुमठेकर, मुख्याध्यापक,**
**लोकसेवा विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, मंद्रुप**

### तुटपुंज्या मानधनावर मजूर नेमावे लागणार

शाळेतील भौतिक सुविधांची निगा राखण्यासाठी व स्वच्छतेसाठी शिपाई पद महत्वाचे आहे. परिक्षा कालावधीत प्रत्येक गोष्टीसाठी शिपाई आवश्यक असतो. आजारी कालावधीत व इतर वेळी विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी शिपाई नसल्याने सर्वच बाबींचा शिक्षकावर ताण पडणार आहे. वेतनेतर अनुदानातून शिपायाना वेतन देण्याचे सूचविण्यात आले असले तरी हे अनुदान वर्षातून एकदा मिळत असल्याने स्वच्छतेसाठी तूटपुंज्या मानधनावर मजूर नेमावे लागणार आहे .

**-शंभूराजे भरले,**
**अध्यक्ष, श्री सोमेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, हत्तूर**

# डॉ. बाबासाहेबांना सोलापुरात तीन वेळा मानपत्र प्रदान

### सोलापूर नगरपरिषदेकडून दोनदा तर अस्पृश्य जनतेकडून एकदा गौरव; स्वतःच्या पायावर उन्नती करण्याचा दिला होता संदेश

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**
विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सोलापूरशी अतुट ऋणानुबंध होता. सोलापूर शहर, जिल्हयाला अनेकवेळा डॉ. बाबासाहेब यांचा पदस्पर्श लाभला. सोलापूर शहरात डॉ. आंबेडकर यांना तीन वेळा सन्मानपूर्वक मानपत्र प्रदान करण्यात आले. प्रत्येक भेटी प्रसंगी त्यांनी क्रांतीकारी संदेश दिला होता. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्या-ज्यावेळी सोलापूरला आले. त्या सर्व घटना सोलापूरकरांसाठी स्फूर्तीदायी ठरल्या. सोलापूर शहरात नगरपालिकेच्या वतीने २ वेळा आणि तत्कालीन अस्पृश्य जनतेतर्फे एकदा असे तीन वेळा डॉ.बाबासाहेबांना थाटात मानपत्र अर्पण करण्यात आले.



### अस्पृश्य जनतेतर्फे गौरव सोहळा

सोलापूर येथील थोरला राजवाडा (सध्याचे मिलिंद नगर) २४ मे १९३२ रोजी तत्कालीन अस्पृश्य जनतेच्या वतीने प्रथमच डॉ. बाबासाहेबांना मनोभावे मानपत्र प्रदान करण्यात आले. बेंच मॅजिस्ट्रेट पापय्या बाबाजी बेलपवार यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडला. यावेळी म्युन्सिपल कौन्सिलर धर्माजी नरसु खरटमल, कौन्सिलर मोहनदास अन्याबा बाबरे, विश्राम जिना भंगी, पंढरी सखाराम बंदसोडे, सिद्राम बाबुराव जाधव, दत्तू तात्या सर्वगोड, नामदेव बुधाजी बंदसोडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. अस्पृश्यांनी स्वतःच्या पायावर सर्वांगिण उन्नती करावी असा स्फूर्तीदायी मंत्र त्यावेळी डॉ. आंबेडकर यांनी उपस्थितांना दिला.

### लोकशाहीत अतिरिक्त श्रद्धाळू वृत्ती मारक

भागवत चित्रमंदिर येथे १ जानेवारी १९३८ रोजी नगरपालिकेच्या वतीने रावबहादुर डॉ. व्ही.व्ही. मुळे यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांना मानपत्र प्रदान करण्यात आले. संसदीय लोकशाहीत अतिरिक्त श्रद्धाळू वृत्ती मारक आहे. पक्षाचे विचार आणि कृती या विषयी लोकांनी कठोर चिकित्सा करून न्यायनिष्ठा केली पाहिजे, असा प्रेरक संदेश त्यांनी याप्रसंगी दिला होता.

### सार्वजनिक कार्याची मुहूर्तमेढ सोलापुरातून

येथील हरिभाई देवकरण हायस्कूलच्या कै. रा.ब. मुळे स्मारक मंदिरात दि. १४ जानेवारी १९४६ रोजी जिल्हा लोकल बोर्ड व नगरपालिकेच्या वतीने डॉ. बाबासाहेबांना मानपत्र अर्पण करण्यात आले. तत्कालीन नगराध्यक्ष रावबहादुर नागप्पा अण्णा अब्दुलपूरकर यांच्या हस्ते मानपत्र प्रदान करण्यात आले. तसेच जिल्हा लोकल बोर्डाचे मानपत्र तत्कालिन बोर्डाध्यक्ष जी. डी. साठे यांनी प्रदान केले. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मजूर मंत्री होते. सार्वजनिक कार्याची मुहूर्तमेढ मी सोलापुरात रोवली. असे डॉक्टर आंबेडकर यांनी त्यावेळी अभिमानाने सांगितले. मजूरमंत्री या नात्याने मजुरांच्या हिताकडे अधिक लक्ष देत आहे. मजूरांच्या हिताचे दहा कायदे करीत आहोत. ज्यामुळे देशाचे सामाजिक व आर्थिक दारिद्र्य दूर करण्याचा प्रयत्न असल्याचे डॉ. आंबेडकर यांनी स्पष्ट केले.

## बाबासाहेबांची मूर्ती घेण्यासाठी राजस्थानी कारागिरांकडे गर्दी

### जयंती उत्सवामुळे विविध मंडळांकडून मूर्तींची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ एप्रिल-**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती सोमवार दि. १४ एप्रिल रोजी शहर जिल्ह्यात मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे. याच पार्श्वभूमीवर शहरातील विजापूर रोड येथे राजस्थानी कारागिरांकडे बाबासाहेबांची मूर्ती घेण्यासाठी भीमसैनिकांची वर्दळ वाढत आहे.

दरम्यान, सोलापूर शहरातील बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या जल्लोषात साजरी केली जाते. १४ एप्रिल रोजी जयंती उत्सव तसेच २० एप्रिल रोजी उत्सवाची मिरवणूकीने होणारी सांगता या पार्श्वभूमीवर कारागिरांनी बाबासाहेबांच्या मूर्ती साकारलेल्या आहेत. साडेतीन फूट उंचीचे बाबासाहेबांचे मूर्ती घेण्यासाठी अनेक भीमसैनिक येथे दाखल होत आहेत. सुमारे सहा ते आठ हजार रुपये असा मूर्तीचा दर आहे. कारागीर गेल्या अनेक दिवसांपासून भगवान गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्ती सकारात आहेत. शहरासह इतर ग्रामीण भागातील विविध जयंती उत्सव मंडळाचे कार्यकर्ते बाबासाहेबांची मूर्ती पाहण्यासाठी आणि घेण्यासाठी येथे दाखल होत आहेत.



राजस्थानी कारागीर प्रत्येक जयंती उत्सव लक्षात घेऊन विविध मूर्ती साकारत आहेत. गणेशोत्सव काळात गणपती बाप्पाची मूर्ती, शिवजन्मोत्सव काळात छत्रपती शिवाजी महाराज यांची मूर्ती, त्याच पद्धतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवानिमित्त बाबासाहेबांची मूर्ती, तसेच भगवान गौतम बुद्ध यांची मूर्ती देखील या कारागिरांनी साकारलेली आहे.

दिवसेंदिवस येथील कारागरांची कारागिरी वाढत आहे. सुबक आकर्षक आणि बजेटमध्ये बसणाऱ्या मूर्ती येथे मिळत असल्याने विविध मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात दाखल होत आहेत, असे कारागरांनी सांगितले. तर सर्व साधारणपणे मिरवणुकीमध्ये बाबासाहेबांची प्रतिमा रथावर ठेवली जाते. डॉ. बाबासाहेबांच्या जयंती उत्सवाच्या निमित्ताने शहरात आनंदाचे व प्रसन्नतेचे वातावरण आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०८६

**विषाचे आगरही वाहती। ते विकितां सुखें लाभें जिती।**
**येर निमालें जे घेती। वेंचोनि मोलें।।**

महाविदयालयात शिकायला असतांना माझा एक वर्ग मित्र बिडी, तंबाखु, सिगरेट ओढणाऱ्यांवर, मद्य प्राशन करणाऱ्यांवर नेहमी खुप चिडायचा. प्रवासात जर कोणी त्याच्या आजूबाजूला बिडी, सिगरेट ओढली किंवा तंबाखु खाऊन थुंकू लागला तर त्याच्या तळपायाची आग मस्तकाला जायची. रस्त्याने एखादा मद्य प्राशन करणारा भेटला तर हा बराच वेळ अशा लोकांबद्दल चिडुन बोलत राहायचा. मला अशा लोकांची खूप किळस येते, असे म्हणायचा. आम्हाला त्याचा हा स्वभाव पाहून वाटायचे की हा पुढे निश्चितच व्यसन मुक्तीचा मोठा प्रसारक होईल. माहिती नाही, मध्यंतरीच्या काळात काय झाले ते? कारण सुमारे पंधरा वर्षां नंतर त्याची माझी भेट झाली. आम्ही प्रेमाने एकमेकांना मिठी मारली. मी खूप आनंदी झालो; पण त्याला माझ्या एवढा आनंद झाल्याचे मला जाणवले नाही. थोडया वेळेनंतर त्याच्या सोबत आलेला त्याचा मित्र मला म्हणाला, माऊली तुम्हीच काहीतरी याला सांगा. मी म्हटले कशाबद्दल? माझा मित्र त्याला बोलण्यापासून रोखत होता, तरीही तो बोलू लागला. म्हणाला, की ह्याला दारू पिऊ नको म्हणून सांगा... तो बरेच काही बोलला. मला हे ऐकून अत्यंत वाईट वाटले. काही काळापूर्वी मद्य प्राशन करणाऱ्यांवर चिडणारा, त्याची किळस वाटणारा हा मित्र एकदम विरूध्द भुमिकेमध्ये कसा काय गेला? मला माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळत नव्हते. कोणाचा तरी चुकीचा सहवास लाभला असेल, काहीतरी प्रसंग आला असेल, काही का असेना चुक ते चुकच. मद्य, बिडी, सिगरेट पिणाऱ्यांवर चिडुन, त्यांना काही तरी कठीण बोलुन नंतर मी कसा त्याला झापलो, अशा अविर्भावात आनंद मानणारा हा मित्र असा स्व:तच व्यसनी होऊन व्यसनात आंनद मानत होता. एकाच विषयाबाबतची आनंदाची परिभाषा एवढी उलट होऊ शकते, खरेच हे पटण्यासारखे नव्हते. स्वत:वरील त्याचे खरे प्रेम कमी झाल्याचे हे प्रतिक होते. याच्या व्यसनी होण्यामुळे चार-दोन व्यसनींच्या आनंदात भर पडलीही असेल; पण हा व्यसनी झाल्याने अनेकांच्या भावनेला, अपेक्षेला तडा गेला, त्यांचा आनंद नष्ट झाला असेल त्याचे काय ? व्यसनातला आनंद हा अल्पावधीचा असतो. त्याचे विपरीत परिणाम दीर्घ कालावधीचे व पैशात न मोजता येणारे नुकसानकरून जाणारे असतात. श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या,



**विषाचे आगरही वाहती। ते विकितां सुखें लाभें जिती।**
**येर निमालें जे घेती। वेंचोनि मोलें।।**

या म्हणण्याप्रमाणे मद्य, बिडी, तंबाखू सारखे अखाद्य, अपेय वीष विकणाऱ्यांनी हे वीष विकून सुखी व्हायचे आणि पैसा खर्चून घेणा-यांनी शारीरिक, मानसिक, भावनिक, आर्थिक हानी करून घ्यायची. आपल्याबरोबर सहवासातील लोकांच्या जीवनातला आनंद नष्ट करुन टाकायचा आणि व्यसनाला मजा, आनंद असे गोंडस नाव द्यायचे हे कितपत योग्य आहे ते आपणच ठरवायला हवे. असो, मी माझया मित्राला व्यसनातून बाहेर काढू शकलो, याचा मला आनंद आहे.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : सोमवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. १४ एप्रिल २०२५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर |
| विक्रम संवत् २०८१ | जयंती, बैसाखी (पंजाब) |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - चैत्र | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. प्रतिपदा (०८.२४) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - स्वाती (२४.१२) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - वज्र (२२.३७) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - तैतिल (२१.४०) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल. मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल.

**वृषभ :** लोभ - लालचे पासून दूर रहा. अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. धंदा मध्यम राहील. कौटुंबिक परिवारात सुख - शांती मिळेल.

**मिथुन:** व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता.

**कर्क:** वहान चालविताना सावधानीने चालवा. अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. नवीन योजनांची सुरूवात कराल.

**सिंह :** प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता. व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. पत्नीसोबत मतभेद होईल.

**कन्या :** कामकाजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील. कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे.

**तुळ :** आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल.

**वृश्चिक :** व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**धनु :** मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. सहयोगी मदत करणार नाहीत.

**मकर :** सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ :** मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन:** आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा. जीवनात आनंदी रहाल. कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत.

# पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना मिळणार पाठ्यपुस्तके अन् गणवेश

### शहरातील ७२ हजार ६२० विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके

### महापालिकेच्या ४ हजार ९६६ विद्यार्थ्यांना गणवेश

### प्रशासनाधिकारी गिरीश पंडित यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

येथील महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या अंतर्गत येणाऱ्या महापालिकेच्या आणि सर्व माध्यमाच्या खाजगी शाळांमधील विद्यार्थ्यांना सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी शाळेच्या पहिल्या दिवशी मोफत पाठ्यपुस्तके देण्याची परंपरा या वर्षीही कायम राखली जाणार आहे त्यासाठीची तयारी बालभारती आणि महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या वतीने पूर्ण केली आहे. पाठ्यपुस्तकावरच महापालिकेतील शाळेतील मुलांना प्रत्येकी दोन गणवेश शाळेच्या पहिल्या दिवशी दिले जातील शाळेच्या पहिल्याच दिवशी महापालिका शिक्षण मंडळातील ६३ शाळा खाजगी अनुदानित २६२ शाळा अशा एकूण ३२५ लाभार्थी शाळांना सहा माध्यमाच्या पात्र शाळेतील ७२ हजार ६२० विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके देण्यात येणार आहेत एक जून नंतर सर्व शाळांना वेळापत्रकानुसार पाठ्यपुस्तके दिली जातील अशी माहिती महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी आणि महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित यांनी दिली आहे.



शाळेच्या पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तकांसह, समग्र शिक्षा अंतर्गत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता, महानगरपालिका ६३ शाळेतील ४ हजार ९६६ या सर्व लाभार्थी विद्यार्थ्यांना, शाळा व्यवस्थापन समिती स्तरावरुन प्रत्येकी दोन जोड शालेय गणवेश शाळेच्या पहिल्याच दिवशी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. अशी माहिती प्रभारी प्रशासन अधिकारी गिरीश पंडित यांनी दिली.

सोलापूर शहरातील मराठी, इंग्रजी, हिंदी, कन्नड, तेलगू आणि उर्दू या सर्व माध्यमाचे मिळून ३२५ शाळा मधील पहिली ते आठवीच्या ७२ हजार ६२० विद्यार्थ्यांना ४ लाख ४० हजार ५८१ पाठ्यपुस्तकांचे वाटप त्या-त्या भागातील लोकप्रतिनिधींच्या आणि मान्यवर पालकांच्या हस्ते शाळेच्या पहिल्याच दिवशी वाटप केले जाणार आहे. त्या दिवशी मुलांचे शाळेत जंगी स्वागत करण्यात येणार आहे. शाळांची स्वच्छता करणे, वर्गाची सजावट करणे, तसेच मुलांचे स्वागत वाजत गाजत करणे, यासह गुलाब पुष्प देऊन विविध रंगांचे फुगे उडवून आणि मिठाई देवून करण्यात येणार आहे याची तयारी करण्यासाठी शिक्षकांना दोन दिवस आधीच म्हणजेच शाळेत उपस्थित राहण्याच्या सूचना प्रभारी प्रशासनाधिकारी गिरीश पंडित यांनी केल्या आहेत.



## ‘ऑर्किड’चे करण राजपूत यांची आंतरराष्ट्रीय इंटर्नशिपसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

नागेश करजगी ऑर्किड अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालया सोलापूरच्या यंत्र अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थी करण राजपूत यांना ओमान येथील प्रतिष्ठित अमियंटिट ओमान कंपनी मध्ये इंटर्नशिप करण्याची संधी मिळाली आहे.

अमियंटिट ओमान कंपनी ही ओमानमधील , सऊद बहवान ग्रुप आणि सुहैल बहवान ग्रुप या प्रमुख व्यावसायिक घराण्यांच्या संयुक्त उपक्रमातून १९७४ मध्ये राजकीय जाहीरनाम्याद्वारे स्थापन करण्यात आली. ही कंपनी सुलतानते ऑफ ओमानमधील सर्वात मोठ्या उत्पादन कंपन्यांपैकी एक आहे. करण राजपूत यांना या आंतरराष्ट्रीय इंटर्नशिपच्या माध्यमातून औद्योगिक उत्पादन प्रक्रिया, प्रकल्प व्यवस्थापन, आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण मिळणार आहे. या संधीसाठी यंत्र अभियांत्रिकी विभागाचे उपप्राचार्य डॉ. एस. एस. मेतन यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. के. सोनगे, विभागप्रमुख प्रा. एस. एस. काळे यांनी करणचे अभिनंदन केले.

## जंगम समाजातील बटूंसाठी शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

श्री बृहन्मठ होटगी संस्थेच्या वतीने काशी जगद्गुरु डॉ मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या सानिध्यात व मठाधिपती चन्नयोगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या उपस्थितीत अक्कलकोट रोडवरील श्री वीरतपस्वी मंदिर येथे गुरुवार २४ ते २४ मे या कालावधीत जंगम समाजातील बटूंसाठी श्री रुद्र अध्ययन, पौरोहित्य, ज्योतिष व योगासन शिबिराचे आयोजन केले आहे. ज्या जंगम बटूंचे वय वर्षे १३ पूर्ण झालेले आहे. अशाच बटूंच्या पालकांनी बुधवार २३ एप्रिलपर्यंत अक्कलकोट रोडवरील श्री वीरतपस्वी मंदिराच्या कार्यालयात नाव नोंदवावे असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आलेले आहे. अधिक माहितीसाठी ९४२२४२१७७४ क्रमांकवर संपर्क साधावा.

## बाबू जगजीवनराम झोपडपट्टीमध्ये आरोग्यवर्धिनी केंद्राचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

बाबू जगजीवनराम झोपडपट्टीमध्ये मयत झालेल्या जिया व ममता या मुलींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आई-वडिलांच्या हस्ते मोदी परिसरात आरोग्यवर्धिनी केंद्राचे भूमिपूजन करण्यात आले.



सोलापूर मधील बाबू जगजीवनराम झोपडपट्टीत दूषित पिण्याच्या पाण्यामुळे दोन मुली मृत्यू पावल्या होत्या. शिवसेनेच्या राज्यप्रवक्त्या प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांच्या नेतृत्वात शिवसेनेने सोलापूर महानगरपालिकेवर आंदोलन करत त्या मुलींना आर्थिक मदत मिळावी व त्या भागातील ८५ गाळा येथील तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांनी मंजूर केलेला हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना त्वरित सुरू व्हावा अशी मागणी केली होती.या आंदोलनानंतर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी या झोपडपट्टी भागात त्या मृत मुलीच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांना पालकमंत्री यांच्याकडून एक लाख व महाराष्ट्र राज्य शासनाकाढून पाच लाख रुपयाची मदत जाहीर केली होती. दवाखाना त्वरित सुरू करण्याचे आदेश दिले होते. पालकमंत्र्यांच्या आदेशानंतर मोदी येथील ८५ गाळा येथे आरोग्यवर्धिनीचे भूमिपूजन करण्यात आले. यामुळे येथील गोरगरीब नागरिकांनां त्या परिसरातच आरोग्य सेवा मिळणार आहे. तसेच रक्तदाब व मधुमेह या आजाराचे औषधही मोफत मिळणार आहेत. यावेळी शिवसेना राज्य प्रवक्त्या प्रा.डॉ ज्योती वाघमारे, युवा सेना जिल्हाप्रमुख प्रियदर्शन साठे, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने, मोची समाज युवक अध्यक्ष रतिकांत कमलापुरे, अविनाश बेंजर्पे, दीपक पाटील, भीमा मरेडी, गणेश तुपदोळे, सचिन गुंटूनुळ, अविनाश जाधव, स्वप्निल कांबळे उपस्थित होते.

## कंटेनरमधील गोवा बनावटीची दारू पकडली

### ३७२ बॉक्स दारूसह ५३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या मुंबई भरारी पथकाकडून कंटेनरमधून होणारी गोवा बनावटीच्या दारूची अवैध वाहतूक पकडून ३७२ बॉक्स दारूसह ५३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यावेळी संशयित आरोपी मात्र पळून गेला.



राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या मुंबई येथील भरारी पथकास मिळालेल्या माहितीवरून पथकाने सोलापूर जिल्ह्यातील केगाव-हत्तुर बायपास रोडवरील बसवेश्वर नगर येथील अलवर - मेवात हॉटेल हरियाणा राजस्थान ढाब्याच्या पार्किंगमध्ये लावलेला संशयित कंटेनरची तपासणी केली. त्यावेळी त्या कंटेनरचा चालक हा राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकास पाहून अंधाराचा फायदा घेत पळून गेला.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने या कंटेनरमधून गोवा बनावटीच्या दारूचे ३७२ बॉक्स (१७८५६ बाटल्या) जप्त केल्या. या कारवाईत १२ चाकी कंटेनरदेखील जप्त करण्यात आला असून याबाबत अज्ञात वाहनचालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास दुय्यम निरीक्षक प्रशांत निकाळजे करीत आहेत.

ही कारवाई आयुक्त डॉ. राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे उपअधिक्षक रविंद्र उगले, निरीक्षक रियाज खान, विजयकुमार थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली दुय्यम निरीक्षक प्रशांत निकाळजे, जवान अमोल चौगुले, रमाकांत कारंडे, महेश कोकणे, संकेत ताठे यांनी केली.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्या समोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती,
मो. ९९६००५३५२१

**अलकः- (१०७)**
**साध्यं- सिद्धं- सिद्धता**

विजयाशमीच्या सुमुहुर्तावरसंघ स्थापन झाला तेव्हापासून आजतागायत संघाचे अनेक क्षेत्रात म्हणजे बौद्धिक- नैतिक- धार्मिक- सामाजिक- शारीरिक- राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात सिमोल्लंघन प्रयत्नपूर्वक झालेआहे. उदाः- व्यक्तिगत जीवनातून- समष्टी जीवनाकडे; दास्याकडून- स्वातंत्र्याकडे; निद्रेतून- जागृती कडे; दैन्यातून- समृद्धीकडे ; दौर्बल्ल्यातून- सशक्तीकरणाकडे असे सिमोल्लंघन झाले. मोठ्या प्रमाणावर जनजागरण झाले. गरजेनुसार साध्यं- सिद्धं- सिद्धता झाली आहे. **- क्रमश:**

# प्रा. मिलिंद जोशी यांची साहित्य महामंडळावरची निवड म्हणजे सरस्वती पुत्राचा सन्मान

**महाराष्ट्र साहित्य परिषद पुण्याचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांची नुकतीच अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. आतापर्यंतच्या साहित्य महामंडळाच्या आणि साहित्य परिषदेच्या इतिहासात एका तरुण व्यक्तीला ही संधी मिळाली आहे त्या संदर्भातला हा लेखन प्रपंच...**

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सोलापूरचे सुपुत्र, ज्येष्ठ लेखक आणि प्रसिद्ध वक्ते आणि महाराष्ट्र साहित्य परिषद पुण्याचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी या चतुरस्त्र वक्तृत्व असणाऱ्या सरस्वती पुत्रावर आहे. प्रा.जोशी हे वक्तृत्व संपन्न, चांगले लेखक तर आहेतच पण त्याचबरोबर चिंतनशील आणि श्रोत्यांची नाळ ओळखणारे ते प्रसिद्ध वक्ते आहेत. चांगला माणूसमेळ घालण्याची क्षमता त्यांच्या मध्ये आहे. महाराष्ट्र आणि महाराष्ट्रा बाहेर सर्वदूर व्याख्यानाच्या निमित्ताने त्यांची भ्रमंती झाल्यामुळे ते सर्वांना परिचित आहेत. त्यामुळे साहित्याच्या बाबतीत चांगलं काही घडवण्याची आणि उत्तम साहित्य संमेलन नियोजन करण्याची क्षमता त्यांच्यात निश्चितच आहे. यापुढील ९९ वे १०० वे आणि १०१ वे साहित्य संमेलनाच्या नियोजनाची जबाबदारी आता पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेवर म्हणजेच पर्यायाने प्रा. मिलिंद जोशी यांच्यावर असणार आहे.

महाराष्ट्रातील आद्य साहित्य संस्था असा नावलौकिक असणाऱ्या महाराष्ट्र साहित्य परिषदेंच्या १२० व्या वर्षाच्या इतिहासातले ते सर्वात तरुण कार्याध्यक्ष आहेत. आता तर अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ही ते तरुण अध्यक्ष असतील त्यांच्या कार्याध्यक्षच्या कार्यकाळात त्यांनी साहित्य परिषदेला साहित्याभिमुख आणि लोकाभिमुख केले. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने परिषदेच्या कार्याचा विस्तार केला. ग्रामीण भागात परिषदेचे काम गतिमान केले. वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम राबिविले. समाजपयोगी एखादी भुमिका घेताना त्याची मांडणी,त्यांच्या स्वभावातला स्पष्टवक्तेपणा आणि आंतरिक असणारी तळमळ दिसुन येते. महाराष्ट्राच्या साहित्यिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील तरुणाईला योग्य दिशा देणारे हे व्यक्तिमत्व आहे. साहित्य महामंडळाच्या अध्यक्षपदासाठी त्यांना मनापासून शुभेच्छा तर द्यायला हव्यातच पण त्याचबरोबर त्यांच्याकडून साहित्य संमेलनाचे नियोजन चांगले घडेल घडे असा विश्वासही नक्कीच आहे. महाराष्ट्रात आपल्या अमोघ वक्तव्याने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणारे अनेक वक्ते असले तरी मी मात्र खर्या अर्थाने चतुरस्त्र म्हणता येईल अशा एका व्यक्तिच्या संपर्कात गेल्या अनेक वर्षांपासून आलो आहे. ते म्हणजे महाराष्ट्रातील ज्येष्ठ साहित्यिक आणि अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेले चतुरस्त्र वक्ते प्रा.मिलिंद जोशी यांचे नाव अग्रस्थानी घ्यावे लागेल. मैत्रीचा धर्म जोपासणारे आणि ‘व्यवसायाने अभियंता, वृत्तीने वक्ता आणि लेखणीचा चाहता असे प्रा.जोशी यांचे व्यक्तिमत्त्व आहे. ते आज आपल्या वयाची पन्नाशी ओलांडत आहेत. दसऱ्याचे सोने लुटावे तसे साहित्याचे सोने लुटण्यासाठी प्रा.जोशी म्हणजे शब्दपेढी आहे. श्रीमंत मित्रा सोबत वावरतांना गरीब मित्र दुर्लक्षित झाला नाही पाहिजे,आणि गरीब मित्रा बरोबर वावरतांना श्रीमंतीचा आवाज आला नाही पाहिजे.अशा गुणवत्तेच्या बळावर दमदार वाटचाल करणारा हा तरूण साहित्यिक आणि वक्ता हे महाराष्ट्र शारदेचे लेणे आहे’ अशा शब्दात ’वक्तृत्वाचे शिवाजी असे प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी प्रा.मिलिंद जोशी यांचे यथोचित वर्णन केले आहे. प्राचार्यांच्या या वारसदाराची दोन दशकातली वक्तृत्वाच्या प्रांतातली कामगिरी आश्वासक आणि प्रेरक आहे. आताच्या धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्यातील परंडा तालुक्यातील माणकेश्वर या छोट्याशा खेड्यात सामान्य शेतकरी कुटुंबात मिलिंद जोशी यांचा जन्म झाला. मुलामधले वक्तृत्व गुण ओळखून त्यांच्या आई-वडिलांनी त्यांना प्रोत्साहन दिले. बार्शीच्या सुलाखे हायस्कूलमधील शिक्षकांनी या गुणी मुलाला उत्तेजन दिले. शाळकरी असल्यापासून मिलिंद जोशी हे प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या वक्तृत्वाचे भक्त बनले. त्यांचा त्यांना जवळून सहवास लाभला. पुढे प्राचार्यांचे चरित्रही त्यांनी लिहिले. कराडच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात स्थापत्य अभियांत्रिकीचे शिक्षण घेताना पाणिनी, आचार्य अत्रे यासारख्या नामवंत राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा जिंकणाऱ्या मिलिंद जोशींनी पदवीनंतर कॉर्पोरेट जगात काम करतानाही वक्तृत्वाची कास सोडली नाही. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद निवडणूक न घेता साहित्यिकांना बिनविरोध निवडीने सन्मानपूर्वक दिले जावे यासाठीच्या घटनाबदलासाठी त्यांनी पुढाकार घेतला आणि त्याला यशही आले. त्यामुळे साहित्य रसिकांना त्यांच्या मनातले साहित्य संमेलनाध्यक्ष मिळाले. पुण्याच्या सांस्कृतिक विश्वात जोशी यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेला केंद्रस्थानी आणले. उपक्रमातील सातत्य, वैविध्य आणि गुणवत्ता यामुळे साहित्य रसिकांचा परिषदेतला राबता वाढला. तो प्रा.मिलिंद जोशी यांच्यासारख्या समाजमनाची नस ओळखणाऱ्या नेतृत्वामुळे विशेष महत्त्वाचे म्हणजे मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी त्यांनी लोकचळवळ उभा केली. सातत्याने पाठपुरावा तर केलाच पण दिल्लीत जाऊन धरणे आंदोलनही केले.



या अध्यक्षपदाच्या निमित्ताने त्यांच्या कार्याची व्याप्ती आणि जबाबदारी ही आणखी वाढणार आहे. ही जबाबदारी मिलिंद जोशी व्यवस्थित पेलतील किंबहुना स्वतःच्या वैशिष्ट्यपूर्ण कार्यशैलीचा एक अमिट ठसा महामंडळाच्या कार्यावरही उमटवतील याची आम्हाला खात्री आहे. आता तीन वर्षासाठी अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी प्रा. मिलिंद जोशी या सरस्वती पुत्राकडे आली आहे. ही जबाबदारी ते समर्थपणे पार पाडतील आणि एक वेगळा आपला ठसा या माध्यमातून उमटवतील असा विश्वास आम्हा सोलापूरकरांना वाटतो त्यांच्या पुढील कार्याला, तमाम सोलापूरकर, धाराशिवकर, आणि बार्शीकर यांच्या वतीने शुभेच्छा..!

**- पद्माकर मा.कुलकर्णी**
**मसाप, पुणे सोलापूर जिल्हा प्रमुख**
**सोलापूर.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### महात्मा फुले यांच्या विचारांनी नव्या पिढीला मिळाली प्रेरणा : आ. पाटील

**मोडनिंब, दि. १३ एप्रिल-**

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी समाजात समता, शिक्षण आणि शेतकरी कल्याणाचा जो दीप पेटवला, तो आजही समाजाला मार्गदर्शक ठरतो. त्यांच्या विचारांमधून नव्या पिढीने प्रेरणा घेतली पाहिजे, असे प्रतिपादन आमदार अभिजीत पाटील यांनी केले. मोडनिंब (ता .माढा) येथे महात्मा फुले जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात आमदार पाटील बोलत होते. यावेळी लोकव्याख्यानकार विशाल गरड यांनी 'क्रांतिसूर्य महात्मा फुले : एक विचार पर्व' या विषयावर प्रभावी व्याख्यान दिले. त्यांनी फुले यांचे सामाजिक परिवर्तन, स्त्रीशिक्षणासाठी घेतलेले परिश्रम, शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढा आणि त्यांचे क्रांतिकारी कार्य यावर सखोल प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा फुले यांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. ग्रामपंचायत कार्यालय, महामार्ग पोलीस मदत केंद्र, शाळा व सामाजिक संस्थांकडून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यानंतर अनेक मान्यवरांनी महात्मा फुलेंच्या विचारांवर आधारित भाषण सादर केली. त्यांच्या कार्याचा आढावा घेत नव्या पिढीपर्यंत हे विचार पोहोचवण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. महात्मा फुले जयंती उत्सव समितीच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी माजी जि.प. अध्यक्षा निशिगंधा कोल्हे , जि.प. सदस्य भारत शिंदे, ग्रा.प. सदस्य बालाजी पाटील, कुरण गिड्डे, नागेश माळी, विजयकुमार नामदे, बाबुराव माळी, दामोदर माळी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बालाजी माळी, विजय जाधव, मयूर नामदे, अतुल माळी, रोहन माळी, मृदुल माळी,प्रशांत खिलारे, अजित चोपडे यांनी परिश्रम घेतले.



### जि.प.कन्नड शाळेतील सातवीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**वळसंग, दि. १३ एप्रिल-**

शिरवळ तालुका अक्कलकोट येथे जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळेचे सातवी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान महादेव बिराजदार तर प्रमुख अतिथी म्हणून दयानंद वरनाळे, ना.प.बिराजदार, केंद्रीय मुख्याध्यापक तोरप्पा चव्हार,दत्तात्रय काळे, शालेय शिक्षक शिवानंद धंगापुरे, मुख्याध्यापक ह.ये. सुतार, सौ सलगरे, विद्या चिंतुरे आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवराकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. सातवी विद्यार्थी कडून शाळेसाठी ब्लूटूथ सप्रेम भेट देण्यात आले. सूत्रसंचालन व आभार शिक्षक खांडेकर यांनी केले.

### तीर्थ येथे आजपासून रामलिंगेश्वर यात्रा

**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**



श्रीक्षेत्र तीर्थ (ता. द. सोलापूर )श्री प्रभू रामचंद्राच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या तीर्थ येथील श्री रामलिंगेश्वर यात्रा सोम वार दिनांक १४ एप्रिल पासून प्रारंभ होत आहे. सोमवारी पहाटे पासून आपापल्या घरापासून भाविकांचे नवस फेडण्यासाठी श्री रामलिंगेश्वर मंदिरापर्यंत दंडवत घालण्याचा कार्यक्रम, सकाळी सात वाजता श्रीची पालखी मिरवणूक, नंदिध्वज मिरवणूक, आणि गूळ खोबरे प्रसाद वाटप उपक्रम सायंकाळी पाच वाजता राजेंद्र माणिक जाधव यांनी संपूर्ण महाप्रसाद सेवा श्री चरणी समर्पित केली आहे. रात्री १० वाजता पौराणिक कन्नड बैलाट होणार आहे. तुळजाराम राजाराम वाघमोडे, मंद्रूप यांनी महाप्रसाद सेवेसाठी ७५००० रुपये देणगी श्री रामलिंगेश्वर पंच कमिटीस अर्पण केली आहे. दि. १५ एप्रिल रोजी श्री रामलिंगेश्वर मूर्तीस रुद्राभिषेक व तैलाभिषेक, संपूर्ण गावात नंदिध्वज मिरवणूक, सकाळी ११ वाजल्यापासून कन्नड मधून कलगी तुऱ्याची गाणी, सायंकाळी ५ वाजता सोलापूर येथील भाविक श्री सिद्धाराम नागनाथ राचोटी यांनी श्री चरणी महाप्रसाद सेवा समर्पित केली आहे. रात्री १० वाजता कन्नड नाटक होणार आहे. दि. १६ एप्रिल रोजी पहाटे श्रीच्या मूर्तीस रुद्राभिषेक व तैलाभिषेक, दिवसभर कलगी तुऱ्याची गाणी, चार वाजता कै. धानप्पा फताटे स्मृती ढाल कुस्ती व श्री रामलिंगेश्वर पंच कमिटीच्या वतीने जंगी मल्लांच्या कुस्त्या, सायंकाळी सहा वाजता ॲड. विक्रांत फताटे यांनी महाप्रसाद सेवा श्री चरणी समर्पित केली आहे. सायंकाळी आठ वाजता श्रीची पालखी मिरवणूक, शोभेचे दारूकाम, नंदिध्वज मिरवणूक भजन गायन, होणार आहे. रात्री १० वाजता कन्नड नाटकाचे आयोजन करण्यात आले आहे. देवस्थान पंच कमिटी सदस्य विश्वनाथ पावले, प्रभुलिंग शेळगे, अहमद मुल्ला, करबसप्पा पाटील, सिद्धाराम उदंडे, डॉ. सुभाष गुरव यांनी यात्रेचे नियोजन केले आहे. यात्रेतील विविध उपक्रमाचा महाप्रसादचा, दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन यात्रा समिती समन्वयक प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार यांनी केले आहे.

### उमरड येथे हनुमान जयंती निमित्त युवा कीर्तनकार ॲड. सरोदे यांची कीर्तनसेवा

**करमाळा, दि. १३ एप्रिल-**



उमरड (ता.करमाळा) येथे हनुमान जयंती निमित्त ॲड.प्राची सरोदे यांचे कीर्तन झाले हनुमान जयंतीच्या अनुषंगाने सकाळी चार ते ६:१५ पर्यंत हरी जागराचा कार्यक्रम झाला नंतर बजरंग बली यांना अभिषेक करून सकाळी दहा ते बारा या वेळेत युवा कीर्तनकार प्राची सरोदे करमाळा यांचे हरी किर्तन झाले. कीर्तनानंतर संतोष धर्मराज बदे, रवींद्र पांडुरंग गिरी, स्वप्निल नामदेव कोठावळे, किशोर रामा बदे, आदित्य बाळासाहेब पाटील यांच्याकडून अन्नदानाचा कार्यक्रम झाला. सायंकाळी बजरंगभली हनुमानाची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली.

# धर्मसंकीर्तन व्यासपीठाचे पूजन न्यायमूर्तींच्या हस्ते

## भजनसेवेने सुरूवात; श्री स्वामी समर्थांचा १४७ वा पुण्यतिथी महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १३ एप्रिल-**

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात दि. १३ ते २६ एप्रिलपर्यंत होणाऱ्या श्री स्वामी समर्थांच्या १४७ व्या पुण्यतिथी महोत्सवासाठीच्या धर्मसंकीर्तन व्यासपीठाचे पूजन नागपूर खंडपीठाच्या न्यायमुर्ती वृषाली जोशी यांच्या हस्ते झाले. यावेळी मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे, प्रथमेश इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती.



मंदार महाराज पुजारी, मोहीत पुजारी यांच्या मंत्रोच्चारात हा कार्यक्रम झाला. याप्रसंगी न्यायमूर्ती जोशी, विजय जोशी यांनी मनोभावे श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. मंदिर समितीतर्फे चेअरमन महेश इंगळे यांनी न्यायमूर्ती जोशी व श्री.जोशी यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सन्मान केला. १०० व्या पुण्यतिथीपासून धर्मसंकीर्तन महोत्सवाची परंपरा आजही चालू ठेऊन अखंड स्वामी सेवेचा वसा देवस्थान समि ती जोपासत असल्याचे श्री. इंगळे यांनी सांगितले. धर्मसंकिर्तन महोत्सवात व श्री स्वामी समर्थांच्या १४७ व्या पुण्यतिथी महोत्सवात सहभागी होण्याचे आवाहनही त्यांनी केले. या महोत्सवातील भजनसेवेची सुरुवात पंढरपूरच्या ब्रम्हचैतन्य महिला भजनी मंडळाच्या भजनसेवेने झाली. या भजन सेवेत अक्कलकोट, सोलापूर, वैराग, पंढरपूर, बारामती, मंगळवेढा, सांगोला, लातूर, माळीनगर, पुणे, पानमंगरूळ, इत्यादी ठिकाणाहून येणाऱ्या ५२ भजनी मंडळाची भजनसेवा होणार आहे. याप्रसंगी अक्कलकोटचे दिवाणी न्यायाधीश मुकुल कल्याणकर, अक्कलकोट न्यायालयाचे स्वप्निल मोरे, धनंजय कलमदाने, अविनाश सुरवसे, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, उज्वलाताई सरदेशमुख, ओंकार पाठक, शिवशरण अचलेर, अमर पाटील, मनोहर देगांवकर, धनराज स्वामी, दर्शन घाटगे, ठेंगळे, माने, मोहन जाधव, महेश मस्कले, श्रीकांत मलवे, अविनाश क्षीरसागर, संजय पाठक, स्वामीनाथ लोणारी, गिरीश पवार, सागर गोंडाळ, सिद्धाराम कुंभार, नागनाथ गुंजले, श्रीशैल गवंडी, संजय पवार इत्यादी उपस्थित होते.

### फटेवाडी पाटीजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.१३ एप्रिल-**

**अज्ञात वाहन चालकाविरुध्द गुन्हा दाखल**

मंगळवेढा-मरवडे रोडवर फटेवाडी पाटीजवळ पायी चालत जाणाऱ्या एका व्यक्तीस अज्ञात वाहनाने जोराची धडक दिल्याने ते गंभीर जखमी होवून मयत झाल्याची घटना घडली असून या प्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेची हकीकत अशी, दि. १२ रोजी पहाटे दोन वाजता मंगळवेढा-मरवडे मार्गावरील फटेवाडी पाटीजवळ अज्ञात वाहनाच्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगात बेदरकारपणे चालवून पायी चालत जात असलेल्या अज्ञात इसमास जोराची धडक देवून त्यास गंभीर जखमी केले. तसेच त्याला उपचाराकरिता हॉस्पिटलमध्ये घेवून जाणे गरजेचे असताना अपघाताची खबर पोलीस ठाण्यात न देताच निघून गेला आहे. याची फिर्याद सुनिल मच्छिंद्र फटे (पोलीस पाटील,फटेवाडी) यांनी पोलीसात दिल्यावर अज्ञात चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### महात्मा फुले जयंतीनिमित्त गृहपयोगी वस्तू संचाचे वाटप



**तभा वृत्तसेवा,**
**माळीनगर, दि. १३ एप्रिल-**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदणीकृत कामगारांसाठी माळीनगर येथे दि. सासवड माळी शुगर फॅक्टरीचे चेअरमन राजेंद्र गिरमे यांचे हस्ते गृहपयोगी वस्तु संचाचे वाटप करण्यात आले.

क्रांतीसूर्य महात्मा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून महात्मा फुले पतसंस्था माळीनगर व सत्यशोधक कामगार संघटना यांच्यावतीने माळीनगर साखर कारखान्याच्या विश्रामगृहात या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यातून जवळपास १७५ लाभार्थींना गृहपयोगी वस्तू संचाचे वाटप करण्यात येणार आहे.

कार्यक्रमास सरपंच अनुपमा एकतपुरे,कारखान्याचे होलटाईम डायरेक्टर परेश राऊत, होलटाईम डायरेक्टर गणेश इनामके,व्हा.चेअरमन निखिल कुदळे, संचालक सतीश गिरमे,राहुल गिरमे, शुगरकेन सोसायटीचे चेअरमन अमोल ताम्हाणे, व्हा.चेअरमन कपिल भोंगळे,एज्युकेशन सोसायटीचे संचालक पृथ्वीराज भोंगळे, दिलीप इनामके, अमित टिळेकर, जनक ताम्हाणे, लक्ष्मण डोईफोडे, नागनाथ तावरे, अलका तावरे, सिद्धार्थ तावरे,जयदीप एकतपुरे,आकाश बनसोडे, विकास कांबळे, राकेश तावरे, अक्षय बर्डे, ऋतुराज सरतापे, यश गायकवाड, अमर डावरे, नंदकुमार शिंदे, अनिल बनकर, योगेश कचरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी पतसंस्थेचे व्हा.चेअरमन महादेवराव एकतपुरे,जनक ताम्हाणे व सिद्धार्थ तावरे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सिद्धार्थ तावरे यांनी केले.




### कृषीमंत्री कोकाटे यांनी राजीनामा द्यावा

**युवासेनेच्यावतीने तहसीलवर मोर्चा**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १३ एप्रिल-**

महाराष्ट्रातील शेतकरी बांधवांना कर्ज माफी मिळावी, पिकविमा तत्काळ वितरित करावा, वारंवार अपमान करणारे कृषीमंत्री माणीकराव कोकाटे यांचा राजीनामा होणेबाबत युवासेना बार्शी यांच्यावतीने तहसील कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला.

निसर्गाची अवकृपा, लाईट, पाणी, खतांचे आणी बियाणांचे वाढलेल्या किंमती तसेच सरकारची शेती विषयी असणारी अनस्था यामुळे शेतीची अतिशय दयनीय अवस्था झाली आहे. उत्पादन खर्च हा प्रचंड वाढल्याने शेतमालास योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी अडचणीत आला आहे.

अवकाळीने पावसाने झालेल्या नुकसानीचे ही पंचनामे करुन तत्काळ मदत शेतकऱ्यांना करावी अन्यथा बार्शी तालुक्यात राज्य सरकाचा एकाही मंत्र्यास पाय ठेऊ देणार नाही, असा इशारा ही युवासेनेच्यावतीने देण्यात आला. तसेच सक्षम कृषीमंत्री राज्याला मिळवा, अशी मागणी निवेदनाद्वारे तहसीलदारतर्फे राज्य सरकारला करण्यात आली. यावेळी कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या बेजबाबदार व्यक्तव्याच्या निषेधार्थ प्रतिमेला जोडे मारो करण्यात आले. यावेळी हर्षवर्धन पाटील, हेमंत रामगुडे, विशाल वाणी, दीपक तिवाडी, उषा पवार, मंगल पाटील, कोकिळा जंगले, रजनी पाटील, नवनाथ चोबे, दीपक कसबे, स्वराज क्षीरसागर, पांडुरंग घोलप, अजय बादगुडे , किरण स्वामी, अर्जुन सोनवणे, राहुल बुरसे, आनंद काशीद, पांडुरंग गपाट, भिमराव गंदुरे , रणजीत घुमरे, बालाजी मोहिते, अजय बनसोडे, अमोल जाधव, अथर्व कांगेती, सुहास व्हळे उपस्थित होते.

### करमाळा तालुक्यात उष्णतेची लाट; रस्ते निर्मनुष्य

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि. १३ एप्रिल-**

गेल्या आठवड्यात राज्यात सर्वत्र अवकाळी पाऊस झाल्याने वातावरण थंड थंडा, कुल कुल झाले होते परंतु, पुन्हा एकदा उन्हाचा तडाखा वाढू लागल्याने दुपारच्या सुमारास रस्ते निर्मनुष्य होत आहेत. कमाल तापमानाने ४० अंश सेल्सिअस पर्यंत झेप घेतली आहे तर किमान तापमानातही मोठी वाढ होत असल्याने रात्रीही उकाडा बेचैन करीत आहे.

यावर्षी फेब्रुवारी म हिन्यापासूनच उन्हाची तीव्रता जाणवण्यास सुरुवात झाली होती. मार्च महिन्यात अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा तयार झाल्याने वातावरणात बदल झाला होता. त्यामुळे राज्यातील काही भागात अवकाळी पाऊस व गारपीट झाली परंतु ते वातावरण आता पूर्णपणे निवळले आहे. करमाळा तालुक्याचा पश्चिम भाग उजनीच्या लाभक्षेत्राचा बागायती भाग असूनही उन्हाचा सर्वाधिक चटका या भागाला जाणवत आहे. उजनी जलाशयाचे पाण्याचे वाढत्या उष्णतेमुळे बाष्पीभवन मोठ्या प्रम ाणावर होत असल्याने उष्णतेच्या गरम झळा लाभक्षेत्राचा घाम काढत आहेत. वाढत्या उन्हामुळे पिके कोमेजून जात आहेत.

### मोडनिंब येथे हनुमान जन्मोत्सव उत्साहात

**मोडनिंब, दि. १३ एप्रिल-**

मोडनिंब (ता.माढा) येथे हनुमान जयंती मोठ्या भक्तीभावाने आणि उत्साहात साजरी करण्यात आली. शनिवारी सकाळी श्री मारुती मंदिरात विशेष पूजन, अभिषेक व हनुमान चालीसाचे सामूहिक पठण करण्यात आले. मंदिर परिसर फुलांच्या माळांनी आकर्षकरीत्या सजवण्यात आला होता.

दर्शनासाठी पहाटेपासूनच भाविकांची गर्दी पाहायला मिळाली. भक्तांकडून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये शेकडो गावकऱ्यांनी सहभाग घेतला. संध्याकाळी भजन संध्याचे आयोजन करण्यात आले. स्थानिक भजनी मंडळांनी सादर केलेल्या भजनांनी वातावरण भक्तिमय झाले.यावेळी गावातील सर्व भाविकांनी सहभाग नोंदवत कार्यक्रम यशस्वी केला. ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद व युवा वर्गाची सक्रिय सहभागाने संपूर्ण कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध व आनंदमय वातावरणात पार पडला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जय हनुमान मंदिर ट्रस्ट मोडनिंब, जय हनुमान भक्त परिवार आणि ग्रामस्थ, पुजारी उज्वल गुरव, बाळासाहेब गुरव यांनी परिश्रम घेतले.



### 'सह्याद्री'मध्ये महात्मा फुले जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १३ एप्रिल-**

समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा व अंधश्रद्धा निवारण्यासाठी जनजागृती करणारे थोर समाज सुधारक, स्त्री शिक्षणाचे प्रणेते क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे, ता.सांगोला येथे उत्साहात साजरी करण्यात आली.

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले व प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांच्या हस्ते व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत पुष्पहार अर्पण करून प्रतिमेची पूजा करण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## बाभळगाव भूषण पुरस्कारांचे वितरण

**विविध क्षेत्रातील ११ गुणवंतांचा सन्मान**

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. १३ एप्रिल-**

तालुक्यातील बाभळगाव येथील विविध क्षेत्रातील गुणवंतांना बाभळगाव भूषण पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून लातूर येथील युवा सिंगर विजेता महाराष्ट्र राज्य शिवशाहीर संतोष साळुंके, सोलापूर येथील अपोलो फर्टीलिटीच्या सचिवा डॉ. किर्ती कटारे, जेष्ठ साहित्यिक व कवी प्रा. डॉ. अरविंद हंगरगेकर, कलाकार तानाजी देशमुख,सरपंच सुरेखाताई कांबळे, उपसरपंच पल्लवी चव्हाण, भिमराव पाटील, नागनाथ धरणे, प्रकाश पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती




यावेळी सेवानिवृत्ती निमित्त प्रा देवदत्त आनंदराव पाटील, दत्तात्रय भिमराव कांबळे, राम मुकुंदा चव्हाण, ज्ञानेश्वर भिमराव महाबोले यांचा तर वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत असलेले डॉ विष्णु सातपुते, डॉ. अभिषेक पाटील, डॉ. अभिनंदन काळुंके, डॉ प्राजक्ता पाटील यांचा, भारत सरकार नोटरी प्राप्त ड किशोर पाटील,उत्कृष्ट प्रशासकीय सेवेबद्दल अविनाश धरणे तर पोलीस खात्यात कार्यरत असलेले अक्षय जाधव या गुणवंताचा बाभळगाव भूषण पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी शिवशाहीर संतोष साळुंके यांनी शिवरायाचा पोवाडा, तर कवी डॉ अरविंद हंगरगेकर,यांनी ग्रामीण शेतकरी कविता तर तानाजी देशमुख यांनी विविध आवाजाच्या नकला सादर करुन श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. प्रास्ताविक दयानंद काळुंके यांनी, सूत्रसंचालन डॉ. संतोष पवार यांनी तर आभार संभाजीराव पाटील यांनी मानले. यासाठी अमर पाटील, अशोक जाधव, जितेंद्र पाटील, विक्रांत पाटील, ॲड. गोविंद पाटील, राजकुमार पाटील, नितीन कांबळे, संभाजी चव्हाण, प्रा. नेताजी बिराजदार, राम सातपुते, मेघराज जाधव, जयंत पाटील, अंदानी जाधव, सत्तश्वर बिराजदार, शामराव धनवडे, बसवेश्वर परकाळे, अनिल पाटील, सागर पाटील, पुष्पक कसबे यांच्यासह समस्थ ग्रामस्थांनी पुढाकार घेतला होता

### अभिजीत घुगरदरे यांचा शरयू कारखान्याकडून सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. १३ एप्रिल-**

नातेपुते येथील प्रगतशील बागातदार अभिजीत दिलीप घुगरदरे यांनी शरयू साखर कारखाना कापशी (ता. फलटण) या कारखान्यास गळीत हंगाम सन २०२४-२५ साठी सर्वाधिक जास्त १५०० मॅट्रिक टन ऊस दिल्याने शरयू साखर कारखान्याचे वतीने चेअरमन श्रीनिवास पवार यांच्या हस्ते अभिजीत घुगरदरे यांचा सन्मान करण्यात आला.



> शरयू साखर कारखान्याचे शेती विभागातील अधिकारी कर्मचारी यांनी मला ऊस तोडणी यंत्रणा वेळेत दिल्याने मी कारखान्याला जास्तीत जास्त ऊस देऊ शकलो.
> **- अभिजीत घुगरदरे,** प्रगतशील शेतकरी.

यावेळी चेअरमन श्रीनिवास पवार, मॅनेजिंग डायरेक्टर युगेंद्र पवार, संचालिका शर्मिला पवार यांच्या हस्ते कारखाना स्थळावरती त्यांचा सन्मान करण्यात आला. गळीत हंगामामध्ये घुगरदरे यांनी आपल्या शेतीमध्ये उसाची लागण तसेच खोडव्याचे योग्य पद्धतीने व्यवस्थापन करून ऊस उत्पादनात दरवर्षी एकरी ११० ते ११५ टन ऊस उत्पादन घेतात त्यांच्या या नियोजनाचा अन्य शेतकऱ्यांना सल्ला व मार्गदर्शन नक्कीच फायद्याचे ठरणार आहे.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त फळांचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १३ एप्रिल-**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या युवती जिल्हाध्यक्षा विनंती कुलकर्णी व विश्वतेज प्रतिष्ठान उपळाई बुद्रुक यांच्या वतीने वडाचीवाडी येथील वृध्द आश्रमात फळे व पिण्याच्या पाण्याचे जार वाटप करण्यात आले.



यावेळी सोलापूर समाजकल्याण अधिकारी सचिन कवले, महिला जिल्हाध्यक्षा विनंती कुलकर्णी, माढा तालुका काँग्रेस अध्यक्षा वंदना कदम, वृषाली चौगुले, उपळाईचे आण्णासाहेब देशमुख, चैतन्य शेट्टे, नागनाथ कदम, रानबा कदम, राजीव मोहिते, अवधूत कुलकर्णी, अमोल कुलकर्णी, नरेश कदम, उपस्थित होते. यावेळी विनंती कुलकर्णी यांनी सांगितले की वृद्धाश्रम ाच्या परिसरात विद्युत हाय मास्ट बसवण्यासाठी वरिष्ठांकडे मागणी करून ती मागणी पूर्ण करून घेण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

## महत्वाचे...



### विभागस्तरीय काव्यवाचन स्पर्धेत किरण चव्हाण प्रथम

**माढा, दि. १३ एप्रिल-**

सेकंडरी स्कूल एम्प्लॉईज को. ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड मुंबई या संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित विभागस्तरीय स्वरचित काव्यवाचन स्पर्धेत बार्शी येथील जनसेवा हायस्कूलचे व मूळचे माढयाचे असलेले किरण ज्ञानदेव चव्हाण यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. सोलापूर येथील छत्रपती शिवाजी प्रशाला व नाईट कॉलेज झालेल्या या स्पर्धेत जनसेवा हायस्कूल बार्शीचे किरण चव्हाण (प्रथम), वाखरी ( ता. पंढरपूर) येथील माध्यमिक आश्रमशाळेचे सुजितकुमार कांबळे (द्वितीय), सोलापूर येथील डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम उर्दू शाळेचे सातखेड अशपाक अ. बाबुलाल (तृतीय) आले आहेत. या स्पर्धा सोसायटीचे संचालक पप्पू देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडल्या. स्पर्धेसाठी कवी इंद्रजित घुले, सत्यवान दाडे, राजेश पवार यांनी काम पाहिले. चव्हाण यांचे संस्थेचे सचिव डॉ. विलास गुंड, अध्यक्ष बाबासाहेब पोकळे, मुख्याध्यापिका शीला शिंदे यांनी अभिनंदन केले.

### अंबिकादेवी वाचनालयास साहित्यिक बसवेश्वर चेणगे यांची भेट

**सांगोला, दि. १३ एप्रिल-**



जेष्ठ साहित्यिक बसवेश्वर चेणगे यांनी सांगोला शहरातील अंबिकादेवी वाचनालयास सदिच्छा भेट दिली. वाचन संस्कृती लोप होण्याच्या मार्गावर असताना अत्यंत चिकाटीने ग्रंथालय चालवण्याचे काम करत असलेले ग्रंथपाल अमर कुलकर्णी यांच्या कामाचे कौतुक करून निष्ठेने आपली सेवा देण्याचे काम ते करत असल्याचे पाहून वाचन चळवळ वाढवणे हेच त्यांचे ध्येय असून त्यांच्या कामाबद्दल त्यांनी शुभेच्छा व्यक्त करून त्यांच्या कार्यास त्यांनी शुभेच्छा दिल्या. त्यांचा सत्कार अमर कुलकर्णी यांनी ग्रंथभेट देऊन केला. यावेळी सुरेश गंभिरे, शंकर पुजारी, सतिश इंगोले, लक्ष्मण देवकर उपस्थित होते.

### येणकीत जकरायाची यात्रा आजपासून

**मोहोळ, दि.१३ एप्रिल-**



येणकी (ता. मोहोळ) येथील ग्रामदैवत जकराया महाराजांची यात्रा रविवार दि. १३ एप्रिलपासून सुरु होत असुन तीन दिवस चालणाऱ्या या यात्रेनिमित विविध धार्मिक व सांकृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी सकाळी मंगळवेढा तालुक्यातील हुन्नुर येथून बिरोबा व हुलजंती येथून महालिंगराया यांच्या पालख्यांचे आगमन गावाजवळील पानमळ्यात होणार आहे. दिवसभार अंबिल दाखविण्याचा कार्यक्रम झाल्यानंतर सांयकाळी या दोन्ही पालख्या माजी सरपंच (कै) संभाजीराजे जाधव यांच्या घरामागे येतील. त्याचवेळी गावातून जकराया महाराजांची पालखी या ठिकाणी येऊन तिन्ही पालख्याच्या भेटीचा नयनरम्य सोहळा लाखो भक्तांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारा असेल. पालख्या मंदिरात स्थानापन्न झाल्यानंतर संध्याकाळी भाकणूक होणार आहे.सोमवारी सकाळपासून तिन्ही देवतांसह गावातील सर्व देवतांना गोड नैवद्य दाखविण्यात येणार आहे. यादिवशी मंदिर परिसरात दिवसभर कन्नड़ व मराठी धनगरी ओव्यांचा बहारदार कार्यक्रम आयोजित केला आहे. सायंकाळी चार वाजता कुस्त्यांचे जंगी मैदान होणार आहे. कुस्ती स्पर्धेत नाव नोंदविण्यासाठी पैलवान गोपीनाथ (आप्पा) गुंड (मोबाईल : ९५१८७४२२२८) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मंगळवारी सकाळी तिन्ही पालख्या सभिन्या साठी गावाच्या चावडीत येतील. या वेळी गावातील कलाकार विविध कला सादर करतील. या दिवशी यात्रेची सांगता होईल.

### मोहोळचा पंचशीलरत्न पुरस्कार लातूरचे डॉ. कमलाकर कांबळे यांना जाहीर

**मोहोळ,दि.१३ एप्रिल-**



येथील पंचशील क्रीडा शिक्षण व सांस्कृतिक मंडळाच्या वतीने देण्यात येणारा यावर्षीचा मानाचा व प्रतिष्ठेचा पंचशीलरत्न पुरस्कार साहित्यिक प्रा. डॉ. कमलाकर कांबळे (लातूर) यांना १६ एप्रिल रोजी मान्यवरांच्या हस्ते मोहोळ येथे देण्यात येणार असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष शशिकांत ठोकळे, कुमार ढवळे, सुरज पाचकुडवे यांनी दिली. डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त हा पुरस्कार मंडळातर्फे दिला जातो. यापूर्वी बौद्धाचार्य प्रभाकर सुतकर, अरविंद आठवले, दिगंबर वाघमारे, डॉ. जनार्दन निकंबे, धम्मरक्षिता कांबळे, साहित्यिक योगीराज वाघमारे , बा. ना. धांडोरे, भीमशाहीर संदीप शिंदे, अण्णासाहेब वाघमारे, शांतीकुमार नागटिळक, प्रा. संघप्रकाश दुडडे, समाजभूषण आण्णासाहेब भालशंकर, प्रा. सत्यजित जानराव आदी मान्यवरांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. मंडळाच्या वतीने दि. १३ ते १६ एप्रिल दरम्यान विविध स्पर्धा व विधायक कार्यक्रम होणार आहेत. यावेळी मंडळाचे संस्थापक अशोक पाचकुडवे, हनुमंत भडकवाड, धनंजय जगताप, संजय आठवले, धनंजय आवारे, सुनिल गायकवाड, प्रा. प्रकाश शिंदे, बाबुराव रोडे, संदीप सोनवणे, आदी उपस्थित होते.

# जिल्ह्यात अवकाळीचा १४८ हेक्टरवरील पिकांना फटका

- बार्शी, करमाळा, सांगोला तालुक्यातील १४८ गावांचा समावेश
- आंबा, केळी, द्राक्ष अन् खरबूजचे नुकसान
- नुकसानीचा नजर अंदाज अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

गुरुवार दि. १० एप्रिल रोजी सायंकाळच्या सुमारास वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसाने आंब्यासह केळी, द्राक्ष अन् खरबूजाचे मोठे नुकसान झाल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी आज (दि. १३) दिली.



**तोडणी राहिलेल्या द्राक्षांचेही नुकसान**

ज्या द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची द्राक्षाची तोडणी मागे राहिली होती; त्यांचे नुकसान झाले आहे. दरम्यान, अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील द्राक्ष बाजारपेठेत गेली असल्याचे त्यांच्या बागांची काहीही हानी झाली नाही. काही शेतकऱ्यांच्या शेतात द्राक्ष तोडणी करून बाजारपेठेत पाठविण्याची लगबग सुरू असतानाच गुरुवारी अचानक अवकाळी पावसाने झोडपले. यात अशा द्राक्षबागायतदारांचेही काही प्रमाणात नुकसान झाले आहे.

दरम्यान, कृषी, महसूल आणि ग्रामविकास विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून १४० बाधीत गावातील १४८ गावांना फटका बसल्याचा प्रथम दर्शनी अहवाल तयार झाला असून, यामध्ये बार्शी, करमाळा आणि सांगोला तालुक्याचा सम ावेश आहे. या नुकसानीचा नजरअंदाज अहवाल जिल्हा प्रशासनाकडे सादर केला असून, तो अहवाल आता लवकरच शासनाकडे जाणार आहे.

गेल्या २ दिवसांपूर्वी कडाक्याच्या उन्हानंतर सायंकाळी जोराचे वारे वाहू लागले. यानंतर अवघ्या काही मिनिटांतच मेघगर्जनेसह अवकाळी पाऊस झाला. वाऱ्याचा वेग प्रचंड असल्याने केशर आणि इतर जातीच्या आंब्यांचे मोठे नुकसान झाले.

या आंबा बागांतून अक्षरशः कैऱ्यांचा सडा पडला होता. इतकेच नाहीतर केळी, द्राक्ष, खरबूज आदी पिकांचेही नुकसान झाले आहे. दरम्यान, तलाठी बांधव बांधावर जावून पंचनामे करीत असून, यामध्ये इतरही काही गावांचा समावेश होणार आहे. जिल्ह्यातील उत्तर आणि दक्षिण सोलापूर तालुक्यातीलही काही गावांना आणि धाराशिव जिल्ह्यातील अनेक गावांनाही या वादळी वाऱ्याचा मोठा फटका बसला आहे.

**बार्शीच्या १४० गावांना वादळाचा फटका**

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील १४० गावातील शिवारालाही अवकाळीने तडाखा दिला. यामध्ये ८५.३९ हे. आर वरील विविध बागांसह फळपिके आणि भाजीपाल्याचीही हानी झाली आहे. तर करमाळा तालुक्यातील ७ गावे बाधीत झाली असून, ६३ हेक्टरवरील केळी, आंबा, द्राक्ष, खरबूज पिकांना फटका बसला आहे. तर सांगोला तालुक्यातील एका गावच्या आंबा बागांना फटका बसला आहे.

## संग्रामनगरच्या शिबिरात १५ मतिमंद, दिव्यांगांचे मोफत औषधोपचार

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १३ एप्रिल-**

रामनवमीनिमित्त संग्रामनगर येथील श्री साईबाबा ट्रस्ट व शाश्वती मेडिकल रिसर्च फाउंडेशन शिंदे होमिओपॅथिक हॉस्पिटल यांच्यातर्फे दिव्यांग मतिमंद मुलांसाठी मोफत तपासणी व औषध उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिराचे उद्घाटन अकलूज येथील डायबिटीस स्पेशालिस्ट डॉ. निखिल आर्वे व डॉ. बिना आर्वे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. ट्रस्टचे अध्यक्ष किशोरसिंह माने-पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रवींद्र शिंदे एमडी होमिओपॅथी आणि योगिता शिंदे मुक्तांगण थेरपी सेंटर हा दोघांनी मिळून अनेक दिव्यांग मुलांची जीवनशैली सुधारली आहे. त्यांच्या कार्यास सर्व सहकार्य करू असे डॉ. आर्वे यावेळी म्हणाले. यावेळी बोलताना डॉ. रवींद्र शिंदे म्हणाले मतिमंद अपंग जन्माला आल्यावर त्या कुटुंबाच्या अवस्था वेगळी होते कुटुंबाचा सर्व अभ्यास करूनच आम्ही आई-वडिलांची मानसिकता बदलण्याचा प्रयत्न करत असतो गेले दहा वर्षापासून मी या क्षेत्रात कार्यरत असून सर्वांच्या सहकार्याने मला बऱ्यापैकी यश आले आहे.



शिबिरात १५ लाभार्थ्यांनी लाभ घेतला. सूत्रसंचालन व आभार चंद्रकांत कुंभार यांनी मानले यावेळी ट्रस्टचे सर्वसाधारण सचिव राजेंद्र आर्वे, देवचंद ओसवाल, सुभाष काळे, विजय टोंगळे उमेश शेटे, अरुण राऊत, दीपक शिंदे उपस्थित होते.

## पंधरा दिवसानतरही मंद्रूपचे शेतकरी पाण्यापासून वंचित

### पाटबंधारे विभागाच्या दुजाभावामुळे पिके उध्दवस्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ एप्रिल-**

उजनी धरणातून कालव्याद्वारे सोडलेले पाणी १५ दिवसापूर्वीच कोरवली, कंदलगाव व गुंजेगाव परिसरात पोहोचले मात्र येळेगाव, मंद्रूप, वांगी, बसवनगर परिसरात हे पाणी अद्यापही न आल्यामुळे पाटबंधारे विभागाकडून दूजाभाव होत असल्याबाबत शेतकऱ्यांतून संताप व्यक्त होत आहे.

पाटबंधारे अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत आहेत. कालव्याद्वारे सोडण्यात आलेले पाणी कोरवली, कंदलगाव व गुंजेगाव परिसरात येऊन तीन आठवडे उलटून गेले तरी मंद्रूपच्या शेतकऱ्यांना अद्यापही पाण्याची प्रतीक्षा करावी लागत आहे. दुरूस्तीचे काम करताना सीतामाई तलावातील पाणी सोडण्यात आल्याने तलावातील पाणी पातळी कमी झाल्याने मंद्रुपच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होत आहे. म्हणून तलावात त्वरित पाणी सोडण्यासाठी मंद्रुपच्या कालव्यात पाणी सोडण्याची मागणी होत आहे. कंदलगाव, गुंजेगाव, अकोले (मं) या भागातील शेतकऱ्यांना तीन आठवडे पाणी पुरवठा करण्यात येतो. कालव्याचा शेवट असणाऱ्या मंद्रूप परिसरातील हजारो शेतकऱ्यांना पाण्यासाठी नेहमीच झगडावे लागते. कालव्याच्या पाण्यासाठी नेहमी आंदोलन करून पाणी मिळवावे लागते हे दुर्दैवी आहे. पाटबंधारे विभागाच्या सापत्नपणाच्या वागणुकीमुळे शेतकऱ्यांची पिके जळून जात असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे शेतकऱ्यावर आत्महत्या करण्याची वेळ आली आहे. मंद्रुपच्या शेतकऱ्यांसाठी उजनी धरणातील हक्काचे पाणी असताना पाटबंधारे विभागातील अधिकाऱ्यांच्या 'अर्थ' पूर्ण व्यवहारामुळे शेतकरी पाण्यापासून वंचित राहत आहेत. पाटबंधारे विभागाकडे अनेक शेतकऱ्यांनी पाण्यासाठी कर भरला असतानाही त्या शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. कंदलगाव परीसरात पाटबंधारे विभागाकडे अधिकारी नसल्यामुळे व खाजगी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आल्यामुळे कालव्याचे पाणी सोडताना मनमानी कारभार होत असल्याचे सांगण्यात येते. ऐन उन्हाळ्यात मंद्रूपच्या हजारो शेतकऱ्यांना तीन आठवड्यापासून हक्काचे पाणी मिळाले नसल्याम ुळे शेतकरी हवालदिल बनला आहे. दोन दिवसात पाणी न सोडल्यास सोलापूर विजयपूर महामार्गावर आंदोलन करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

**वारंवार मंद्रुपच्या शेतकऱ्यांवर अन्याय**

मंद्रुप परिसरात उजनी धरणाचा कालवा झाल्यापासून शेतकऱ्यांना नियमितपणे पाणीपुरवठा करण्यात आला नाही . पाटबंधारे विभागाकडून पाणीपट्टी घेतली जाते, मात्र पाणी देताना नेहमी दुजाभावाची वागणूक मिळते. या भागातील शेतकऱ्यांना आंदोलन केल्याशिवाय पाणी मिळत नाही. या शेतकऱ्यांवर नेहमी अन्याय करण्याचे काम पाटबंधारे विभागाकडून होत आहे. त्यामुळे १५ एप्रिल पर्यंत पाणी न सोडल्यास आंदोलन करणार आहे.

**- प्रभाकर कोरे, माजी संचालक, जिल्हा दूध संघ**

**आमदारांनी लक्ष घालण्याची गरज**

मंद्रूप, येळेगाव, वांगी व बसवनगर परिसरातील शेतकऱ्यांना कालव्याचे पाणी मिळाले नाही. अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. ऊस ,केळी, द्राक्ष , पपई यासह उन्हाळी पिके करपून जात आहेत. त्यामुळे मंद्रूप परिसरातील शेतकऱ्यांना पाणी मिळण्यासाठी आमदार सुभाष देशमुख यांनी लक्ष देण्याची गरज आहे.

**- बाळासाहेब शेंडगे, शेतकरी, मंद्रुप**

**पाच दिवसानंतर पाणी सोडणार**

कंदलगाव परिसरात कालवा फुटल्यामुळे मंद्रूप परिसरात पाणी सोडण्यात व्यत्यय येत आहे. येळेगाव व वांगी परीसरात दोन दिवसात पाणी सोडण्यात येणार आहे. चार ते पाच दिवसानंतर मंद्रूपच्या शेतकऱ्यांना पाणी सोडण्यात येणार आहे. मंद्रुपच्या शेतकऱ्यांना पाणी सोडल्याशिवाय पाणी बंद करण्यात येणार नाही.

**- प्रदिप गंगनमळे , अधिकारी, पाटबंधारे सोलापूर**



## पिलीव येथे हनुमान जन्मोत्सव साजरा

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. १३ एप्रिल-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील गेल्या अनेक वर्षांपासून परंपरा असणारी हनुमान जयंती साजरी करण्यात आली. सुरुवातीला हनुमानाचे मानकरी जयंत शंकरराव गुरव (गोरे) व जिवन शंकरराव गुरव यांच्या हस्ते हनुमानाच्या मूर्तीला अभिषेक व विधीवत पूजा करुन सामुहिक आरती करण्यात आली.

हे हनुमान मंदिर दक्षीणमुखी असून भक्तांच्या नवसाला पावणारा हनुमान म्हणून हा प्रसिद्ध आहे. या कार्यक्रमास नितीन कपने, भैया काळे, सुरज कस्तुरे, किशोर लोखंडे, मार्तंड लोखंडे, प्रविण भांडेकर, सूरज काळे, बाळू काळे, गुदा काळे, दशरथ काळे, लखन काळे, शिवाजी काळे, नंदकुमार गुरव, पप्पू कोळी उपस्थित होते. सुर्योदयापूर्वी भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी हौसाबाई काळे यांनी श्री हनुमान जन्माचा पाळणा सादर केला. यावेळी भाविकांकडून प्रसाद म्हणून लाडूचे वाटप करण्यात आले. हनुमान जयंतीच्या पूर्वसंध्येला माजी ग्रामपंचायत सदस्य जिवन शंकरराव गुरव यांच्या संकल्पनेतून व पुढाकाराने हनुमान मंदीराची रंगरंगोटी करण्यात आली होती. तर हनुमान जयंतीचे औचित्य साधून संपूर्ण मंदीरावर फुलांची आकर्षक सजावट करुन विद्युत रोषणाई करण्यात आली होती.हनुमानाचे दर्शन घेण्यासाठी पिलीव परीसरातील भाविक भक्तांनी सकाळपासून रात्री उशीरापर्यंत मंदिरात गर्दी केली होती.

# मंद्रूप ते सोलापूर : रात्रीची बससेवा गायब, प्रवाशांचे हाल

## संध्याकाळी ७:३० नंतर मंद्रूप ते सोलापूर, सोलापूर ते मंद्रूप सार्वजनिक वाहतूक बंद

**तभा वृत्तसेवा । प्रमोद जवळकोटे**
**मंद्रुप, दि. १३ एप्रिल-**

एकीकडे मंद्रूप तालुका होण्याच्या दिशेने वाटचाल सुरू आहे, तर दुसरीकडे सोलापूर आणि मंद्रूप दरम्यानचे व्यापारी, कर्मचारी आणि विद्यार्थी दररोज प्रवास करत आहेत. मात्र, रात्रीच्या वेळी सार्वजनिक वाहतुकीचा अभाव या प्रवाशांसाठी मोठ्या अडचणीचे कारण ठरत आहे. विशेषतः सकाळी आणि रात्रीच्या वेळेस गाड्या पकडण्यासाठी नागरिकांना खाजगी वाहनांवर अवलंबून राहावे लागते.

संध्याकाळी ७:३० नंतर मंद्रूपहून सोलापूरकडे जाणारी एकही बस सेवा उपलब्ध नाही. सोलापूर महानगरपालिकेची आठ वाजताची सिटी बसही अनियमित असल्याने शहरात कामानिमित्त जाणाऱ्या नागरिकांसाठी ही वेळ अधिक कठीण ठरते.

**कामगार, विद्यार्थी, परीक्षार्थी यांना बससेवेची नितांत गरज**

रोज शेकडो कर्मचारी मंद्रूपहून सोलापूर शहरात नोकरीसाठी प्रवास करतात. तसेच आयटी क्षेत्रातील युवक, शासकीय परीक्षार्थी आणि भरतीसाठी पुण्याला जाणारे उमेदवार हुतात्मा किंवा सिद्धेश्वर एक्सप्रेस पकडण्यासाठी सकाळी किंवा रात्री वाहन शोधण्यात वेळ व पैसा घालवतात. यामुळे त्यांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागतो.

हल्ली सोलापुरातून दुसऱ्या शहरात कामासाठी जाणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या वाढली आहे. रेल्वे पकडण्यासाठी रात्री आणि सकाळी वाहन मिळत नाही. त्यामुळे महागड्या वाहनांची मदत घ्यावी लागते. प्रशासनाने यावर तोडगा काढावा.

**- रवी विजापुरे, आयटी कर्मचारी**

आम्हाला रोज सोलापूरला कामानिमित्त जावे लागते. पण रात्री उशिरा परतण्यासाठी बस नसल्यामुळे खूप त्रास होतो. रात्रीच्या वेळेस सोलापूर-मंद्रूप मार्गावर नियमित बससेवा चालू करण्यात यावी. यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळेल. पर्यायी खाजगी वाहनांमध्ये प्रवास करण्याचे वेळ येणार नाही. **- प्रवासी**



**रस्ता हरवलेली व्यवस्था**
**भाग-१**

**सोलापूरहून परत येण्यासही अडचण**

सोलापूर शहरातून रात्री ७:३० नंतर मंद्रूपकडे जाण्यासाठी एकही सार्वजनिक बस उपलब्ध नसल्याने उशिरा काम आटोपणाऱ्या नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते.

**सिद्धेश्वर एक्सप्रेससाठीही काही नाही**

रात्री उशिरा सोलापूरहून मुंबई-पुण्याकडे जाणाऱ्या सिद्धेश्वर एक्सप्रेससाठीदेखील मंद्रूपहून कोणतीही सार्वजनिक वाहतूक उपलब्ध नाही. त्यामुळे प्रवाशांना स्वतःची वाहने वापरणे किंवा महागडी रिक्षा वापर करणे भाग पडते.

**हुतात्मा एक्सप्रेस पकडणे ठरते कठीण**

सोलापूरहून पुण्याकडे जाणाऱ्या हुतात्मा एक्सप्रेससाठी मंद्रूपहून पहाटे किंवा सकाळी लवकर जाण्यासाठी कोणतीही सार्वजनिक बससेवा उपलब्ध नाही. परिणामी, रेल्वेने प्रवास करणाऱ्या नागरिकांना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागतो, किंवा पर्याय म्हणून एक दिवस आधीच रात्री सोलापूर गाठावे लागते.